सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, ११ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २५७ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## देशातील ९९४ संपत्तींवर वक्फचा अवैध ताबा
### केंद्राची संसदेत माहिती

नवी दिल्ली: देशभरातली एकूण ९९४ संपत्तींवर वक्फने अवैधरित्या अतिक्रमण केले असल्याची माहिती सोमवारी केंद्र सरकारने संसदेत दिली. यामध्ये एकट्या तामिळनाडूमध्ये सर्वाधिक ७३४ अशा संपत्ती आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्ष(मार्क्सवादी)चे नेते जॉन ब्रिटास यांच्या प्रश्नावर उत्तर देताना अल्पसंख्याक मंत्रालयाने ही माहिती दिली. देशात वक्फच्या अधिनियमांतर्गत ८७२,३५२ स्थावर आणि १६,७१३ स्थावर नसलेल्या मालमत्ता नोंदणीकृत आहेत.




केंद्राने संसदेत दिली माहिती

अल्पसंख्यांक मंत्रालयाचे मंत्री किरेन रिजीजू यांनी एका प्रश्नावरील उत्तरादरम्यान सांगितले, माहितीनुसार ९९४ संपत्तींवर वक्फने अवैधरित्या ताबा घेतल्याची माहिती मिळाली आहे. देशभरातली एकूण ९९४ संपत्तींपैकी तामिळनाडूमध्ये सर्वाधिक ७३४ संपत्ती आहेत ज्यांच्यावर वक्फचा अवैधरित्या ताबा आहे. यानंतर आंध्र प्रदेशात १५२, पंजाबमध्ये ६३, उत्तराखंडमध्ये ११ आणि जम्मू-काश्मीरमध्ये १० अशा संपत्ती आहेत.

२०१९ नंतर वक्फला एकही जमीन मिळालेली नाही

केंद्रीय नागरी तसेच शहरी मंत्रालयाने सोमवारी राज्यसभेत सांगितले की केंद्र सरकारद्वारे २०१९ नंतर वक्फ बोर्डाला कोणतीही जमीन देण्यात आलेली नाही. २०१९ पासून आतापर्यंत केंद्र आणि राज्य सरकारकडून वक्फ बोर्डाला दिलेल्या जमीनीबाबत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मंत्रालयाने सांगितले की राज्य सरकारांनी दिलेल्या जमिनीबाबतचा कोणताही डेटा नाही आहे.

दरम्यान, जोपर्यंत नागरी आणि शहरी बाबतीतील मंत्रालयाचा सवाल आहे तर २०१९ नंतर भारत सरकारकडून वक्फ बोर्डाला कोणतीही जमीन उपलब्ध करण्यात आलेली नाही.

## महाराष्ट्राचे माजी राज्यपाल आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एस.एम. कृष्णा यांचे निधन



बंगळुरू : कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल सोमनहल्ली मल्लैय्या कृष्णा यांचे आज मंगळवारी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते. कृष्णा यांनी बंगळूर येथील त्यांच्या निवासस्थानी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पार्थिवावर मद्दूर येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.

दिवंगत एस.एम. कृष्णा यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री, केंद्रीय परराष्ट्र मंत्री, महाराष्ट्राचे राज्यपाल अशी विविध १० मानाची पदे भूषविली होती. एस.एम. कृष्णा यांनी १९६० च्या दशकात राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. त्यांनी १९६२ साली पहिल्यांदाच अपक्ष म्हणून मद्दूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. यावेळी त्यांनी काँग्रेस उमेदवाराचा पराभव केला होता. त्यानंतर ते प्रजा सोशलिस्ट पार्टीत दाखल झाले. तसेच १९६८ मध्ये त्यांनी मंड्या लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक जिंकली.

कृष्णा १९७१ मध्ये काँग्रेसमध्ये परतले. पुन्हा त्यांनी या मतदारसंघात विजय मिळवला. त्यानंतर १९८५ मध्ये ते राज्याच्या राजकारणात परतले. ते १९९९ मध्ये कर्नाटकचे मुख्यमंत्री बनले आणि २००४ पर्यंत मुख्यमंत्री पदावर राहिले. कृष्णा यांनी जानेवारी २०२३ मध्ये सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेतली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एस. एम. कृष्णा यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. आपल्या शोकसंदेशात पंतप्रधान म्हणाले की, एस.एम. कृष्णा हे एक असामान्य नेते होते. इतरांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांनी नेहमीच अथक परिश्रम घेतले. कर्नाटकच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात विशेषत: पायाभूत सुविधांच्या विकासावर त्यांनी भर दिला. एस. एम. कृष्णाजी हे एक विपुल वाचक आणि विचारवंत असल्याचे मोदींनी नमूद केले आहे.

## ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मधील मोजणीत तफावती नाही : निवडणूक आयोगाचा खुलास

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई दि.१० डिसेबर: राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर ईव्हीएम मशिनवर संशय उपस्थित होत आहे. विधानसभेच्या विशेष अधिवेशनात महाविकास आघाडीच्या आमदारांनी ईव्हीएमवर शंका उपस्थित करत, माळशिरस मतदारसंघातील मारकडवाडी गावातील बेलट पेपरवरील मतदान प्रक्रियेच्या निर्णयाचं समर्थन केले आहे. या वादावर आता निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण दिलं आहे. तसेच, व्हीव्हीपॅट मशिनमधील मोजणीत कुठेही तफावत नसल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले. त्यामुळे, ईव्हीएमच्या आरोपात कसलेली तथ्य नसल्याचं आयोगाने सांगितल्याचे दिसून येते.

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी देखील मतदानादिनी सायंकाळी ५ ते ६ या वेळेत वाढलेल्या मतदानावर प्रश्न उपस्थित केले आहेत. याबाबत निवडणूक आयोगाला पत्रही लिहिले आहे. या चर्चा आणि गोंधळदरम्यान निवडणूक आयोगाने मतमोजणी प्रक्रियेतील मशिनबाबत मोठा खुलासा केला आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या मतमोजणीवेळी भारतीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघ/ विधानसभा विभागातून ५ मतदान केंद्रांची निवड करण्यात आली होती. आयोगाने निवडलेल्या या ५ मतदान केंद्रांच्या व्हीव्हीपॅट स्लिपची मोजणी करणे अनिवार्य होते. त्यानुसार, येथील मशिनची मोजणी करण्यात आली आहे.

२३ नोव्हेंबर रोजीच्या मतमोजणी प्रक्रियेदरम्यान प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील निवडलेल्या ५ मतदान केंद्रांची व्हीव्हीपॅट स्लिप मोजणी मतमोजणी निरीक्षक/उमेदवारांच्या प्रतिनिधींसमोर करण्यात आली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघातील १४४० व्हीव्हीपॅट युनिट्सची स्लिप गणना संबंधित कंट्रोल युनिट डेटासह केली गेली आहे. संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारीकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार व्हीव्ही पेट स्लिपचा काउंट आणि ईव्हीएम कंट्रोल युनिट काउंटमधील आकडेवारी समसमान आहे. त्यामध्ये, कोणतीही तफावत आढळलेली नाही. त्यामुळे, मतमोजणीच्या प्रक्रियेत निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या सर्व नियमांचे व प्रक्रियेचे योग्य पालन करण्यात आले आहे, असे निवडणूक आयोगाने आज स्पष्ट केले आहे.

दरम्यान, मारकडवाडी गावाला भेट देऊन महायुतीचे नेते व महाविकास आघाडीचे नेते एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत. ईव्हीएमविरुद्ध आवाज उठवणाऱ्यांनाविरुद्ध आज महायुतीच्या नेत्यांनीही मारकवाडीत गावात भेट देऊन आंदोलन सुरु केले आहे.

## महाराष्ट्र गारठले! मुंबईत ९ वर्षातील सर्वाधिक कमी तापमानाची नोंद

मुंबई : राज्यात पुढील काही दिवस थंडीचा कडाका वाढणार आहे. मुंबईत सोमवारी गेल्या ९ वर्षातील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली. तर जळगाव जिल्ह्यात राज्यात सर्वात कमी तापमानाची नोंद झाली जळगावमध्ये ८.९ डिग्री अंश सेल्सिअस एवढे कमी तापमान नोंदवले गेले. तर पुण्यासह नाशिक जिल्ह्यातील निफाड येथे देखील कमी तापमानाची नोंद झाली. पुढील काही दिवस राज्याच्या तापमानात आणखी ४ ते ५ अंश डिग्री सेल्सिअसने घट होण्याची शक्यता आहे. तर विदर्भात काही जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्यात थंडीचा जोर पुन्हा वाढला आहे. मुंबईकरांसाठी सोमवार गारेगार व थंडीचा ठरला. मुंबईकरांनी गुलाबी थंडीचा आनंद सोमवारी घेतला. सोमवारी मुंबईत पहाटे गेल्या ९ वर्षांतील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली. भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सांताक्रूझ केंद्रात सोमवारी १३.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. गेल्या ९ वर्षातील हे सर्वात कमी तापमान होते. यापूर्वी डिसेंबर २०१५ मध्ये किमान तापमान ११.४ अंश सेल्सियस होते. मुंबईत किमान तापमान १९.२ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. या बाबत भारतीय हवामान विभागाचे पुण्याचे प्रमुख के. एस होसाळीकर यांनी एक्सवर पोस्ट केली आहे. उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे येत्या २४ तासांत मुंबई, नाशिक, जळगाव व पुण्यात थंडीची तीव्रता वाढणार असल्याचा अंदाज देखील त्यांनी वर्तवला आहे.

पुणे वेधशाळेने दिलेल्या माहितीनुसार आज आग्नेय बंगालच्या उपसागर आणि लगतच्या पूर्व विषुववृत्तीय हिंद महासागरावरील कमी दाबाचे क्षेत्र स्थिर आहे. त्याची वाटचाल वायव्य दिशेला सुरू असून पुढील २४ तासात ते अधिक ठळक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आज विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## बेस्टच्या भरधाव बसने पादचाऱ्याना चिरडले!
### कुर्ल्यातील भीषण अपघातात ७ ठार तर ४९ जखमी

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१० डिसेंबर : नेहमी गर्दीने गजबजलेल्या कुर्ला परिसरात एका भरघाव बेस्टने रस्त्यावरील अन्य वाहने व पादचाऱ्यांना चिरडण्याची घटना सोमवारी रात्री घडली. या भीषण दुर्घटनेत ७ जण ठार तर तब्बल ४९ जखमी झाले आहेत. बसले ठोकर दिल्यानंतर सुमारे ५० फूट वाहनांना फरपटत नेले.विशेष म्हणजे बसचा कंत्राटी चालक संजय मोरे हा अवघ्या ९ दिवसापूर्वी भरती झाला होता. त्याला अवजड वाहन चालविण्याचा अनुभव नसल्याचे स्पष्ट झाले आहे. बेस्ट प्रशासनाच्या या बेजबाबदारपणाबाबत स्थानिक नागरिकाकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे सर्वच राजकीय पक्षांनी या अपघातावर टीकेची झोड उठवली आहे.

कुर्ला पश्चिमेकडील बेस्ट बसस्थानकातून ३३२ क्रमांकाची इलेक्ट्रिक बस रात्री साडे नऊच्या सुमारास अंधेरी स्थानकाकडे निघाली होती. एल वॉर्ड आणि बुद्ध कॉलनीच्या परिसरात भरधाव आलेल्या या बसवरचे चालक मोरेचे नियंत्रण सुटले आणि बसचा वेग वाढून बसने रस्त्यावरील रिक्षांसह खासगी वाहने आणि पादचाऱ्यांना ठोकर देत पुढे जाऊन रस्त्याच्या कडेला आदळली. सुमारे ५० फूट तिने अन्य वाहनांना फरफटत नेले दिली. या त्यामध्ये ७ जण जागीच ठार झाले.तर ४९ जण जखमी झाले. या घटनेने परिसरात एकच खळबळ व घबराहट उडाली. ठाणे विक्रेते नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत बस चालकाला बाहेर काढत सोबतीला तर जखमींना तातडीने रुग्णालयात हलविले रात्री उशिरापर्यंत बचावकार्य

सुरू होते.. पोलिसांनी बस चालकाला अटक केली असून त्याला १० दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे. वैद्यकीय तपासणी त्याने दारू प्राशन केले नसल्याचे स्पष्ट झाले आहे तसेच बेस्टच्या बसची तपासणी केली असता त्यामध्ये कोणताही तांत्रिक बिघाडी झालेला नव्हता चालक मोरेला वाहनावर नियंत्रण ठेवताना आल्याने हे घडल्याचे स्पष्ट झाले आहे त्याच्या या कृत्यामागे कट होता की अपघात याबाबत तपास करण्यात येत असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

अपघात ग्रस्त बसचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध झाले आहे.त्यामध्ये बस ऑटोरिक्षा, मोटारसायकल आणि पादचाऱ्यांना धडकताना दिसत आहे. जखमींना मदत करण्यासाठी आणि हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी लोक धावत होते. रस्त्यावर मृतदेह पडलेले दिसत होते. जखमींना तातडीने जवळच्या भाभा रुग्णालयात हलविण्यात आले. अपघातातील काही जखमींवर सायन रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. तसेच काही जणांवर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

त्या अपघातात गस्तीवर असलेले चार पोलिस आणि एमएसएफ जवानही जखमी झाले आहे. त्यांच्यावर सेव्हन हिल्स रुग्णालयात उपचार सुरु आहे. पोलिसांची प्रकृती स्थिर आहे.

### मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी पाच लाख तर जखमेवर मोफत उपचार : मुख्यमंत्र्यांची घोषणा

कुर्ला येथे बेस्ट बसच्या अपघातात झालेल्या मृत्यूबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. अपघातातील मृतांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपये मुख्यमंत्री सहायता निधीतून देण्यात येईल तसेच जखमींवर मुंबई महापालिका व बेस्टच्या वतीने मोफत उपचार करण्यात येतील, असे त्यांनी जाहीर केले आहे. याबाबत एक्स वर मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे की, मृतांच्य कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. तसेच जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी मी प्रार्थना करतो,

### नवशिक्या चालकाच्या ताब्यात बस

बस चालक मोरेला अवजड वाहन चालवण्याचा अनुभव नाही अपघाता वेळी सदर बसमधून तब्बल ६० प्रवासी प्रवास करत होते. हा अपघात चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्यानं घडला. आरोपी बस चालक संजय मोरे एक डिसेंबर रोजी बेस्ट बस चालक म्हणून रुजू झाला. मोरे कंत्राटी कामगार असून, त्याला अवजड वाहन चालवण्याचा कोणताही अनुभव नाही. त्याने आतापर्यंत केवळ छोटी वाहनं चालवली आहेत.

## श्री सिद्धिविनायक मंदिर राहणार ५ दिवस बंद!

मुंबई : मुंबईतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले दादरचे प्रसिद्ध सिद्धिविनायक गणपती मंदिर बुधवारपासून पुढील पाच दिवसांसाठी बंद राहणार आहे. या मंदिरात लाखोंच्या संख्येने भाविक श्रद्धेने लांबून दर्शनासाठी येत असतात. परंतु येत्या १४ डिसेंबर ते १८ डिसेंबर या पाच दिवसांसाठी सिद्धिविनायक मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद राहणार आहे. श्रींच्या प्रतिमेचे दर्शन भाविकांना १९ डिसेंबरला दुपारपासून घेता येणार आहे. श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे भाविकांना आवाहन करत बुधवार दिनांक १४ डिसेंबरपासून ते रविवारी दिनांक १८ डिसेंबर २०२२च्या कालावधीमध्ये श्रींच्या मूर्तीला सिंदूर लेपन करण्यात येणार असल्याची माहिती दिली. त्यामुळे त्या कालावधीमध्ये भाविकांना प्रत्यक्ष श्रींच्या मूर्तीचे दर्शन बंद असेल, याऐवजी श्रींच्या प्रतिमेचे दर्शन घेता येईल असे, श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

## तिथे मशीद नव्हे तर मंदिरच होते, आहे आणि रहाणार!
### दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर असल्याचा कोर्टाचा महत्त्वाचा निर्णय



ठाणे : कल्याणमधील ऐतिहासिक महत्त्व असलेल्या दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर आहे की मशीद यासंदर्भातील निकाल आज सत्र न्यायालयाने दिला आहे. दुर्गाडी किल्ल्यावर मंदिरच असल्याचा निर्वाळा न्यायालयाने केला आहे. मागील बऱ्याच काळापासून या प्रकरणार सुनावणी सुरु होती. अखेर तब्बल ५३ वर्षांनी या प्रकरणाचा निकाल आता लागला आहे.

कल्याणमधील सत्र न्यायालयाने ऐतिहासिक दुर्गाडी किल्ल्यावर मशीद नसून मंदिरच असल्याचे आदेश जारी केले आहेत. १९७१ साली ठाणे जिल्हा अधिकाऱ्यांकडे मंदिर की मशीद यावरुन सुनावणी झाली होती. त्यानंतर आता न्यायालयाने या किल्ल्यावर मंदिरच असल्याचे स्पष्ट केल्यानंतर हिंदू संघटनेचे पदाधिकारी व शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी कल्याण दुर्गाडी किल्ल्यावर आरती करत जल्लोष साजरा केल्याचे पहायला मिळाले. या भागामध्ये धार्मिक तणाव निर्माण करणाऱ्या या प्रकरणावर निकाल लागल्याने आता हा वाद शांत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मागील काही वर्षांमध्ये बकरी ईदच्या निमित्ताने मुस्लिम समुदायाकडून दुर्गाडी किल्ला या भागात असलेल्या मशिदीत नमाज अदा केली जाते. मात्र या कालावधीत खबरदारीचा उपाय म्हणून मंदिर बंद ठेवले जायचे. त्यामुळेच या ठिकाणी हिंदुत्ववादी संघटना मोठ्या प्रमाणात आंदोलन करायच्या. बकरी ईदच्या दिवशी कल्याणच्या दुर्गाडी देवीच्या दर्शनासाठी बंदी घातली जाते. यावर्षीही जून महिन्यात बकरी ईदनिमित्त मंदिर बंद ठेवण्यात आल्यानंतर दुर्गाडी किल्ल्याबाहेर एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना अशा दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घंटानाद आंदोलन केले होते. आम्हाला मंदिरात प्रवेश दिला जात नाही तोपर्यंत आंदोलन सुरुच राहिल अशीही भूमिका घेतली होती. ९०च्या दशकात ठाण्याचे धर्मवीर आनंद दिघेंनी याचा विरोध करत या ठिकाणी घंटानाद आंदोलन सुरु केले होते. तेव्हापासून दरवर्षी या ठिकाणी घंटानाद आंदोलन करण्यात आले होते.

## व्यक्तिमत्व विकासासाठी मैदान हे सर्वोत्तम ठिकाण : विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा
## एमजीएम ऑलिंपिकचे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. १०: समकालीन काळामध्ये प्रत्येक कामासाठी आपण यंत्राची मदत घेत असल्याकारणाने आपले शारीरिक श्रम कमी होत आहेत. आपण समाजमाध्यमे, मोबाईल, संगणक यामध्ये व्यस्त असताना दिसत आहोत. याचा परिणाम म्हणून आपले मैदानी खेळांकडे काही प्रमाणात दुर्लक्ष होताना दिसत आहे. मात्र, मैदानी खेळकडे सर्वांनी लक्ष देत दररोज यासाठी काहीसा वेळ राखीव ठेवणे काळाची गरज आहे. आपले व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी आणि ते आंतरबाह्य बदलायचे असेल तर सर्वात चांगले ठिकाण म्हणजे मैदान असल्याचे प्रतिपादन विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांनी यावेळी केले.




महात्मा गांधी मिशनच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त यावर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून एमजीएम विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एमजीएम ऑलिंपिकचा उद्घाटन सोहळा आज मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत एमजीएम क्रिकेट स्टेडियम येथे संपन्न झाला. यावेळी, छत्रपती संभाजीनगर चे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांनी उपस्थित खेळाडूंशी संवाद साधला

यावेळी, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, सचिव अंकुशराव कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, उद्योजक रणजित कक्कड, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, क्रीडा संचालक नितीन घोरपडे क्रीडा विभागप्रमुख प्रा.डॉ. दिनेश वंजारे, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, खेळाडू व सर्व संबंधित उपस्थित होते.


पुढे बोलताना विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा म्हणाले, एमजीएम संस्थेची स्थापना १९८२ मध्ये झाली असून आज संस्थेंतर्गत सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात काम सुरू आहे. २०१५ पासून या एमजीएम ऑलिंपिकची सुरुवात झाली असून या ८ व्या ऑलिंपिकचे यशस्वीपणे आपण सर्वांनी यशस्वीपणे आयोजन केलेले आहे. यामध्ये सर्व सहभागी खेळाडूंचे मी अभिनंदन करीत आपणास स्पर्धेसाठी शुभेच्छा देतो. एमजीएममध्ये शिकलेले विद्यार्थी आज भारतासह जगामध्ये आपले नाव करीत आहेत. महात्मा गांधी यांच्या नावाने आपली ही संस्था कार्यरत आहे. महात्मा गांधी यांना खेळाची आवड होती.त्यांना क्रिकेट, टेनिस आणि फुटबॉल हे खेळ आवडत होते. त्यांनी दक्षिण आफ्रिकेमध्ये असताना तेथील लोकांना सोबत घेऊन ट्रान्स बॉल इंडियन फुटबॉल असोसिएशनची स्थापना केली होती. महात्मा गांधी यांनी शिक्षणासह शारीरिक श्रमाला महत्व दिले होते. विशेषत त्यांच्या शैक्षणिक धोरणात शारीरिक श्रमाला अग्रक्रमाने स्थान होते.

सर्व महान लोकांनी आपल्या जीवनामध्ये मैदानी खेळाला अनन्यसाधारण महत्व देत त्यांना आपल्या जीवनाचा भाग बनवलेले आहे. आज जे काही अधिकाऱ्यांचे गुण माझ्यामध्ये विकसित झाले आहेत, त्यामध्ये मी माझ्या प्रशिक्षण कालावधीमध्ये जे काही मैदानी खेळ खेळले त्यास योगदान देत असतो. आपण सर्वांनी आपल्या या अमूल्य शरीरासाठी दिवसातील ३० मिनिट वेळ देणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या दैनंदिन नियोजनात ३० मिनिटांची वेळ ही खेळासाठी राखीव ठेवली पाहिजे. प्रत्येकांनी कोणत्या ना कोणत्या एका खेळाची आवड जोपासत शारीरिकदृष्ट्या सुदृढ असायला हवे. आपल्यात नेतृत्व क्षमता, निर्णय क्षमता, ध्येय निश्चित करीत ते प्राप्त करणे हे सगळे गुण आपण मैदानात शिकत असतो. खेळामुळे आपण मानसिक आनंदासह शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहतो. विशेषत: यामुळे आपल्या जीवनात परिवर्तन होईल, असा विश्वास विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांनी व्यक्त केला.

दरवर्षी एमजीएम संस्थेंतर्गत असणाऱ्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'एमजीएम ऑलिंपिक' अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते. या स्पर्धेत एमजीएम संस्थेच्या नांदेड, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर येथील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला आहे. एमजीएमच्या सर्व विद्यार्थ्यांना एकत्रित येत एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने एमजीएम ऑलिंपिकची सुरुवात कुलपती अंकुशराव कदम यांच्या दूरदृष्टितून झाली आहे. आपण इतरांकडून शिकत पुढे जात राहायला पाहिजे. आपल्या व्यक्तिमत्त्वात खेळामुळे सुधारणा होत असल्याचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

आज झालेल्या उद्घाटन सोहळ्याच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या विविध महाविद्यालयांच्या संघाची मार्च पास परेड झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा संचालक नितीन घोरपडे यांनी केले तर आभार क्रीडा विभागप्रमुख डॉ.दिनेश वंजारे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.शशिकांत सिंग, डॉ.श्रीनिवास मोतीयेळे, डॉ. सदाशिव जव्हेरी, प्रा.रहीम खान, डॉ.अमरदीप असोलकर, बालाजी शेळके व सर्व संबंधितांनी आपले योगदान दिले आहे.

# इसमाची गळफास घेऊन आत्महत्या !



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१० डिसेंबर - शहरातील मेहताबनगर येथील इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि.१० रोजी घडली आहे, मेहताबनगर येथील रहिवासी अली मुसा शेख वय ४५ वर्ष या इसमाने आपल्या राहत्या घरात खिडकीला बेल्टच्या साहाय्याने सकाळी अकरा वाजेच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे, अली मुसा हे इसम दिव्यांग होते गळफास घेऊन आत्महत्या करण्याचे कारण मात्र अद्याप अस्पष्ट आहे घटनेची माहिती कळताच पोलिस उपनिरीक्षक केसरसिंग जारवाल, पोलिस कॉन्स्टेबल एस.पी. धोंडकर घटनास्थळी दाखल झाले, दुपारी कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ.रुपेश माटे यांनी मृत घोषित करून शवविच्छेदन केले अधिक तपास पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सलिम शाह करत आहे.

# ए पी एल शेतकरी लाभार्थ्यांना रोख रक्कम मिळणार

**एकूण लाभार्थी १५०५९**
**लाभ प्राप्त कार्ड ९३०३**
**एकूण लाभार्थी ३७९७०**
**पैसे प्राप्त ८,५३,३९,३५०/-**

**शिल्लक लाभार्थी १८७३१**

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१० डिसेंबर - तालुक्यातील ए पी एल शेतकरी लाभार्थी योजनेतील लाभार्थ्यांना अन्नधान्याएवजी थेट रोख रक्कम हस्तांतरण योजना ( १७० रुपये प्रति व्यक्ती प्रति महिना) सुरु करण्यात आलेली असून त्या अनुषंगाने शासन निर्णयानुसार ए पी एल शेतकरी योजनेतील लाभार्थ्यांना ए पी एल डी बी टी योजनेचा लाभ मिळण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज सादर करण्याबाबतच्या सूचना सर्व रास्तभाव दुकानदार यांचेमार्फत योजनेतील पात्र शिधापत्रिकाधारकांना सुचित करण्यात आलेले होते.

कन्नड तालुक्यातील १५ हजार ५९ ए पी एल शेतकरी शिधापत्रिकाधारकांपैकी ९ हजार ३०४ शिधापत्रिकाधारकांना आजपर्यंत थेट लाभ मिळालेला असून आजही तालुक्यातील ५ हजार ७५५ शिधापत्रिकाधारक हे थेट रोख रक्कम हस्तांतरण योजनेपासून वंचित आहे. -झङ उ्रढ कामकाज लवकरात लवकर पुर्ण व्हावे यासाठी लाभापासून वंचित असलेल्या -झङ शेतकरी योजनेतील लाभार्थ्यांची यादी संबंधित रास्तभाव दुकानदार तसेच ग्राम महसुल अधिकारी ह्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यानुसार -झङ उ्रढ लाभापासून वंचित असणाऱ्या -झङ शेतकरी लाभार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्जासह आवश्यक कागदपत्रे ( ७ / १२ ) ( छायांकित प्रत, सर्व सदस्यांचे आधार कार्ड छायांकित प्रत, महिला सदस्याचे बँक खाते ई.) संकलित करून तहसिल कार्यालयात पुरवठा विभाग येथे जमा करावे, असे आवाहन तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी केले आहे .

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा

छत्रपती संभाजीनगर,दि.१० - जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ चा आढावा आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी घेतला. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ तसेच सर्व यंत्रणाप्रमुख आदी उपस्थित होते. या बैठकीत जिल्हाधिकारी स्वामी यांनी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२३-२४ अंतर्गत मंजूर कामांची सद्यस्थिती, आवश्यक दायित्व निधीचे मागणी प्रस्ताव , १० डिसेंबर अखेर खर्चाची स्थिती, मंजूर कामांची माहिती, अखर्चित निधीचा तपशील तसेच सन २०२५-२६ करीता प्रारुप आराखडा यामुद्यांबाबत आढावा घेण्यात आला. तसेच जिल्हा विकास आराखडा तयार करण्यासाठी विभागनिहाय प्रस्ताव तयार करणे याबाबतही आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी कामे वेळेत व परस्पर समन्वयाने करावीत. वितरीत निधी वेळेत खर्च करतांना कामांचा दर्जा व गुणवत्ता उत्तम राखण्याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी सर्व यंत्रणांना दिले.

## जिल्ह्यातील ग्रामीण भागात मनाई आदेश

छत्रपती संभाजीनगर, दि.१०(जिमाका)- आगामी कालावधीत कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि.१८ डिसेंबर पर्यंत हे आदेश अमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## एम.सी.ई.डी. मार्फत उद्योजकता विकास प्रशिक्षण

छत्रपती संभाजीनगर,दि.१०(जिमाका)- महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र आयोजित उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि.१२ रोजी करण्यात आले आहे. जिल्ह्यामध्ये उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून युवक - युवतींकरीता एक महिना कालावधीचे प्रशिक्षण राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात व्यवसाय, मार्गदर्शन, व्यवसाय निवडीचे तंत्र, उद्योगाच्या विविध संधी, बाजारपेठ पाहणी, शासनाचे उद्योजकता विषयी धोरण, शासकीय योजनांची अनुदान विषयक संपूर्ण माहिती, प्रकल्प अहवाल तयार करणे, सिद्धी प्रेरणा, प्रशिक्षण, उद्योजकीय व्यक्तीमत्व विकास, विविध उद्योगांना भेटी, व्यवसायासाठी लागणारे परवाने, आयात - निर्यात क्षेत्रातील उद्योग संधी, डिजीटल मार्केटिंग, कर्जाची ऑनलाईन प्रक्रिया, कृषी माल प्रक्रिया उद्योग, अन्न व फळ प्रक्रिया उद्योग, प्लॅस्टिक व केमिकल उद्योग संधी, सोलर क्षेत्रातील उद्योगसंधी या सर्व विषयांवर तज्ज्ञ व्याख्यात्याकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन एमसीईडी विभागीय अधिकारी सुदाम थोटे, प्रकल्प अधिकारी श्रीमती प्रतिभा निमकर यांनी केले आहे. दि.१२ पर्यंत प्रवेश घेता येणार आहे. अधिक माहिती व संपर्कासाठी श्रीमती आशा कुरवाडे संपर्क क्रमांक ७८८८०८०४१९ व प्रत्यक्ष भेटीसाठी मुख्यालय महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) अ- ३८ एमआडीसी एरिया रेल्वे स्टेशन रोड येथे संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# विभागातील सर्व जिल्ह्यांनी ध्वजदिन निधी संकलन इष्टांक पूर्ण करावा- विभागीय आयुक्त दिलीप गावडे

## नव्या वर्षापासून जिल्हा प्रशासनाचा प्रत्येक महिन्यात 'एक दिवस सैनिकांसाठी' : जिल्हाधिकारी



छत्रपती संभाजीनगर,दि.१०(जिमाका)- देशाच्या सिमांचे रक्षण करण्याचे कर्तव्य बजावतांना प्रसंगी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांप्रती संपूर्ण देश नतमस्तक व कृतज्ञ आहे. अशा सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी उभारल्या जाणाऱ्या ध्वजदिन निधीत योगदान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विभागातील सर्व जिल्ह्यांनी आपापल्या जिल्ह्यात ध्वजदिन निधी संकलनासाठी दिला जाणारा इष्टांक पूर्ण करावा,असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिले.

जिल्हा प्रशासन येत्या सन २०२५ पासून दर महिन्यातील एक दिवस सैनिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार असून या दिवशी सैनिकांचे, माजी सैनिकांचे,त्यांच्या अवलंबितांची कामे विशेषत्वाने मार्गी लावण्यात येतील,असा संकल्प जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी ध्वजदिन निधी संकलन प्रारंभा प्रसंगी व्यक्त केला.

जिल्ह्यातील ध्वजदिन निधी संकलनाचा प्रारंभ आज विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते करण्यात आला. मौलाना आझाद संशोधन केंद्र येथील सभागृहात आज हा समारंभ पार पडला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर(निवृत्त) सय्यदा फिरासत, मेजर सुभाष साळवे, विंग कमांडर जाधव, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क क्षीरसागर तसेच माजी सैनिक, त्यांचे कुटुंबीय, वीरमाता, वीर पत्नी, वीर पिता आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते शहिद स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्व वीरमाता, वीर पत्नी, वीर पिता यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात कामगिरी बजावणारे माजी सैनिक, त्यांचे पाल्य यांनाही गौरविण्यात आले. आपल्या संबोधनात पोलीस अधीक्षक राठोड म्हणाले की, कोणत्याही देशाच्या प्रगतीमागे देशाच्या सीमा सुरक्षित असणे हे सगळ्यात महत्त्वाचे कारण असते. त्यासाठी योगदान देणारे सैनिक हे आपल्या देशाच्या प्रगतीला कारणीभूत असतात. त्यासाठी ते प्रसंगी प्राणाचे बलिदान देतात. त्यामुळे त्यांच्याप्रती कृतज्ञ असणे हे आपल्या सगळ्यांचे कर्तव्य आहे.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, जिल्ह्याला ध्वजदिन निधी संकलनासाठी १ कोटी २० लक्ष रुपये इतके उद्दिष्ट असले तरी जिल्हा १ कोटी ५० लक्ष इतके निधी संकलन करुन राज्यात प्रथम क्रमांक मिळवेल. या निधी संकलनात सगळ्यांनी आपला वाटा उचलावा. याशिवाय जिल्हा प्रशासन प्रशासकीय कामकाजात दर महिन्याला एक दिवस सैनिकांसाठी हा उपक्रम राबवुन सैनिकांचे त्यांच्या कुटुंबियांचे प्रशासनाच्यास्तरावरची कामे पूर्ण करेल.

विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सांगितले की, विभागातील सर्व जिल्ह्यांनी आपापल्या जिल्ह्यात दिलेले ध्वजदिन निधी संकलनाचे इष्टांक प्राधान्याने पूर्ण करुन संपूर्ण विभाग ध्वजदिन निधी संकलनात अव्वल ठेवावा,असे निर्देश त्यांनी दिले. तसेच ध्वजदिन निधीत सढळ हाताने आपले योगदान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ते प्रत्येक नागरिकाने द्यावे,असे आवाहनही त्यांनी केले.

प्रास्ताविक मेजर(निवृत्त) सय्यदा फिरासत यांनी केले. सूत्रसंचालन गौतमी आव्हाड यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कूल प्रवेश स्पर्धापरीक्षा २३ फेब्रुवारी रोजी

छत्रपती संभाजीनगर,दि.१०(जिमाका)- इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कूलमध्ये प्रवेशासाठी रविवार दि.२३ फेब्रुवारी २०२५ रोजी स्पर्धा परीक्षा होणार आहे, त्यासाठी विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज दि. २५ जानेवारी २०२५ पर्यंत पाठवाव, असे प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चेतना मोरे यांनी कळविले आहे.

अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांचे अधिनस्त येत असलेल्या प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आादिवासी विकास प्रकल्प, धारणी पांढरकवडा, किनवट, अकोला, छत्रपती संभाजीनगर, पुसद, कळमनुरी यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या १२ जिल्ह्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच सर्व शासन मान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी, ६ वी, ७ वी व ८ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जमातीचे विद्यार्थी यास्पर्धा परिक्षेसाठी पात्र राहतील. सर्व शाळेतील मुख्याध्यापकांनी प्रवेश परीक्षेचे आवेदन पत्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे सादर करावे. विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे विनामुल्य उपलब्ध आहेत. भरलेले अर्ज दि.२५ जानेवारी २०२५ पर्यंत संबंधित प्रकल्प कार्यालयाकडे मुख्याध्यापकांमार्फत सादर करावे. असे एकात्मिक आदिवासी प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर चे प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे यांनी कळविले आहे.

# टायटनच्या २० लाखांच्या महागड्या घड्याळ्यींची चोरी; चोरटा सीसीटीव्ही कॅमेर्यात कैद

### २० लाखांचा मुद्देमाल लंपास

**चोरट्याने दुकानामध्ये सर्वत्र फिरून फक्त महागडी घड्याळे, स्मार्ट वॉच, परफ्यूम, लेदरची पारिटे, कमरेचा बेल्ट आदींवर डल्ला मारला, सर्वाधिक घड्याळे फास्ट्रॅक, टॉमी हिलफिगर आणि टायटन कंपनीचे होती. विशेष म्हणजे चोरीला गेलेली बहुतांश घड्याळे १८ ते २० हजार रूपये दरम्यान किंमतीची आहेत. त्यात अंदाजे २२० महागडे घड्याळे, परफ्यूम, पाकिट, बेल्ट, मोबाईल आणि रोख ८ हजार रूपये असा २० लाखांचा ऐवज चोरीला गेल्याचा अंदाज दुकानमालक यांनी व्यक्त केला आहे.**

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : बजाजनगर येथील महावीर चौकातील टायटन घड्याळीचे शोरूम फोडून चोरट्याने तब्बल २० लाखांच्या महागड्या घड्याळ्यांची चोरी केल्याची घटना १० डिसेंबर रोजी सकाळी उघडकीस आली.

मालकीचे महावीर चौकात रोशन छाजेड यांच्या मालकीचे टायटन कंपनीचे घड्याळीचे शोरूम आहे. छाजेड नेहमीप्रमाणे सोमवारी रात्री दुकानाचे शटर बंद करून घरी निघून गेले होते. दुसर्या दिवशी नियमीत प्रमाणे सकाळी दुकान उघडण्यासाठी छाजेड व कामगार आले असता, त्यांना दुकानाचे शटर उघडे दिसले, त्यांनी शोरुममध्ये जाऊन पाहणी केली असता, शोरुममध्ये ठेवलेल्या २० लाखांच्या घड्याळींची चोरी झाल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ पोलिसांना या घटनेची माहिती दिली. याप्रकरणी एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

मंगळवारी पहाटे २.५१ वाजता चोरटा दुचाकीहून आला, सोबतच्या लोखंडी सळईने त्याने शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. पुढे २.५९ ते ३.४७ पर्यंत तोंडाला बांधून आलेल्या चोरट्याने दुकानातील फक्त महागड्या वस्तू चोरी केल्या. चोरट्याचा सर्व घटनाक्रम दुकानातील कॅमेर्यात कैद झाला आहे. दोन गोण्यामध्ये भरून दुचाकीच्या समोरील टाकीवर ठेवून नेल्याचे सीसीटीव्ही कॅमेर्यात दिसत आहे.

# वडनेर तांडा येथे रहिवासी संघाची स्थापना



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१० डिसेंबर - वडनेर तांडा येथे रहिवासी संघाची स्थापना करण्यात आली असून छत्रपती संभाजीनगर येथे राहत असलेले शासकीय,निमशासकीय अधिकारी, कर्मचारी व सिनिअर सिटीझन यांनी एकत्र येवून रहिवासी संघाची स्थापना केली आहे.

सेवानिवृत्ती नंतर जन सेवा हीच ईश्वर सेवा या व्रतानुसार सध्याच्या यूगात शहरात राहत असताना एकमेकांना मदतीसाठी साठी एक हात पुढे या उद्देशाने या रहिवासी संघाची स्थापना करण्यात आल्याची माहिती सेवानिवृत्त पोलिस अधिकारी नामदेव चव्हाण यांनी दिली आहे

या संघाच्या माध्यमातून तांड्या आरोग्य सेवा,शासकीय कामात मदत व्हावी यासाठी हा संघ स्थापन करण्यात आला आहे

संघाच्या अध्यक्षपदी भरत राठोड, उपाध्यक्ष नामदेव चव्हाण, खजिनदार ममराज राठोड, संयोजक भाऊराव राठोड, सचिव विनायक चव्हाण व ग्रूप संघटक संजय राठोड यांची निवड करण्यात आली असून सिनिअर सिटीझन चे प्रमुख रोहीदास चव्हाण ,दशरथ राठोड , एन पी चव्हाण, शंकर चव्हाण , डिंगाबर राठोड , त्र्यंबक राठोड , मांगीलाल राठोड नायक, मूलचंद चव्हाण ,सूभाष राठोड , फकीर राठोड ,राजेंद्र मोहन राठोड , भाऊ राठोड, विजय राठोड, विनायक चव्हाण, बदाम राठोड, अँव्होकेट खूमेश राठोड , प्रविण राठोड, योगेश चव्हाण, सुभाष आडे, मनोज चव्हाण, चूनिलाल राठोड ,राऊल राठोड आदींची निवड करण्यात आली आहे.

## बाल वैज्ञानिकांनी ३७ उपकरणांची केली मांडणी कौतुकास्पद : सोयगाव येथे विज्ञान प्रदर्शन उत्साहात



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१० डिसेंबर

शहरातील नॅशनल मराठी हायस्कूल सोयगाव माध्यमिक विद्यालयात मंगळवारी शालेय स्तरावर विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थी निर्मित एकूण ३७ उपकरण, प्रोजेक्ट सादर करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यालयातील गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक अमजात पठाण,परमेश्वर कठोरे, सुनील बावचे आदींची प्रमुख उपस्थिती होती माध्यमिक व माध्यमिक व उच्च माध्यमिक गट अशा दोन गटात झालेल्या या विज्ञान प्रदर्शनात सहावी ते आठवी या गटात प्रथम क्र- ,जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा फर्दापूर, द्वितीय क्र-अजिंठा व्हॅली इंग्लिश स्कुलचे प्रणवी विजय पगारे,आराध्या विकास मंडवे,यांना कचरा व्यवस्थापन या उपकरणे साठी मिळाला असून तृतीय क्र-कै बाबुरावजी काळे मराठी स्कुलचे धनश्री अमोल निकम या विद्यार्थिनीला वाहतूक दळणवळण यासाठी मिळाला दिव्यांग मध्ये प्रथम सरस्वती भुवन गोंदेगाव या शाळेने पटकावला आहे इयत्ता नववी ते बारावी या माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात प्रथम क्र-ना धो महानोर माध्यमिक विद्यालय वडगाव (ति) येथील जयेश नामदेव मोरे,मयूर मोरे या विद्यार्थ्यांना नैसर्गिक पद्धतीने शेती या विषयावर मिळाला आहे द्वितीय क्र-सरस्वती भुवन गोंदेगाव यांना मिळाला असून त्रितीय क्र-स्वामी दयानंद माध्यमिक विद्यालय तिडका यांच्या पवन ऊर्जा या उपक्रमाला तरबेज शेख सिद्धार्थ पवार या विद्यार्थ्यांना मिळाला आहे दिव्यांग मध्ये प्रथम माध्यमिक विद्यालय मोलखेडा यांना मिळाला आहे.

दरम्यान उपक्रमात हायड्रॉइक ब्रीज, कचरा व्यवस्थापन, वाहतूक दळणवळण, स्वयंमचलीत ऊर्जा निर्मिती यंत्र,पिठ मळणी यंत्र,नैसर्गिक शेती, पवन ऊर्जा, जल संसाधन,, ग्रास कटर, ब्लाइंड स्टिक, रेन डिटेक्टर कॅप, लाईफ सेविंग ड्रोन, घरघुती वॉटर फिल्टर, बहुउपयोगी कात्री असे विविध उपकरणे विद्यार्थ्यांनी तयार केले होते. सध्या वाढत्या उर्जेची मागणी लक्षात घेता विद्यार्थांनी स्वयंम चलीत ऊर्जा निर्मिती यंत्राचे संशोधन लक्षवेधी ठरले.प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थी निर्मित उपकरणांचे निरीक्षण करत बाल वैज्ञानिकांचे कौतुक केले.

## एमजीएममध्ये पहिल्या फोटोजेनी चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.१० : महात्मा गांधी मिशनचा ४२ वा वर्धापन दिन आणि दुसऱ्या एमजीएम युवा महोत्सवानिमित्त एमजीएम स्कुल ऑफ फिल्म आर्ट्स येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या फोटोजेनी चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन आज मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आज कानरयात आले. यावेळी, सुप्रसिद्ध छायाचित्रकार मिलिंद जोग, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, सचिव अंकुशराव कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, प्रा.शिव कदम, साउंड डिझायनर संकेत धोटकर, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

आज एमजीएम परिसरात क्रीजतोफ़ केसलोवस्की या प्रसिद्ध दिग्दर्शकाच्या रेड, ब्लु आणि व्हाईट या सिनेमाच्या थिमला अनुसरून 'स्टोरी टेलर हँड्स'च्या प्रतिकृतीचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. तसेच राज कपूर आणि ऋत्विक घटक यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या चित्रपटांच्या पोस्टर्सचे प्रदर्शनही येथे लावण्यात आले आहे.

आजच्या कार्यक्रमासाठी अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, उल्हास गवळी, नीलेश राऊत व सर्व संबंधित मान्यवरांनी सदिच्छा भेट देऊन सर्व कलाकारांना शुभेच्छा दिल्या. आज फोटोजेनी चित्रपट महोत्सवात १६ लघुपट, २ माहितीपट आणि १ पूर्ण लांबीचा चित्रपट दाखविण्यात आले. यामध्ये एमजीएम स्कुल ऑफ फिल्म आर्ट्सच्या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या चित्रपटांसह देशभरातील चित्रपटही दाखविण्यात आले. यामध्ये अंतिम निवड झालेले चित्रपट हे अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये दाखवण्यात येणार आहेत. मिलिंद जोग आणि संकेत धोटकर, कार्यक्रमाचे ज्युरी मेंबर्स म्हणून आपली भूमिका बजावली.

## बांगलादेशातील हिंदुवरील अत्याचाराविरोधात खुलताबादेत सकल हिंदु समाजातर्फे आंदोलन



तभा वृतसेवा

खुलताबाद - प्रतिनिधी आराम करायला गेलो प्रतिनिधी बांगलादेशातील हिंसाचारात त्या देशातील अल्प संख्यांक हिंदुवरील अत्याचार केले जात असुन, त्या विरोधात सकल हिंदु समाजातर्फे मंगळवारी (ता.१०) आंदोलन करण्यात आले.

खुलताबाद शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासुन सकल हिंदु समाजातर्फे संत महंताच्या उपस्थितीत तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात आला. या ठिकाणी बांगलादेशातील हिंदुवरील अत्याचाराबाबत तेथील शासनकर्त्यांनी कठोर कारवाई करावी, तेथील हिंदुंना सुरक्षता पुरवावी या मागणीचे निवेदन तहसीलदार स्वरुप कंकाळ यांना निवेदन देताना अभयानंदगिरीजी महाराज कैलास आश्रम वेरूळ , सद्गुरू आक्काताई महाराज नाथ आश्रम वेरूळ, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे, शहराध्यक्ष परसराम बारगळ, सतिष दांडेकर, गणेश अधाने, दिनेश अंभोरे, यांच्या हस्ते व सकल हिंदू समाजाच्या वतीने देण्यात आले.बांगलादेशातील हिंदू विरुद्ध अत्याचार मोदी सरकारने रोखावेत, सकल हिंदू समाजाची मागणी

# बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या हल्ल्याचा निषेध

## सकल हिंदुसमाजाचे कन्नड तहसीलदारांना निवेदन



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१० डिसेंबर - बांग्लादेशातील अल्पसंख्याक हिंदूवर होत असलेल्या अत्याचारावर संपूर्ण जगभरातून टीका होत आहे. संन्यासी चिन्मय कृष्ण दास यांनी अल्पसंख्याक हिंदूवरील अत्याचाराचा निषेध केला म्हणून त्यांच्या वर राजद्रोहाचा खटला टाकून त्यांना अटक करण्यात आलेली आहे. सदरील घटनेचा निषेध करत, भारत सरकारने हे अत्याचार थांबविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर योग्य ती भूमिका घ्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या संदर्भात कन्नड तहसिलदार विद्याचरन कडवकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,बांग्लादेशमध्ये ४ ते २० ऑगस्ट दरम्यान ५० जिल्हांमध्ये हिंदू समाजावर २००० हून अधिक जातीय हल्ले झाले. यामध्ये हिंदुंची घरे, हिंदू समाजाचे व्यवसाय आणि हिंदू समाजाची मंदिरे यांच्यावरील हल्याचा समावेश आहे. या हल्ल्यांमध्ये असंख्य हिंदू बांधवांची घरे आणि व्यवसाय जाळून, उध्वस्त करून अल्पसंख्याक हिंदू समाजाला रस्त्यावर आणले आहे. हिंदू महिलांवर अत्याचार करण्यात आले आहे. बांग्लादेश मधील हिंदू विरोधी भावना एवढ्या टोकाला गेली आहे कि, हिंदू महिलांवर सामुहिक अत्याचार झाल्याच्या घटना पुढे आल्या आहेत. बांग्लादेशमध्ये काही ठिकाणी तर हिंदूवर अत्याचार होत असताना बांग्लादेशाचे लष्करच स्वत: त्या अत्याचारांना सहकार्य करत सी. सी. टी. व्ही. कॅमेरे मोडून काढतानाचे दृश्य समोर आले आहे. बांग्ला देशातील नागरी सुरक्षेसाठी असणाऱ्या राज्य संस्थाच अल्पसंख्याक हिंदूवर होत असलेल्या अत्याचारास सहाय्य करताना समोर आल्याने संपूर्ण जगभरातील मानवाधिकार संस्थांनी चिंता व्यक्त करून येणाऱ्या काळात हे थांबवन्यासाठी प्रयत्न नाही झाले तर संपूर्ण हिंदू समाजाचे बांग्लादेशातील अस्तित्व धोक्यात येईल, अशी शक्यता वर्तवली आहे. बांग्लादेशातील हिंदूंच्या मानवाधिकारांचे संरक्षण करणे आणि मानवाधिकारांच्या बाजूने उभे राहणे अपल्या राष्ट्राचे आणि राष्ट्रातील नागरिकांचे कर्तव्य आहे. आज भारताने एक राष्ट्र म्हणून बांग्लादेश मध्ये असूरक्षित असलेल्या हिंदूंना मानवाधिकारांचे संरक्षण मिळावे.

आज आपल्या माध्यमातून आम्ही भारतीय राज्य शासनाला आमच्या भावना पोहचू इच्छितो कि, बांग्लादेश मध्ये अल्पसंख्यांक हिंदू बांधवांवर होत असलेले अत्याचार थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर योग्य अशी भूमिका घेवून अल्पसंख्याक हिंदू हिताचे योग्य ते पाऊल उचलावे,अशी अपेक्षा निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी अखिल भारतीय संत समितीचे प्रदेशाध्यक्ष गोपाल चैतन्य महाराज , सर्व चैतन्य महाराज , भरत महाराज , भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते , शहराध्यक्ष सुनील पवार , बजरंग दल तालुका संयोजक गणेश मोकासे , राष्ट्रीय स्वयंसेवक संघ निखिल अग्रवाल , रावसाहेब मुगले , भाजपचे , राजेंद्र गव्हाणे,संदेश पवार,गणेश घुगे,कैलास जाधव आदींसह भाजप , बजरंग दल , राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ,सकल हिंदू समाज बांधव उपस्थित होते .

## ▶▶ क्राईम वृत्त...



### चाकूर येथे हिंदू संघटना आक्रमक; प्रतिकात्मक पुतळ्याचे केले दहन

**चाकुर, दि.१० डिसेंबर -**

चाकूर येथील विवेकानंद चौक येथे सकल हिंदू संघटनेच्या वतीने बांगलादेशी हिंदूच्या मानवाधिकार,मालमत्ता आणि जिवाचे संरक्षण करण्यात यावे यासाठी तहसीलदार यांना दि.१० डिसेंबर रोजी निवेदन देण्यात आले. चाकूर शहरातील सर्व हिंदू संघटना विवेकानंद चौक येथे एकत्र येऊन बांगलादेशात हिंदूवर होत असलेल्या आमाणूष आत्याचाराच्या निषेधार्थ हिंदू संघटना आक्रमक होत घोषणाबाजी देण्यात आली. तसेच संबंधित घटनेचा निषेध नोंदवत प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. यावेळी चाकूर शहरातील सर्व व्यापार्यांनी आपली दुकाने बंद ठेऊन बांगलादेश येथील हिंदूवर होत असलेल्या घटनेचा तिव्र निषेध करून या आंदोलनात व्यापारी सहभागी झाले होते. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तालुका संघचालक गुणवंतराव जानकर, सुरज सोनटक्के, बालाजी कोईलवाड बजरंग दल जिल्हा संयोजक हणमंत शेळके, नितीन जानकर, मेघराज बाहेती, युवराज पाटील, संतोष माने, राजीव डिगोळे, माणषी सराफ, अॅड.श्रिधर सोनटक्के, बालाजी पासीमे, बालाजी गोडभरले, मोहन कुलकर्णी, अर्जुन भोईटे, महेश सोमवंशी, अॅड. पुरूषोत्तम शेटे सह विविध हिंदू संघटना व हिंदू बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



### इनरव्हील क्लबच्या वतीने लक्ष्मीबाई शाळेत दातांची तपासणी

**उदगीर, दि.१० डिसेंबर -**

लक्ष्मीबाई प्राथमीक शाळा गोपाळनगर येथे इनरव्हील क्लब ऑफ उदगीरच्या वतीने मंगळवारी शालेय विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना दाताची काळजी कशी घ्यावी, ब्रश कसे करावे, किड लागु नये म्हणुन काय काळजी घ्यावी या संदर्भात दंतरोगतज्ञ डॉ. सुप्रिया सोनटक्के, डॉ. शितल दापकेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन दातांची तपासणी करण्यात आली. यावेळी क्लबच्या वतिने ब्रश, पेष्ट, फळांचे वाटप करण्यात आले. इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा मानसी चन्नावार, सेक्रेटरी पल्लवी मुक्कावार, आयएसओ प्रिया नारखेडे, सदस्या रोहीनी साठे, सुजाता कोनाळे, तुलसी देशमुख, स्वाती बिरादार, मुख्यध्यापक मंगेश तोडकर शिक्षक कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### औशात पद्मश्री सतीश व्यासांचे संतूर वादन सोहळ्याचे आयोजन

**औसा, दि.१० डिसेंबर -**

समर्थ सद् गुरु श्री ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त जागतिक कीर्तीचे संतूर वादक पद्मश्री



पंडित सतीश व्यास यांचा संतूर वादन सोहळ्याचे आयोजन समाधी मंदिर गोपाळपूर येथे शनिवार दि.१४ रोजी आयोजित करण्यात आले आहे. शास्त्रीय गायन संगीत क्षेत्रातील जाणकार रसिक स्रोत्यांनी तसेच नाथ भक्तांनी या संगीत, गायनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन हभप. ज्ञानराज गुरुबाबा महाराज औसेकर यांनी केले आहे. सद्गुरु श्री ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या वार्षिक पुण्यतिथी उत्सवानिमित्त संगीत, गायन क्षेत्रातील जगविख्यात कलाकारांची कला सेवा दरबाराचे आयोजन करण्यात येते. यावर्षी दि.१४ रोजी समाधी मंदिरात सायंकाळी ४ वाजता या शास्त्रीय संगीताचा सेवा दरबार सोहळा संपन्न होत आहे.

### स्मशानभूमीच्या रस्त्यासाठी चापोली येथील ग्रामस्थांचा आत्मदहनाचा इशारा

**चाकूर, दि.१० डिसेंबर -**

चाकूर तालुक्यातील चापोली येथील सार्वजनीक स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता द्यावा या मागणीचे निवेदन ग्रामस्थाच्या वतीने उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांना देण्यात आले. चापोली येथील सार्वजनीक स्मशानभूमीत अंतवीधी साठी जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे ग्रामस्थांनी निवेदन देऊन उपोषण करूनही प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयासमोर सामुहिक आत्मदहन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनावर सुर्यकांत शेवाळे, निलेश मद्रेवार, रमेश पाटील, भाऊसाहेब हुलगुंडे, नवनाथ गोरगिळे, गणपत तेलंगे, लक्ष्मण पेटकर, गंगाप्रसाद मद्रेवार, नारायण काचे, युवराज भोसले यांच्या स्वाक्षरी आहेत.

### शांताबाई निटुरे यांचे निधन

**उदगीर, दि.१० डिसेंबर -**

माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे यांच्या मातोश्री श्रीमती शांताबाई प्रभूअप्पा निटुरे (वय ९६) यांचे वृध्दापकाळाने



मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी पहाटे ३.३० वाजता निधन झाले. शांताबाई प्रभूअप्पा निटुरे या धार्मिक आध्यात्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे व रामेश्वर निटुरे, तीन मुली, सुना, नातवंडे, पत्रवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता राज राजेश्वरी मंदिर मल्लापूर देगलूर रोड उदगीर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराच्या निषेधार्थ औशात आंदोलन





**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१० डिसेंबर -**

बांगालादेशात राहणाऱ्या हिंदू बांधवावर होत असलेल्या असहिष्णू आणि अमानवीय अत्याचारांमुळे हिंदू बांधव त्रस्त आणि व्यथित झाले आहेत. या अत्याचाराच्या निषेधार्थ सरकार व समाजकंटकांचा निषेध करुन जय श्रीरामच्या घोषणांनी शहरातील चौक दणाणुन गेला होता. हनुमान मंदीरासमोर मंगळवार दि.१० रोजी सकाळी ११ ते २ वाजेपर्यंत धरणे आंदोलन करीत औसा तालुक्यातील सकल हिंदू बांधवांच्या वतीने तहसिलदार यांच्या मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे अनेक मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

बांगला देशातील हिंदूच्या मंदीराची तोडफोड करुन अल्पसंख्यांक हिंदू अबालवृध्द व महिलावर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनेत दिवसेदिवस वाढ होत आहे. अशा मानवधिकार वृत्तीना रोखण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी उपस्थितांनी एकमुखाने यावेळी केली. चिन्मय कृष्ण महाराज यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करुन जबदरस्तीने आणि हिंसात्मक पध्दतीने अटक केली. हे निंदनीय व शासनास अशोभनीय कृत असून अशा अत्याचारिक कारवाई नंतर हिंदू समाजाने लोकशाही पध्दतीने केलेल्या आंदोलनास सरकारने हिंसात्मक पध्दतीने व अत्याचाराने चिरडले आहे. याचबरोबर चित्तागोंग मध्यवर्ती कारागृहात त्यांच्यावर अत्याचार करण्यात येत आहेत, असा आक्षेप यावेळी हिंदू सकल बांधवांनी घेतला आहे. यावेळी उपस्थित अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. दुपारी २ वाजता हनुमान चौकातून तहसिल कार्यालयापर्यंत बांगलादेश सरकारच्या विरोधात व हर हर महादेव, जय भवानी जय शिवाजी, वंदे मातरम्, जय श्रीराम जय जय श्रीराम च्या घोषणांनी शहरातील मुख्य रस्ता दणाणुन गेला होता. यांनतर तहसिलदार यांना निवेदन देण्यात आले. भारतीय हिंदू समाज बांगलादेशातील हिंदूवर होत असलेल्या अत्याचारा बद्दल सजग आहे. आणि औसा तालुक्यातील सकल हिंदू बांधवांच्या वतीने करण्यात आलेल्या मागण्या या जागतिक स्तरावर मान्य असलेल्या मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी केलेल्या आहेत.

या अत्याचाराच्या विरोधात व हिंदूच्या संरक्षणासाठी भारत सरकारकडून होणाऱ्या प्रत्येक निर्णयासोबत ठामपणे सोबत राहण्याचा निर्धार केला असल्याचे या निवेदनात सकल हिंदू बांधवांनी म्हटले आहे. यावेळी औसा शहरासह तालुक्यातील हिंदू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निलंगा येथे कडकडीत बंद...
## हिंदूचे छत्रपती शिवाजी महाराज चौकात धरणे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१० डिसेंबर -**

बांगलादेशातील हिंदू समाजावर, महिलांवर अत्याचार व साधू संतांचा छळाच्या विरोधात मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी सकल हिंदू समाजाच्या वतीने निलंगा येथील बाजारपेठ कडकडीत बंद ठेवण्यात आला. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सकल हिंदू समाजाच्या वतीने धरणे आंदोलन करत हिंदू बांधवांच्या वतीने बांगलादेशातील हिंदू वरील अन्याय अत्याचाराचा जाहीर निषेध नोंदविण्यात आला आहे.

बांगलादेशातील हिंदू समाजावर सातत्याने होणारे अन्याय, अत्याचार, महिलावर बलात्कार, साधु संतांचा अमानुष छळ या सारखा घटनां घडत आहेत. याच्या निषेधार्थ निलंगा येथील सकल हिंदूसमाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या बंद मध्ये येथील व्यापारांनी सहभाग नोंदवत आपले दुकाने बंद ठेवून या बंदमध्ये १०० टक्के सहभागी झाले. याबाबत येथील सकल हिंदू समाजाच्या तहसिलदारांना निवेदन देण्यात आले.

निलंगा शहरातील निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या बंदला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे. आज सकाळपासूनच हिंदू बांधव रस्त्यावर उतरत बांगलादेश सरकारच्या जाहीर निषेधच्या घोषणा देण्यात आल्या व होणारा अत्याचार तात्काळ थांबवावा अशी एकजुटीने मागणी करण्यात आली. या धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने हिंदू बांधवांची उपस्थिती होती. या कडकडीत बंदमध्ये चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## उदगीरात दुकानाला आग; २८ लाखाचे नुकसान

**अग्निशामनचे वाहन वेळेवर न आल्याने नुकसान जास्त झाल्याचा दुकानदाराचा आरोप**

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१० डिसेंबर -**

येथील भाजी मंडई परिसरात रविवारी रात्री साडेअकरा वाजता लागलेल्या आगे मध्ये दोन दुकाने जळून भस्मसात झाली आहेत. या आगीमध्ये दोन्ही दुकानाची मिळून २८ लाख ५० हजार रुपयाचे नुकसान झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. अग्निशामन दलाची गाडी वेळेवर आली नसल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा आरोप पीडित दुकानदाराने केला आहे.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की उदगीर शहरातील भाजी मंडई परिसरात बॉम्बे शूटिंग, शर्टींग नावाचे दुकान आहे. या दुकानांमध्ये ग्राहकांना त्यांच्या पसंतीचे कपडे खरेदी केल्यानंतर मोजमाप घेऊन शिलाई करून देण्याचे दुकान आहे. तर यांच्या बाजूलाच उबेद एअर कंडिशनर रेफ्रिजरेटर रिपेरिंग सेंटर नावाचे दुकान आहे. या ठिकाणी ग्राहकांचे फ्रिज, वॉशिंग मशीन, एसी, कुलर दुरुस्ती केल्या जात असे. रविवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास ही दोन्ही दुकाने नेहमीप्रमाणे बंद करून दुकान चालक घरी गेले होते. रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास यांच्या दुकानाला आग लागल्याचे प्रत्यक्ष दर्शनी नागरिकांनी पाहिले व आजूबाजूच्या दुसऱ्या लोकांनी दुकानदाराशी संपर्क करून झालेली घटना फोनवरून सांगितली. दरम्यान नगरपालिकेच्या अग्निशामक विभागाला सदरील घटना सुद्धा कळविण्यात आली होती. कपड्याचे दुकानात आगीने रौद्ररूप धारण केले बघता बघता ही दोन्ही दुकाने आगीच्या भक्षस्थानी पडली. आग लागून माहिती झाली असताना सुद्धा नगरपालिकेच्या अग्निशामक दलाचे वाहन तब्बल ४५ मिनिट उशिरा आल्याचा आरोप बॉम्बे शूटिंग शर्टींगचे मालकहमीद बागवान यांनी केला आहे. या आगीमध्ये विक्रीसाठी आणलेले कपडे, तसेच ग्राहकांच्या मापाचे शिवून तयार असलेले कपडे, शिलाई मशीन, टेलरिंगचे साहित्य व दिवसभर कपडे विक्रीतून आलेले २ लाख रुपये रोख असा २५ लाखाचा एवज जळाल्याचे त्यांनी पोलिसात माहिती देऊन कळवले असून उबेद एअर कंडीशनर रेफ्रिजरेटर रिपेरिंग सेंटरच्या दुकानात विविध प्रकारचे ग्राहकांचे दुरुस्तीसाठी आलेले फ्रिज, वाशिंग मशीन, एसी, कुलर दुरुस्ती करून ठेवलेले फ्रिज असा एकूण ८ लाख ५ हजार रुपयाचे नुकसान झाल्याची त्यांनी पोलिसांना कळवले आहे.

रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास नगरपालिकेचे वाहत आल्यानंतर त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवल्याचे तेथे उपस्थित असलेल्या नागरिकांनी सांगितले.

## शिरूर अनंतपाळ येथे सकल हिंदू बांधवाकडून रॅली





**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अ., दि.१० डिसेंबर -**

बांगलादेश मधील हिंदु व दलित समाजा वरील होत असलेल्या अत्याचार व दिनांक २६ नोव्हेंबर रोजी इस्कॉनच्या संबंधीत चिन्मय कृष्ण महाराज यांना खोट्या गुन्ह्यात अडकवून जबदरस्तीने आणि हिंसात्मक पध्दतीने केलेली अटक ही निंदनीय आणि कुठल्याही शासनास अशोभनीय आहे.

सदरील अटकेनंतर बांगलादेशातील हिंदू समाजाने लोकशाही पध्दतीने केलेल्या आंदोलनास हिंसात्मक पध्दतीने आणि अत्याचाराने चिरडण्यात आले.

याचबरोबर असेही लक्षात आले आहे की, चिन्मय कृष्ण महाराजांना चित्तागोंग मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे, जिथे त्यांना योग्य तो औषधोपचार आणि शाकाहारी भोजन मिळण्यास जाणीवपूर्वक अडचणी निर्माण करण्यात येत आहेत. ह्या बाबी जागतिक स्तरावर मान्य अशा मानवाधिकारांचे उल्लंघन करणाऱ्या आहेत.

म्हणून याच्या विरोधात आज शिरूर अनंतपाळ शहर व ग्रामीण भागामधील हिंदुसमांजाकडून धरने आंदोलन करुन तहसीलदार यांच्या मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते. माजी सभापती गोविंदराव चिलकुरे, भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, अनिल शिंदे, विकास शिंदे, गोविंद पोद्दार, सुभाष मर्डे, अचुतराव कुलकर्णी, रवींद्र कुलकर्णी, रत्नाकर सुगावे, सुरेश लोंडे, अॅड. योगेश बरदाळे, माधव चलमले, भागवत गड्डीमे, गणेश धुमाळ, गोविंदराव पाटील, राजनारायण बिरादार व तसेच सकल हिंदू समाजाकडून यावेळी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सव्वा लाखाच्या गुटख्यासह चार चाकी वाहन जप्त

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१० डिसेंबर -**

शहरातील नवी आबादी नागुरे मंगल कार्यालय जवळ एका घरातील गुटखा कारमधुन जिल्हा पोलीस अधीक्षकाच्या पथकाने कारवाई १ लाख २५ हजार रुपयांचा गुटखा व एक चार चाकी वाहन असा एकूण ६ लाख २५ हजार ३६५ रुपयाचा ऐवज जप्त करण्यात आला असून एकाविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रविवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास शहरातील नवी आबादी भागातील नागुरे मंगल कार्यालय जवळ आरोपीने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेले सूगंधीत पान मसाला ज्याची किंमत १ लाख २५ हजार ३६५ रुपयांचा माल हा त्याचे घरातून कार क्र.एम.एच.१२, के. जे. २७१७ ज्याची अंदाजे किमत ५ लाख रुपये असे एकुण ६ लाख २५ हजार ३६५ रुपयांचा माल आपले कब्जात बाळगुन वाहतुक करण्याच्या तयारीत असताना मुद्देमालासह मिळून आला. पोलीस अधीक्षक यांचे अवैध प्रतिबंधक पथकातील पोलीस उपनिरीक्षक आनंद नामदेव श्रीमंगल यांच्या फिर्यादीवरुन रविवारी शहर पोलीस ठाण्यात सिध्देश्वर उर्फ पंतू भालके (रा. नवी आबादी उदगीर) याच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## देवर्जन येथे दहा मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचे भूमिपूजन



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१० डिसेंबर -**

तालुक्यातील देवर्जन येथील ३३ केवी वीज उपकेंद्र अंतर्गत महादेव बेटाच्या जवळ दहा मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प क्षमता असलेल्या प्रकल्पाच्या कामाचा भूमिपूजन सोहळा देवर्जनचे सरपंच अभिजित साकोळकर यांच्या हस्ते बुधवारी झाले.

यावेळी सिध्दलींग शिवाचार्य स्वामी विरक्त मठ देवणीकर यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली.

देवर्जन ग्रीन एनर्जी प्रायवेट लि.चे संस्थापक मलिकार्जुन मानकरी, सिद्धेश्वर सहकारी बँकेचे संचालक विजयकुमार मानकरी, देवर्जन सहकारी सोसायटीचे अध्यक्ष दयानंद रोडगे, संचालक तानाजी रोडगे, राजकुमार गरीबे, दत्ता खटके, उपसरपंच वैजनाथ वाडीकर, श्रीनिवास धोतरे, विनायक धोतरे, गंगाधर गरीबे, विरभद्र धोतरे, प्रभुराव कोरे, रमेश कोतवाल, रेवण स्वामी, रणजीत मानकरी, विजयकुमार विळेगावे, संगप्पा कडगे, राम रुपनुरे, बालाजी बिरादार, बाळासाहेब पाटील, कमलाकर पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी मानकरी म्हणाले, देवर्जन उपकेंद्र अंतर्गत देवर्जन ग्रीन एनर्जी कंपनीच्या वतीने तीस कोटी रुपये खर्चुन दहा मेगावँट निर्मितीचा प्रकल्प उभारण्यात येत आहे.

येत्या चार महिन्याच्या काळात हा प्रकल्प कार्यवाहीन्वित होणार आहे. या उपकेंद्रांतर्गत असलेल्या सर्व शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी या प्रकल्पाची निर्मिती होत असून अवघ्या पाच सहा महिन्याच्या काळामध्ये या भागातील शेतकऱ्यांचे दिवसा वीज मिळण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पक दृष्टिकोनातून व मंत्री संजय बनसोडे यांच्या पुढाकारातून राबविण्यात येत असलेल्या धोरणानुसार येथे हा प्रकल्प मंजूर झालेला आहे.

# बांगलादेशातील हिंदूवरील अन्यायाविरोधात उदगीर येथे मानवी साखळी आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१० डिसेंबर -**

बांगला देशातील हिंदू समाजावर होत असलेले हल्ले व इस्कॉनचे धार्मिक नेते चिन्मय कृष्णदास यांनी बांगला देशातील हिंदू समाजाला जागृत करण्यासाठी केलेल्या आवहानामुळे बांगलादेशाने त्यांना देशद्रोहाच्या गुन्ह्यात अटक केली आहे.

न्यायालयातून सुध्दा त्यांना जामीन मिळला नसून त्यांच्यासाठी केस लढणाऱ्या वकीलावरही जवीघेणे हल्ला करण्यात आला आहे. यामुळे तेथील परिस्थिती खूप बिकट असून बांगलादेशाच्या सरकारने चिन्मय कृष्णदास यांना सध्या कोठे ठेवले आहे व ते कोणत्या परिस्थितीत आहेत याचीही माहिती सरकार देत नाही. आरक्षणाच्या नावाखाली बांगला देशात सुरु झालेल्या हिंसाचारामध्ये थेट हिंदू, दलित, जैन, शिख आदी धर्मावर हल्ले होत असून महिलांचे अपरहरण, बलात्कार, कत्तली केल्या जात आहेत. मंदिरे उद्ववस्त होत आहेत. पूर्णपणे षडयंत्र करून इस्लामीक राष्ट्र बवण्याची तयारी आहे.

तेथील हिंदू समाज भयभीत झाला असून त्यांना वाचवण्यसाठी व बांगलादेशावर दबाव आणावे यासाठी मानवी साखळी आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनात उदगीर तालुक्यातील सर्व राज्यकीय पक्षाचे पदाधिकारी, हिंदुत्ववादी संघटना, सामाजिक संघटना, मठ मंदिरातील पुजारी, संत, महंत, ट्रस्टी, ला.ब.शा.प्रा.चे मुख्याध्यपक, शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी छ. शाहू महाराज चौक ते तहसिल कार्यालयापर्यंत मानवी साखळी आंदोलनात विविध घोषणा देत राज्य व केंद्र सरकारचे हात बळकट करून बांगलादेशातील हिंदूना न्याय देण्यासाठी व चिन्मय कृष्णदास यांना जेलमधून बाहेर काढून त्यांना सुरक्षा देण्यास भाग पाडावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तहसीलदार यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

या साखळी आंदोलनाचे प्रमुख विश्व हिंदू परिषदेचे, शहराध्यक्ष महादेव घोणे, संतोष कुलकर्णी, सहमंत्री श्रीपाद करंजीकर, सह मंत्री आनंद महामुणी, उध्दव महराज, सतिश पाटील, प्रशांत ममदापूरे, अभिजीत पाटील, बाळासाहेब बिरादार, रोहित बोईनवाड, अनिकेत कोळी, रमेश सदानदे, बुर्ले, आनंद, सिद्धु अभंगे, रामेश्वर चांडेश्वरे हे प्रमुख होते. तर प्रमुख उपस्थिती साईनाथ चिमेगावे,



शंकरलिंग मठाचे मठाधिश सुखदेव महाराज, विश्वकल्याण यतीन्द्र आश्रम, विश्वसेवा विश्वकल्याण आश्रम, बालाजी महाराज जकनाळ यांच्यासह पतंजलीचे सुरेंद्र अन्कनगिरे, भाजपा माजी नगराधाक्ष बस्वराज बागबंदे, उपाध्यक्ष सुधीर भोसले, शहराध्यक्ष मनोज पुदाले, तालुकाध्यक्ष शिवशंकर धुप्पे, माजी जि.प. अध्यक्ष राहूत केंद्रे, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, वसंत शिरसे, जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, तालुकाधक्षा उषा माने, विधानसभा प्रमुख तथा ग्राप .सोमथपूर सदस्या शिवकर्णा अंधारे, बवीता पांढरे, अरुणा चिमगांवे, मनसे लातूर जिल्हाध्यक्ष संजय राठोड, मनोहर भंडे, सचिन साबणे, बंडेप्पा स्वामी, विश्वनाथ गायकवाड, आनंद बुंदे, अॅड. दत्ताजी पाटील, सावन पस्तापूरे, रामेश्वर पवार, पंडित सुर्यवंशी, कल्लप्पा स्वामी, पप्पू गायकवाड, डॉ. चंद्रकांत कोठारे, मोतीलाल डोईजोडी, यलमटे मामा, राम जाधव आदी शेकडोच्या संख्याने हिंदु प्रेमी उपस्थित होते.

या आंदोलनासाठी पोलिस प्रशासनाने वाहतूक व्यवस्था सुरळीत पार पाडली व आंदोलनातील हिंदु प्रेमींनी योग्य ते सहकार्य केल्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

## अग्रलेख...

# जाणता, अजाणता...

महाराष्ट्राच्या जनतेने स्पष्ट कौल देऊन संपूर्ण नाकारल्यानंतर निवडणुकीच्या निकालावर अविश्वास दाखवत अप्रत्यक्षपणे मतदारांच्या मानसिकतेवरच प्रश्नचिन्हे उमटविणारा आणि याआधी कधीच सिद्ध करता न आलेला मतदान यंत्रांतील फेरफाराचा जुनाच आरोप करत विधिमंडळ सदस्यत्वाच्या शपथविधीवरच बहिष्कार घालणारा एक अपरिपक्व प्रकार महाराष्ट्राच्या विधानसभेत विशेष अधिवेशनकाळात विरोधकांकडून घडल्याचे पाहावयास मिळाले. मरकडवाडीच्या ग्रामपंचायत निवडणुकीत मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याच्या मागणीस पाठिंबा देत व मतदानयंत्रांचा विरोध नोंदविण्याचे कारण सांगत विरोधकांनी उचललेले हे पहिले पाऊल अखेर विधानसभेतील विरोधी पक्षनेत्याची जागा मिळविण्याच्या व उपाध्यक्षपद विरोधकांना मिळावे या मागणीवर येऊन थांबले आणि बहिष्काराच्या निर्णयातून चुकलेले ते पाऊल मागे घेण्याचा मध्यममार्ग स्वीकारत विरोधकांनी सदस्यत्वाची शपथ घेण्याचा समंजसपणा दाखविला. मुळात, मतदानयंत्रांच्या विरोधातील कृती म्हणून शपथविधीवरच बहिष्कार घालण्याचा राजकीय निर्णय महाविकास आघाडीतील ज्या कोणा नेत्याच्या दबावामुळे अथवा मुत्सद्दीपणामुळे घेतला गेला असेल, त्याच्या या निर्णयाचे समर्थन महाविकास आघाडी जनतेसमोर कसे करणार ते अद्याप स्पष्ट झालेले नाही. कारण, शपथविधीवरच बहिष्कार घालण्याचा प्रकार कोणत्याच आघाडीने, पक्षाने किंवा जनतेने निवडून दिलेल्या उमेदवाराने याआधी केल्याची नोंद बहुधा विधिमंडळाच्या कामकाजाच्या इतिहासात पहिल्यांदाच झाली असावी. फेरफार झाल्याचा विरोधकांचा आरोप काही नवा नाही. ज्या ज्या वेळी विरोधकांना मतदारांनी पराभवाचे पाणी चाखावयास लावले आहे, तेव्हा तेव्हा मतदारांवर थेट अविश्वास न दाखविता आपल्या पराभवाचे खापर सत्ताधाऱ्यांवर फोडण्याचा सोपा मार्ग म्हणून विरोधकांनी याआधीही अनेक निवडणुकांत मतदानयंत्रांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्हे उपस्थित केली आहेत.

मुळात, महाराष्ट्र, हरयाणामधील निवडणुकांत महाराष्ट्रातील महाविकास आघाडीची किंवा विरोधकांच्या राष्ट्रीय पातळीवरील इंडिया आघाडीची धूळधाण उडाल्यानंतर तिची शकले होणे आता अपरिहार्य असल्याचे स्पष्ट संकेत मिळू लागले आहेत. या निवडणुकांत इंडिया आघाडीची धोरणे चुकली, दिशा भरकटली आणि नेतृत्वाची धुरा ज्यांच्या खांद्यावर सोपविण्याचा निर्णय इंडिया आघाडीने सार्वमताने घेतला, तो निर्णयदेखील चुकला. काँग्रेस हा आघाडीचा आधारस्तंभ ठरेल अशा समजुतीत असलेल्या जाणत्या नेत्यांना लोकांच्या मानसिकतेचा अंदाजदेखील आला नाही, हेच स्पष्ट झाले. नेतृत्वासाठी ज्यांच्यावर विश्वास टाकला ते नेतृत्व कुचकामी निघाल्याची भावना आता निकालानंतर उमटू लागली असल्याने, मुळात राहुल गांधी यांच्यावर नेतृत्वाची झूल चढविताना पराभवाचे खापर फोडण्याची तयारी सर्वांनीच केली होती का अशा शंकेसच अधिक वाव आहे. या निवडणुकांत काँग्रेसऐवजी शरद पवारांकडे किंवा ममता बॅनर्जीकडे इंडिया आघाडीचे नेतृत्व असते, आणि निवडणुकांची रणनीती त्यांनी आखली असती, तरी निकालात फारसा फरक पडला नसता याची बहुधा या जाणत्या नेत्यांना जाणीव असावी. त्याप्रमाणे झाले असते, तर पराभवाची जबाबदारी स्वीकारून आपल्या प्रदीर्घ राजकीय अनुभवाचा आणि कारकीर्दीचाच स्वहस्ते पंचनामा करावा लागला असता. ही शक्यता टाळण्यासाठीच या नेत्यांनी काँग्रेसचे राहुल गांधी यांना नेतृत्वाची झूल पांघरली असावी, अशी कुजबूज आता सुरू आहे. लोकसभेच्या निकालानंतर इंडिया आघाडीतील लहानमोठे पक्ष काँग्रेसच्या वळचणीस जाऊन या पक्षाचा आधार घेतील किंवा थेट काँग्रेसमध्ये विलीन होतील असे शरद पवार यांनी भविष्य वर्तविले होते, हे अनेकांस आठवत असेल. इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्यास काँग्रेसच योग्य आहे, यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी व काँग्रेसच्या गळ्यात नेतृत्वाची माळ घालून पुढे पराभव पत्करावा लागल्यास त्याचे खापर फोडणेही सोपे व्हावे यासाठीच त्यांनी काँग्रेसला हा बहुमान देण्याची धूर्त खेळी केली असावी, असे आता बोलले जात आहे. त्यामुळेच, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसनेच नेतृत्व केल्यास संभाव्य पराभवाचे खापर त्यांच्यावर फोडून पुढे त्या नेतृत्वास आव्हान देता येईल हीच कूटनीती होती, हे आता महाविकास आघाडीत व राष्ट्रीय पातळीवरील इंडिया आघाडीत उमटू लागलेल्या सुरावरून स्पष्ट होऊ लागले आहे. राहुल गांधी यांनी निवडणूक काळात उचलून धरलेला मुद्दा जनतेवर प्रभाव टाकू शकला नाही, किंबहुना तो प्रचाराचा मुद्दाच नव्हता, हे पराभवानंतर उमजावे, एवढे हे नेते निश्चितच अपरिपक्व नाहीत, तरीही त्यांनी काँग्रेसच्या या प्रचारनीतीबाबत फारशी प्रतिकूलता दाखविली नाही. अदानी-अंबानी यांच्या नावाने सातत्याने मोदी सरकारवर टीका करण्याचा एककलमी कार्यक्रम राहुल गांधी यांच्या आग्रहामुळे काँग्रेसलाही बहुधा नाईलाजानेच राबवावा लागत आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत प्रचाराचा मुद्दा म्हणूनही काँग्रेसने याच मुद्यावर भर दिला आणि त्याचा कोणताही प्रभाव मतदारांवर पडला नाही हे स्पष्ट झाल्यानंतरही, संसदेच्या अधिवेशनातही काँग्रेसला याच मुद्याची री नाईलाजाने ओढावी लागत असल्याचे दिसू लागताच आता इंडिया आघाडीच्या भविष्याला नव्या वाटा फुटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. अदानींच्या मुद्यावरून लोकसभेतील काँग्रेसच्या पवित्र्यास पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी असहमती दर्शविली आहे आणि हेच कारण पुढे करत आता इंडिया आघाडीच्या नेतृत्वाची झूल राहुल गांधी यांच्या पाठीवरून उतरविण्याच्या हालचालीदेखील सुरू झाल्या आहेत. इंडिया आघाडीत लहानमोठ्या प्रादेशिक पक्षांचे विलीनीकरण होणे दूरच, पण आता आहे त्या आघाडीतून बाहेर पडण्याचे निमित्त मात्र हे पक्ष शोधू लागले आहेत. थोडक्यात, जाणता नेता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवार यांनी निकालांबाबतचे त्यांचे निवडणूकपूर्व भाकीत प्रामाणिकपणाने केले असेल, तर ते साफ चुकले असे तरी म्हणावे लागेल किंवा केवळ पराभवाचे खापर फोडण्यासाठी काँग्रेसी नेत्यांची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने केले असे मानल्यास, त्यांचा तो डाव सफल झाला असेही म्हणता येईल. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारकाळात पवार यांनी इंडिया आघाडीस आणखीही एक आश्वासन दिले होते. देशात बदल घडवून आणण्यासाठी आम्ही इंडिया आघाडीच्या झेंड्याखाली एकत्र आलो असून सत्ता परिवर्तन घडवून महाराष्ट्रास योग्य रस्त्यावर आणल्याशिवाय हा म्हातारा स्वस्थ बसणार नाही, या त्यांच्या वाक्याने तेव्हा माध्यमांचे रकाने रंगले होते आणि इंडिया आघाडीच्या अपेक्षाही उंचावल्या होत्या. गेल्या निवडणुकीच्या प्रचारकाळात पावसात भिजून पवार यांनी विजय मिळवून दिला, तसा एखादा नवा चमत्कार ते घडवतील, असे त्यांच्या ज्या काही मोजक्या निष्ठावंतास खात्रीने वाटू लागले होते, त्यांना आतादेखील पवार यांच्या जाणतेपणाविषयी शंका वाटू लागल्या असतील, तर त्यात नवल नाही. थोडक्यात, आघाडीने आशेने पाहावे असे नेतृत्व नव्याने शोधण्याची किंवा आघाडी गुंडाळून आपापल्या दिशेने वाटचाल करण्याची वेळ आता इंडिया आघाडीतील लहानमोठ्या घटक पक्षांकरिता जवळ येऊ लागली आहे. शिवसेनेतील महाफुटीनंतरचा सर्वांत मोठा पराभव उद्धव ठाकरे यांना पाहावा लागल्याने, शिल्लक राहिलेल्या त्यांच्या पक्षासमोर अंतर्गत नेतृत्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. ठाकरे यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्हे उमटवूनच गेल्या काही दशकांत अनेक नेत्यांनी शिवसेनेचा निरोप घेतला होता. या पराभवामुळे सेनेतून बाहेर पडलेल्यांनी पूर्वी उमटविलेली ती प्रश्नचिन्हे अधिक ठळक केली आहेत. शरद पवार यांना अजित पवार यांनी थांबण्याचा सल्ला दिला होता. पवार यांनी तो धुडकावला, मी अजून म्हातारा झालो नाही, अशा आवेशपूर्ण उद्गारांनी त्यांनी आपल्या हाती उरलेल्या पक्षात उमेद भरण्याचा प्रयत्न केला, पण जनतेने मात्र अजित पवार यांच्याच सल्ल्यावर शिक्कामोर्तब केले असेही आता अनेकांस वाटू लागले असेल. असे असले, तरी आघाडीतून बाहेर पडण्याची वेळ आलीच, तर स्वबळाची जमवाजमव करण्याचे नवे आव्हान या पक्षांसमोर कायमच राहणार आहे.

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# २१ वी हवामान बदल परिषद यशस्वी की अयशस्वी?

अझरबैजान हा कॅस्पियन समुद्र आणि कॉकेशस पर्वतरांगा यात वसलेला देश आहे. अझरबैजानची राजधानी असलेले बाकू हे एक मुलखावेगळेच शहर असून ते समुद्रसपाटीपेक्षा २८ मीटर म्हणजे ९२ फूट खाली आहे. जगातल्या २०० देशांची उष्णतामान वाढ आणि हवामानातील बदल या विषयीची २९ वी परिषद बाकू येथे ११ ते २२ नोव्हेंबर २०२४ पर्यंत सुरू होती. या परिषदेचे पूर्ण नाव 'कॉन्फरन्स ऑफ पार्टीज' (कॉप) असे आहे. सध्या 'हवामान बदल' या विषयावर जगभर संशोधन सुरू आहे. जगभरातील शास्त्रज्ञ, सरकारे, राजकीय नेते दरवर्षी एकत्र येऊन दोन आठवडे या प्रश्नावर चर्चा करीत असतात. यावरून या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात यावे. हवामानात होत असलेले बदल हे आता केवळ बदल राहिले नसून त्यांना संकटाचे रूप प्राप्त झाले आहे. या संकटाचे निवारण कसे करता येईल, यावर या परिषदेत विचारविनिमय केला जात असतो. २७ वी परिषद इजिप्तमधील शर्म-अल-शेख येथे आणि २८ वी परिषद संयुक्त अरब अमिरातीमधील दुबई येथे पार पडली होती. या परिषदांना हजारोंच्या संख्येत प्रतिनिधी उपस्थित होते. उपस्थितांचा हा आकडा नोंद घ्यावी असाच आहे.

'हवामान अर्थपुरवठा' आणि 'नुकसान निधी' हे दोन मुद्दे 'कॉप २९' मध्ये अतिशय महत्त्वाचे ठरले आहेत. २००९ साली संयुक्त राष्ट्रांची हवामान बदल परिषद, ७ ते १८ डिसेंबर दरम्यान डेन्मार्कमधील कोपनहेगन येथील बेला सेंटर येथे आयोजित करण्यात आली होती. ही कोपनहेगन समिट म्हणून ओळखली जाते. या परिषदेत विकसित राष्ट्रांनी विकसनशील देशांना हवामान बदलाशी लढण्यासाठी निधी म्हणून दरवर्षी १०० अब्ज डॉलर द्यावेत, असे ठरले होते. २०१५ मध्ये पॅरिस करार संमत करण्यात आला. यावेळी या योजनेला २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. आता २०२४ मध्ये बाकू येथील कॉप २९ मध्ये हवामान बदलावर नव्याने विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. आता हवामान बदलामुळे जे देशांचे नुकसान होते आहे, त्याचे निवारण करण्यासाठी नुकसान भरपाई निधीही उभारण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. यासाठी ६६१ दशलक्ष डॉलरचे आश्वासन मिळाले असून ही जमेची बाजू आहे.

हवामान बदलाबाबत जे काही करायचे ते या शतकाच्या शेवटाच्या आधी करावेच लागणार आहे. कारण २२ व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच हवामान बदलाचे स्वरूप एवढे भयंकर असेल की, परिणामांवर नियंत्रण मिळविणे अशक्यप्राय होईल. १९९७ मध्ये कॉपची तिसरी परिषद जपानमधील यमाशिरो प्रांतातील क्योटो या शहरी झाली होती. या परिषदेत सकारात्मक निर्णय झाले होते. म्हणून ही परिषद विशेष महत्त्वाची मानली जाते. फ्रान्समधील पॅरिस येथे पार पडलेली २१ वी परिषदही अशीच पथदर्शक मानली जाते. हरित वायूंमुळे तापमान वाढीचे परिणाम नक्की कसे होतील, हे या परिषदांमध्ये विशद करण्यात आले होते. अतिपर्जन्यवृष्टी, त्यामुळे महापूर, कधी उष्णतेची लाट तर कधी थंडीचा कडाका, चक्रीवादळे आणि मुख्य म्हणजे समुद्राच्या पातळीत वाढ ही संकटे येतील, अशी सावधगिरीची सूचना देण्यात आली होती. हे टाळायचे असेल तर उष्णतामानातील वाढ १.५ अंश सेल्सिअसच्या आत राखावीच लागेल. समाधानाची बाब ही आहे की, या संकटाची गंभीर दखल घेण्यात आली आणि पुढे कॉप २२ ते कॉप २८ या कालखंडात म्हणजे २०१६ ते २०२३ या काळात काही भरीव कारवाईही झाली.

**बाकू परिषदेत चर्चिले गेलेले मुद्दे :** हवामान बदलाचा परिणाम कमी करणे. यानुसार हरित वायूंची निर्मिती एकदम थांबवता यायची नाही. पण सौर ऊर्जा किंवा वायू ऊर्जा निर्मितीचे प्रमाण वाढविता येणे सहज शक्य आहे तसेच यांची कार्यक्षमताही वाढविता येऊ शकते. संयुक्त अरब अमिरातीमधील दुबई येथे १३ ते ३० डिसेंबर २०२३ या काळात पार पडलेल्या २८ व्या परिषदेत या मुद्यावर सहमती झाली होती. बाकू परिषदेत या दिशेने आणखी वेगाने प्रयत्न करण्याचे ठरले. २१०० पर्यंत उष्णतामानवाढ १.५ अंश सेल्सिअसने कमी करायचे ठरले आहे. यासाठी हे प्रयत्न पुरेसे पडणार नाहीत. २०५० पर्यंत 'नेट झीरो' हे उद्दिष्ट गाठायचे आहे. नेट झीरो म्हणजे जेवढी हरित वायूंची निर्मिती तेवढेच त्यांचे निरसन होय. तसेच कर्ब आणि खनिज व इतर तेले यांचा वापर कोणी किती कमी करायचा याबाबतही विचारविनिमय झाला. जगात समुद्र किनारा असलेले, महासागरांनी वेढलेले अनेक लहान-मोठे देश आहेत. उष्णतावाढीमुळे लहान देशांवर संकटे यायला सुरुवातही झाली आहे. यांना आर्थिक मदत व सामना करण्यासंबंधीचे तंत्रज्ञान विकसित देशांनी पुरवावे, यावर बाकू परिषदेत एकमत झाले. हे साध्य करायचे तर पैसाच हवा; पण विकसित देश मदत करायला नाखूश असतात. आज देतो, उद्या देतो असे म्हणत उशीर तरी करतात; नाहीतर पुरेशी मदत न करताच अंग काढून घेतात. हे थांबले पाहिजे. जेमतेम १०० मिलियन डॉलरचा हवामान निधी (क्लायमेट फंड) २०२० मध्ये कसाबसा सुरू झाला. म्हणून एक नवीन फंड उभारण्यात आला. त्याला 'लॉस अ‍ॅण्ड डॅमेज फंड' असे नाव देण्यात आले. त्यात फक्त ८०० दशलक्ष डॉलरच गोळा झाले. म्हणून आता २९ व्या बाकू परिषदेत फक्त पैसा गोळा करणे, यावरच लक्ष केंद्रित करण्याचे ठरले आणि 'न्यू कलेक्टिव्ह क्वांटिफाईड गोल' हा फंड उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. पण हे केवळ शब्दांचे बुडबुडे ठरू नयेत.

कॉप परिषदेचा भाग मानली जाणारी संयुक्त राष्ट्रांची जैवविविधता परिषद (बायोडायव्हर्सिटी कॉन्फरन्स) संपन्न होत असते. यावर्षी ही कोलंबियातील काली या शहरी २१ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२४ या काळात पार पडली. यात जो विचारविनिमय झाला, त्यातील निष्कर्ष चिंताजनक आहेत. यानुसार अ) येत्या काही दशकात १० लाख प्रजाती नष्ट होतील. ब) कोट्यवधी हेक्टर जंगल दरवर्षी नाहीसे होत जाईल. तसेच ७ व ८ जून २०२४ मध्ये महासागर परिषद इटलीतील व्हेनिस येथे पार पडली. कॉप २७ इजिप्तमध्ये, कॉप २८ संयुक्त अरब अमिरातीमध्ये आणि कॉप २९ अझरबैजान येथे आयोजित होती. या तिन्ही देशांत लोकशाही नाही, तिथे हुकूमशाही आहे. संयुक्त अरब अमिरात आणि अझरबैजान हे खनिज तेल आणि वायूचे उत्पादन करणारे देश आहेत. या दोन देशांतच जगातील एकचतुर्थांश तेलाचे उत्पादन होते. तेलाचे उत्पादन कमी करा, असा आग्रह धरणाऱ्या कॉपचे शिखर संमेलन या दोन प्रचंड तेल उत्पादक देशात संपन्न व्हावे, हा फार मोठा विनोदच म्हटला पाहिजे. हवामान बदल वगैरे सर्व बकवास आहे. 'डिग बेबी डिग' म्हणजे अधिकाधिक तेल विहिरी खोदा म्हणून प्रचार करणारे डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाले आहेत. अशा परिस्थितीत अझरबैजानमध्ये पार पडलेली बाकू परिषद जेमतेम यशस्वी झाली, असेच म्हणावे लागते.

९४२२८०४४३०

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार?

मागील साडेतीन-चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार, असा प्रश्न विधानसभा निवडणुकीतंनर ऐरणीवर आला आहे. कधी कोरोनाच्या कारणामुळे तर कधी ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून या निवडणुका दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ठोस कारणाशिवाय रोखता येऊ शकत नसल्याची टिप्पणी केल्याने आगामी दोन-तीन महिन्यांत या निवडणुकांचा कार्यक्रम घोषित होण्याची शक्यता बळावली आहे. नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या निवडणुकांबाबत सकारात्मकता दर्शविल्याने राज्यात हालचाली सुरू झाल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कार्यकर्त्यांना आपली योग्यता सिद्ध करण्यासाठी साहाय्यभूत ठरत असल्याने या निवडणुकांमध्ये युतीची शक्यता पूर्णतः गृहीत धरता येत नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी शपथ घेतल्यानंतर स्पष्ट केले. अनेक जिल्हा परिषदांवर भाजपा आणि काँग्रेस अथवा राकाँ मिळून सरकार स्थापन झाल्याचे जनतेने पाहिलेले आहे. काही ठिकाणी मात्र समन्वयाने समविचारी पक्षांची युती अथवा आघाडी बघावयास मिळाली आहे. त्यामुळे युती करायची की नाही, हा स्थानिक पुढारी आणि कार्यकर्त्यांचा प्रश्न आहे. परंतु, या संस्थांवर दीर्घकाळापासून लोकप्रतिनिधीच नसल्याने विकासकामांना ब्रेक लागला आहे. त्यामुळे या निवडणुका होणे अत्यंत गरजेचे आहे. ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक अधिष्ठान मिळाले. परंतु, दीर्घ काळापासून एकाही महानगरपालिका अथवा जिल्हा परिषदेवर लोकप्रतिनिधी नसल्याने शहरांसह ग्रामीण भागातील विकासकामांचा खोळंबा झाला आहे. महाराष्ट्रात जालना ही नवीन महापालिका धरून एकूण २९ महानगरपालिका आहेत. तसेच २३२ नगरपालिका तर १२५ नगरपंचायती कार्यरत आहेत. एकूण ३६ जिल्ह्यांपैकी ३४ जिल्ह्यांचा कारभार जिल्हा परिषदांमार्फत चालतो. तर या जिल्हा परिषदांतर्गत एकूण ३५१ पंचायत समित्या कार्यरत आहेत. मात्र, या संस्थांवर लोकप्रतिनिधी नसल्याने सर्व कारभार प्रशसकांच्या हाती एकवटला आहे. शिवाय २८ हजार ८१३ ग्रामपंचायतींपैकी बहुतांश ग्रामपंचायतींच्या निवडणुका शेष असल्याने ग्रामीण भागात अनेक समस्या निर्माण झाल्या आहे. या सर्व समस्यांवर निवडणुका घेणे हाच एकमेव उपाय आहे.

२९ मे २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा राखली जात नसल्याच्या सबबीवर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षण रद्दबातल ठरविले. तत्कालीन ठाकरे सरकारने न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली. परंतु, योग्यरीत्या बाजू मांडण्यास हे सरकार असमर्थ ठरल्याने न्यायालयाने आपला निर्णय बदलविण्यास स्पष्ट नकार दिला. त्यावेळी केवळ सरकारच्या नाकर्तेपणामुळे ओबीसींचे राजकीय आरक्षण संपुष्टात आल्याचा आरोप झाला. परंतु, ठाकरे सरकारवर काहीही परिणाम झाला नाही. तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सरकारला वारंवार सूचित केले. परंतु, सरकारने त्यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्याने न्यायालयात ओबीसी आरक्षण टिकू शकले नाही. आता पुन्हा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्याने ओबीसी आरक्षणाबाबत सकारात्मकता निर्माण झाली आहे. परंतु, दीर्घ काळापासून रखडलेल्या निवडणुका घेण्याचा आदेश न्यायालयाने दिल्यास या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय घ्याव्या लागू शकतात. कारण, इतक्या कमी वेळात ओबीसी आरक्षणावर निर्णय येण्याची शक्यता कुठल्याही अंगाने वाटत नाही.

वर्धेचे तत्कालीन खासदार रामदास तडस यांनी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा वारंवार लावून धरला होता. आता या विषयावर गांभीर्य राखणारे सरकार सत्तेत आल्याने ओबीसी नेत्यांच्या अपेक्षांना पुन्हा बळ मिळाले आहे. अशाही परिस्थितीत आगामी दोन-तीन महिन्यांत निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यास या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय घ्याव्या लागण्याची दाट शक्यता आहे. ग्रामीण भागाच्या उत्थानासाठी शासनाच्या हजारावर योजना आहेत. परंतु, योजना राबविणारे सरपंच आणि सदस्यांचे मंडळच कार्यरत नसल्याने ग्रामीण भागातील बहुतांश विकासकामे ठप्प पडली आहेत. ग्रामसभाच होत नसल्याने गावातील समस्या मांडायच्या तरी कोणाकडे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शासन आणि न्यायालयीन व्यवस्थेने किमान नागरिकांची गरज म्हणून तरी या विषयावर तोडगा काढावा, अशी रास्त अपेक्षा संपूर्ण महाराष्ट्राची आहे.

९८८१७१६०२७

## दखल

**पंकज जयस्वाल**

# मोहम्मद युनूस आणि हिंदूंवर अत्याचार

जर तुम्ही हिंदू असाल आणि बांगलादेशात राहात असाल तर ही पृथ्वीवरील नरकाची जिवंत व्याख्या आहे. १९४६ च्या नोआखली दंगलीने बांगलादेशात हिंदूविरुद्ध मुस्लिम हिंसाचाराची सुरुवात केली, जी आजही सुरू आहे. बांगलादेशात हिंदूंवर होणारे जघन्य गुन्हे जगभरातील सर्व हिंदूसाठी एक इशारा आहे. मी हे का म्हणत आहे? तथाकथित मानवतावादी गट किंवा विविध क्षेत्रांतील सेलिब्रिटी, विशेषतः अनेक बॉलिवूड तारे, गाझा, सीरिया, लेबनॉनमध्ये जे घडत आहे त्याचा निषेध करण्यासाठी वेळ काढतात; परंतु पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि आता बांगलादेशात हिंदू अत्याचाराविरुद्ध कधीच निषेध करताना दिसत नाही. पाकिस्तानातही हिंदूंवरचे अत्याचार काही संपत नाहीत. जरी आपण १९२१ चा मोपला नरसंहार किंवा १९९० चा काश्मीर हिंदू नरसंहार पाहिला नसला, तरी अफगाणिस्तान आणि बांगलादेशात आपण दररोज हिंदूंवर अत्याचाराचे साक्षीदार आहोत.

काही तथाकथित मानवतावादी, अनेक भारतीय राजकीय पक्ष आणि स्वार्थासाठी दहशतवादी संघटनांना मदत करणाऱ्या काही देशांसाठी हिंदू असणं अयोग्य आहे का? नोबेल शांतता पारितोषिक विजेते बांगलादेशचे अंतरिम पंतप्रधान मोहम्मद युनूस यांच्या नाकाखाली होणारे अत्याचार हे उर्वरित जगासाठी एक इशारा आहे की, दहशतवाला समर्थन करणाऱ्या आणि मानवताविरोधी माणसाला शांततेचा नोबेल पुरस्कार कसा दिला गेला. मोहम्मद युनूस हा शांतता प्रस्थापित करणारा नसून मानवतेचा खुनी आहे. त्यांचे नोबेल पारितोषिक रद्द करावे का? अमेरिकेचे डीप स्टेट कसे मोहम्मद युनूसचा वापर करून बांगलादेश आणि हिंदूंना कमकुवत करण्यासाठी स्वतःच्या स्वार्थासाठी वापरत आहे. अमेरिकेसाठी किंवा मानवतेसाठी कोणतेही चांगले हेतू नसलेल्या या डीप स्टेट घटकांवर डोनाल्ड ट्रम्प आक्रमक कारवाई करतील, अशी आमची अपेक्षा आहे. पाकिस्तान हा बांगलादेशचा सर्वांत मोठा शत्रू आहे, परंतु युनूसचे पाकिस्तानशी असलेले संबंध दहशतवाद्यांबद्दलची सहानुभूती आणि भारतविरोधी भूमिका दर्शवतात. हिंदू संत आणि व्यावसायिकांनी बांगलादेशच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीला चालना देण्यासाठी कठोर परिश्रम केले, कठीण काळात मोठ्या संख्येने मुस्लिमांना मदत केली. मात्र, याच व्यक्तींचा अमानुष छळ करून त्यांची हत्या करण्यात आली. हिंदूंनी हा आकृतिबंध आणि वैचारिक पैलू खरोखर समजून घेतले पाहिजेत; सोप्या भाषेत सांगायचे तर 'शत्रुबोध' असणं महत्त्वाचं आहे.



अनेक राजकीय पक्षांचे, विशेषतः अनेक इंडिया आघाडीतील पक्षांचे हिंदूविरुद्धच्या अत्याचारांबद्दल मौन असते. सर्व हिंदूंना एक स्पष्ट संदेश यातून मिळतो, तुम्ही या पक्षांसाठी निवडणुकीचे एक साधन आहात आणि जर तुम्ही या शक्तींविरुद्ध एकजूट झाला नाही, तर तुम्ही पुन्हा गुलाम व्हाल. हे पक्ष हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराचे समर्थन करत आहेत का? बॉलिवूड सेलिब्रिटींनी हिंदूवर होणाऱ्या अत्याचारांवर टीका करताना कधी हिंदूंनी ऐकले आहे का? फक्त काही मोजक्या सेलिब्रिटींनी केलेली आहे. जगातील सर्वांत मोठी लोकशाही करोडो हिंदूंचे घर आहे. तथापि, बांगलादेशातील हिंदूंच्या विरोधात मुस्लिम कट्टरतावाद्यांनी केलेल्या क्रूर हिंसाचाराबद्दल चिंता किंवा तिरस्काराचे आवाज फारच कमी आहेत. भारतातील काही मीडिया आऊटलेट्स अशा अत्याचारांवर चर्चा किंवा हायलाईट करीत आहेत. हिंदूंनो, हे लक्षात ठेवा की, आपण कधीही कोणावर अन्याय केला नाही आणि भविष्यातही करणार नाही. तथापि, आपले अस्तित्व टिकविण्यासाठी सर्वस्वी हिंदू एकता मजबूत करणे, कोणत्याही अत्याचाराविरुद्ध संघटित होणे, बालपणापासून स्वसंरक्षण तंत्रासह सनातन संस्कृतीचे पालन करणे. संपूर्ण संत समुदायासाठी, लाखो अनुयायांसह जगाला हे दाखवण्यासाठी की, आम्ही हिंदूंवर कोणताही अन्याय किंवा मानवतेच्या विरोधात काहीही खपवून घेणार नाही. जगाला हिंदूंचे सामर्थ्य पाहू द्या. सनातन धर्म हा कोणत्याही धर्मविरोधी नाही, तर मानवतेसाठी कार्य करून जागतिक शांतता वाढविण्याची क्षमता त्यात आहे. सनातन धर्माची हानी मानवतेची आणि जागतिक शांततेची हानी आहे. त्यामुळे जगातील प्रत्येकाने ज्यांना शांतता हवी आहे, त्यांनी युनूस सरकार आणि तेथील लोकांनी हिंदूंवर केलेल्या गुन्ह्यांचा तीव्र निषेध केला पाहिजे आणि कारवाई केली पाहिजे. युनूसला समजू द्या की, तो डीप स्टेटच्या पाठिंब्याने मानवजातीविरुद्ध काम करू शकत नाही.

**हिंदूंच्या स्थितीकडे जगाने कसे पाहावे? :** ब्रिटिश कंझर्व्हेटिव्ह पक्षाचे खासदार बॉब ब्लॅकमन यांनी बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचारांचा तसेच इस्कॉनचे पुजारी कृष्ण दास यांना तुरुंगात टाकल्याचा तीव्र निषेध करीत म्हटले की, धार्मिक अल्पसंख्यकांचा छळ होऊ नये. ब्लॅकमनने यूकेच्या संसदेत हा मुद्दा उपस्थित केला, अल्पसंख्यक हिंदू लोकसंख्येची दुर्दशा अधोरेखित केली. त्यांनी सांगितले आहे की, हिंदूंची घरे आणि मंदिरांची जाळपोळ आणि प्राणघातक हल्ल्यांसह हिंसाचाराचा समावेश आहे. बांगलादेशातील एका हिंदू साधूच्या अटकेवर ब्लॅकमन यांनी ब्रिटनच्या संसदेत प्रश्न उपस्थित केला. बांगलादेशात इस्कॉनवर बंदी घालण्याच्या प्रयत्नाला 'हिंदूंवर थेट हल्ला' असे ते म्हणाले. जगाला हे माहीत असणे आवश्यक आहे की, भारतातील अल्पसंख्यक सुरक्षित आहेत आणि प्रगती करीत आहेत. कारण हिंदू बहुसंख्य आहेत. हिंदू बहुसंख्य नसताना काय होते हे पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेश दर्शवतात. मुस्लिम बहुसंख्य असलेल्या पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेशातील अल्पसंख्यकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. सक्तीचे धर्मांतर, खून, बलात्कार आणि देशातून हाकलून दिल्याने अल्पसंख्यक लोकसंख्येमध्ये लक्षणीय घट झाली आहे. मानवतावादी संघटना, विचारवंत आणि राजकीय नेते हिंदू अल्पसंख्यकांच्या या सर्वांत वाईट परिस्थितीकडे डोळेझाक करीत आहेत का? भारतात याच्या उलट घडत आहे, जिथे बहुसंख्य हिंदू जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये प्रगती करायला मदत करीत आहेत.

**भारतात संविधान सुरक्षित का आहे? :** संविधानाची मूळ वस्तुस्थिती अशी आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान जोपर्यंत हिंदू बहुसंख्य आहेत तोपर्यंत सुरक्षित आहे. त्यामुळे जातीच्या आधारावर हिंदूंमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करणारे राजकारणी आणि डीप स्टेट प्रत्यक्षात डॉ. आंबेडकरांच्या राज्यघटनेला विरोध करतात, असे मानायचे का? हिंदूंची संस्कृती कमकुवत का करायची आहे? हिंदूंनी व्यापक संशोधन आणि विश्लेषण केले पाहिजे. ते निःसंशयपणे हिंदू ऐक्याचे महत्त्व आणि विभाजित हिंदू समुदायाचे वाईट परिणाम जाणून घेतील.

हिंदूंनो, कृपया लक्षात ठेवा, 'एक है तो सुरक्षित है... बटेंगे तो कटेंगे.'

७८७५२१२१६१

## भ्रष्टाचार विरोधी दिवस

९ डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिवस म्हणून साजरा करतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी याच मुद्यावर २०१४ साली निवडणूक लढले व प्रचंड बहुमताने निवडून आले. एक सामान्य माणूस या घोषणेने प्रभावित झाला. कारण प्रत्येक ठिकाणी लाच दिल्याशिवाय काम होतच नव्हते. त्यामुळे जनतेने मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपाला सत्ता मिळवून दिली. २०१४ साली जेव्हा मोदींचे सरकार बनले तेव्हा आपला देश १८० देशांमध्ये भ्रष्टाचारात ८५ व्या नंबर वर होता तोच २०२३ साली ९५ वर आला याचा अर्थ असा आपल्या देशात भ्रष्टाचार कमी न होता वाढला. याला काय कारण असावे हे सरकारने शोधायला पाहिजे. सामान्य जनतेने भ्रष्टाचार हा त्यांच्या जीवनाचा भाग झाला आहे हे मान्य केले आहे असे वाटते. कोणाचेही सरकार येवो भ्रष्टाचार हटवणे हे मृगजळ आहे. सामान्य नागरिक एक एक पैशाकरिता मेहनत करतो व भ्रष्टाचारी लोक दोन नंबरच्या पैशावर ऐषआरामात जगतात, हीच वस्तुस्थिती आहे.

**राजेंद्र मनोहर वाडी**/नागपूर

## उद्धवजी, आता तरी आत्मचिंतन करा

नुकत्याच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका झाल्या. महाविकास आघाडी व महायुती यामध्ये अटीतटीची लढत होईल असे एक्झिट पोल व तज्ज्ञांचे अंदाज असतानाही, ही



लढत एकतर्फी झाल्यासारखी होऊन महायुतीने २८० पैकी २३४ जागा मिळवून महाविकास आघाडीचा सुपडा साफ केला. विधानसभेतील दारुण पराभव पाहून उद्धव ठाकरेंना धक्का बसलेला दिसतो. त्यांनी व त्यांचे प्रवक्ते संजय राऊत यांनी कुछ तो गडबड है म्हणत ईव्हीएमला दोष देऊन पराभव अमान्य केला. एक प्रकारे जनमताचा अनादर केला. भारतात निवडणुकीत पराभूत पक्ष ईव्हीएमवर दोषारोपण करतो. त्याप्रमाणे याही निवडणुकीत झाले त्याबद्दल काही विशेष नाही. जर खरोखरच ईव्हीएममध्ये दोष असेल किंवा तो आढळला तर विरोधी पक्षापैकी कोणीही त्याबद्दल योग्य पुरावे देऊन तो सिद्ध करावा जनतेच्या समोर आणावा. जर त्यात दोष सिद्ध झाला तर जनताच योग्य तो न्याय करेलच व ईव्हीएममधील दोष समोर आणल्याबद्दल तुमचेही कौतुक करेल.

ईव्हीएममध्ये खरोखरच दोष असेल तर तो उघडकीस येऊन सिद्ध होईपर्यंत उद्धवजी आपण आजपर्यंतच्या यशापयशाबद्दल आता तरी थोडे आत्मचिंतन करावे असे वाटते. आता तरी यासाठी म्हणतो की, जेव्हा एकनाथ शिंदे व सहकाऱ्यांनी आपली साथ सोडली तेव्हाही तुम्हाला आत्मचिंतनाची संधी होती. जरा प्रथमपासूनच सुरुवात करू या. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा-सेना युतीचा प्रचार करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी स्पष्टपणे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवीत असल्याचे जाहीर सभेत सांगत असताना जर आपल्या म्हणण्याप्रमाणे अमित शाह यांनी बंद खोलीत आपल्याशी मुख्यमंत्र्याबाबत आश्वासन दिले होते असे म्हणता तर आपण स्टेजवर त्याचवेळी याचे खंडन का केले नाही. म्हणून वाटते, हिंदुत्वाची कास धरा, पुन्हा एकदा सेनेला भरभराटीचे दिवस येतील. मतदारांच्या सूचनांचे पालन करून आपण आत्मपरीक्षण करावे, हीच इच्छा.

**भालचंद्र ठोंबरे**/९८३४३५०८९५

## वाचक पत्रे

## आता खरी परीक्षा आर्थिक आघाडीवर

'आता महाराष्ट्र थांबणार नाही' ही बातमी वाचली. बहुचर्चित निवडणुका आटोपून महायुतीचे पर्व नव्याने सुरू झाले. भाजपाला देदीप्यमान यश मिळाले तरी युती-धर्माचे पालन करत भाजपाने इतर दोन सहकाऱ्यांशी सामंजस्याचीच भूमिका ठेवली हे कौतुकास्पद आहे. निवडणुकांआधी मतदारांना आकृष्ट करण्यासाठी अनेक आश्वासने देण्यात आली. आचारसंहितेआधी मंत्रिमंडळाने अनेक फटाफट निर्णय घेतले, ज्याचा आर्थिक भार राज्याच्या तिजोरीवर पडेलच. विशेषतः १५०० रुपये महिना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा वार्षिक भारच ४६००० कोटींचा आहे. आता या योजनेअंतर्गत २१०० महिना देण्याचेही आश्वासन दिले गेले आहे. ज्यामुळे तिजोरीवरील भार ६०००० कोटींपर्यंत जाईल असा अंदाज आहे. राज्याच्या तिजोरीच्या स्थितीनुसार अंदाजे ६७ टक्के खर्च हा कर्मचारी वेतन, निवृत्ती वेतन, जुन्या कर्जावरील व्याज यावर होतो असे तज्ज्ञ सांगतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सर्व क्षेत्रातील बाबींचा अनुभव आणि जाण आहे. आता त्यांच्या समोर आपल्या मंत्रिमंडळातील दोन प्रमुख सहकाऱ्यांच्या तसेच राज्यातील इतर कोणाच्याही आर्थिक बोजा वाढवणाऱ्या अवाजवी अपेक्षांना लगाम लावून राज्याची आर्थिक घडी ताळ्यावर आणायचे प्रमुख आव्हान असेल. या सरकारला येणाऱ्या पाच वर्षांत राजकीय अस्थिरतेचा यत्किंचितही धोका नाही त्यामुळे देवेंद्र फडणवीस आत्मविश्वासाने राज्यहिताचे निर्णय कोणाचाही मुलाहिजा न ठेवता घेतील आणि राज्याचा गाडा निर्विघ्नपणे चालवतील अशी अपेक्षा ठेवू या.

**राम राजे**/९४२१७७९९४५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# अंबाजोगाईत विराट हिंदू शक्तीचे प्रदर्शन

## बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचार थांबवण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१० डिसेंबर**

बांगलादेशातील हिंदूंवर होणारे अनन्वित अत्याचार थांबवावेत या मागणीसाठी मंगळवार दि.१० डिसेंबर २०२४ रोजी अंबाजोगाईतील विराट हिंदू शक्ती एकजुटीने रस्त्यावर उतरली होती.

मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून अंबाजोगाईतील विविध हिंदू संघटना बांगलादेशातील हिंदूंवर होणारे अनन्वित अत्याचार थांबवावेत या मागणीसाठी एकजुटीने रस्त्यावर उतरले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व हिंदू समाज बांधवांनी बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात व हिंदू मंदिरे पाडण्याच्या निषेधार्थ छत्रपती शिवाजी महाराज चौकात तीव्र निदर्शने करण्यात आली. अंबाजोगाईतील हिंदू समाजाच्या वतीने राष्ट्रपतींची नावे येथील उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.या निवेदनानुसार बांगलादेशातील हिंदू व इतर सर्व अल्पसंख्यांक समाजावर कट्टरता वाद्यांकडून होणारे हल्ले, लुटमार जाळपोळ, महिलांवरील हल्ले रोखण्यात यावे व हे अत्याचार तात्काळ थांबवले पाहिजेत अशी एकमुखी मागणी दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. अंबाजोगाई येथील सर्व हिंदुत्ववादी संघटनांनी एकत्र येऊन बांगलादेशच्या विरुद्ध निषेधाच्या घोषणा दिल्या.

वंदे मातरम, जय श्रीराम, भारत माता की जय, बांगलादेश मुर्दाबाद, आदी प्रचंड घोषणा देत हा जन आक्रोश मोर्चा शहराच्या प्रमुख मार्गावरून निघाला होता. सर्वत्र भगवे ध्वज,निषेधाचे फलक घेऊन तरुणाई व मातृ शक्तीची संख्या लक्षणीय होती.



## मित्राची पार्टी भोवली.! अंबासाखर कारखान्या जवळ समोरून येणाऱ्या ट्रकला स्विफ्ट कारची जोराची धडक, लातूर जिल्ह्याच्या कारेपूर गावातील चौघांचा मृत्यू, दोघे जखमी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१० डिसेंबर**

मित्राची पोलीस मध्ये निवड झाल्यामुळे जेवणाच्या पार्टीसाठी स्विफ्ट कार ने गेलेले मित्र परत येत असताना त्यांच्या स्विफ्ट कार व ट्रकचा समोरासमोर भिषण अपघात होऊन कार मधील तिघेजण जागीच ठार तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली असून दोघेजण जखमी आहेत. जखमी दोघांवर अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात आज सकाळी ७.०० वाजताच्या दरम्यान झाला आहे. अपघातातील सर्वजण हे कारेपूर ता. रेणापूर, जिल्हा लातूर येथील रहिवासी आहेत. घटनेनंतर कारेपूर गावावर शोककळा पसरली आहे.

मित्राची पुणे येथे पोलीस मध्ये निवड झाल्यामुळे आनंदासाठी स्नेही भोजनाचे आयोजन केले होते. लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील कारेपूर या गावचे मित्र दि. ९ डिसेंबर सोमवारी रात्री जेवणासाठी मांजरसुंबा (जिल्हा बीड) जवळ गेले होते. तेथे जेवण करून पहाटे मांजरसुंबा येथील ब्रिज खाली शेकोटी करून चार वाजता स्विफ्ट कार क्रमांक एम एच १४, एल एल ६७४९ मांजरसुंबा येथून निघून पुढे अंबासाखर कारखाना मार्गे रेणापूरकडे महामार्गाने जात असताना अंबासाखर कारखाना जवळ समोरून येणाऱ्या ट्रकला समोरासमोर शिफ्ट कारची धडक झाल्यामुळे कारचा चुराडा होत शिफ्ट कार मधील तिघांचा जागेवरच मृत्यू झाला झाला. यात मयत १) बालाजी शंकर माने (वय २७), २)फारुख बाबुमिंया शेख (वय ३०), ३)दिपक दिलीप सावरे( वय २८) , ४) ऋतवीक गायकवाड (रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू) यातील जखमी १) मुबारक शेख, २) अजिम पाशुभाई शेख (३० वय) (पोलीस निवड) स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान अपघाताची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामा पडवळ पोलीस कर्मचारी नाना राऊत व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी धाव घेत जखमींना पुढील उपचारासाठी तात्काळ रुग्णालयात हलवले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान हा महामार्गवर आजपर्यंत अनेक अपघात झाले असून या महामार्ग चौपदरी करण्याची मागणी करण्यात येत आहे.



## संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांवर गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० डिसेंबर**

दि.९ डिसेंबर २०२४ रोजी मस्साजोग ता.केज गावचे माजी सरपंच संतोष पंडीतराव देशमुख यांचे आरोपी सुदर्शन घुले रा. टाकळी ता. केज व इतर पाच आरोपींनी अपहरण करुन खुन केलेबाबत पोलीस स्टेशन केज गु.र.नं. ६३७/२०२४ कलम १४०(१),१२६,११८(१), ३२४(४)(५), १८९ (२), १९१(२), १९० भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर घटनेचे गांर्भिय लक्षात घेऊन अपर पोलीस अधीक्षक, बीड पांडकर, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके यांनी घटनास्थळी धाव घेऊन पोलीस निरीक्षक उस्मान शेख, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, केज यांना योग्य त्या सुचना देऊन आरोपींचे शोध कामी तात्काळ पथके रवाना करुन गुन्हयातील आरोपींचा वाशी, धाराशिव परीसरात शोध घेत असतांना पोलीस निरीक्षक उस्मान शेख, स्था.गु.शा. बीड, प्रशांत महाजन, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन केज यांना मिळालेल्या माहीतीवरुन सदर गुन्हयातील आरोपी नामे (१) जयराम माणिक चाटे वय २१ वर्षे रा. तांबवा ता. केज (२) महेश सखाराम केदार वय २१ वर्षे रा. मैंदवाडी ता.धारुर यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपींना विश्वासात घेऊन इतर आरोपींचा शांध पोलीस घेत आहेत.

गुन्हयात सहभागी प्रत्येकावर कडक कायदेशिर कारवाई करण्यात येणार असुन नागरीकांनी अफवावर विश्वास ठेवु नये असे आवाहन प्रभारी पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी केले आहे.सदरची कारवाई प्रभारी पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई, कमलेश मिना, सहायक पोलीस अधीक्षक, उपविभाग केज यांचे मार्गदर्शनाखाली उस्मान शेख, पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड, प्रशांत महाजन, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन केज, पोउपनि श्री. विघ्ने, सपोउपनि औताडे, जाधव, पोह/ शेलार, हंगे, कोरडे स्था.गु.शा. बीड यांनी सदरची कारवाई केली आहे.

## टाकळी येथे प्रथमच लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१० डिसेंबर**

केज तालुक्यातील मौजे टाकळी, ता केज येथे लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७५ व्या जयंती निमित्त सुप्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. आदिनाथ महाराज लाड, आळंदी देवाची, यांचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन युवा भाजपा नेते सुरज रामकृष्ण घुले यांनी केले होते.

यावेळी ज्येष्ठ भाजपा नेते नंदकिशोरजी मुंदडा (काकाजी), कृ उ बा स सभापती अंकुशराव इंगळे, उपसभापती डॉ नेहरकर, संचालक नेताजी शिंदे (पापाजी), शरदराव इंगळे, मा. जि. प. सदस्य रमाकांत बापू मुंडे, मा. उपसभापती अशोकराव मोराळे, मा पं. स सदस्य सुदाम पाटील, लक्ष्मणराव घुले, अरुण पाटील, दिनकर चाटे, संभाजी तांबडे, शामराव घुले व इतर मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन टाकळी येथील सुरेश घुले, विष्णू राख, रामा घुले, महादेव घुले, प्रकाश बारगजे, रघुनाथ बारगजे, टी. पी. घुले, रामधन बारगजे, श्रीकृष्ण बारगजे, सिद्धेश्वर बारगजे, हनुमंत बारगजे, राहुल बारगजे, मकरंद बारगजे, श्रीकांत बारगजे, दिनू भाऊ घुले, बळीराम घुले, सर्व युवक व ग्रामस्थांनी केले. यावेळी महाराजांनी संत तुकाराम महाराजांचा आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ।। कुळीं कन्यापुत्र होतीं जीं सात्त्विक । तयाचा हरिख वाटे देवा ।। या अभंगावर कीर्तन केले. या कार्यक्रमासाठी चिंचोली माळी जि. प. सर्कल माधिल हजारो भाविकांनी उपस्थिती लावली व महाप्रसादाचा लाभ घेतला.

## पंकजाताईंच्या नेतृत्वात सर्वांना बरोबर घेऊन बीड जिल्हा भाजपचा बालेकिल्ला करणार-शंकर देशमुख



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१० डिसेंबर**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात सर्वांना बरोबर घेऊन बीड जिल्हा भाजपचा बालेकिल्ला करण्यासाठी भाजप सदस्य नोंदणी मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांनी करावी असे आवाहन भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले.

माजलगाव तालुका भाजप सदस्य नोंदणी अभियान शुभारंभ प्रसंगी बोलताना शंकर देशमुख म्हणाले प्रत्येक कार्यकर्त्याने किमान ५०० भाजपचे सदस्य करावेत कार्यकर्त्यांच्या पक्ष कामाचे मुल्यमापन होणार असुन त्यांची दखल घेतली जाणार आहे या वेळी पक्ष कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले आहे या कार्यालयातुन जनमाणसांची कामे व्हावीत अशी अपेक्षा व्यक्त करुन कार्यकर्त्यांच्या मागे पक्ष खंबीरपणे उभा राहणार असल्याचे सांगितले या वेळी नवनाथ आण्णा शिराळे तालुका अध्यक्ष अरुणराव राऊत सदस्यता अभियान तालुका संयोजक अशोक तिडके प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रशांत पाटील विनायक रत्नपारखी आदींची सदस्य नोंदणी करण्याचे आवाहन केले यावेळी ज्ञानेश्वर मेंडके हनुमान कदम विनायक रत्नपारखी बाबासाहेब आगे दत्ता महाजन रमेश शेंडगे सुशांत जाधवर पवन मोगरेकर दीपक मुंडे कल्याण शेप अविनाश कांडुरे मुन्ना जाधवर कैलास खुरपे महेश साडेगावकर वसंत अलकुंटे राजेश पवार सतीश जोशी ईश्वर खुरपे सिद्धेश्वर राठोड रामेश्वर चव्हाण अजय जाधव किसन वगरे रवी वाकळे चिंतेश जोशी राजपाल गायकवाड सूर्यकांत दराडे आदी कार्यकर्ते पदाधिकारी पदाधिकारी उपस्थित होते.

## आ.क्षीरसागरांनी घेतली विधानसभा सदस्यत्वाची शपथ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० डिसेंबर**



बीड विधानसभा मतदारसंघाचे तब्बल दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार संदीप क्षीरसागर यांनी रविवारी (दि.८) रोजी विधानसभा सदस्य म्हणून शपथ घेतली. यावेळी मायबाप जनतेच्या आशीर्वादाने आमदार म्हणून काम करण्याची संधी आणि जबाबदारी मिळाली असून मायबाप जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असेल अशी ग्वाही आमदार संदीप क्षीरसागर यांनी यावेळी व्यक्त होताना दिली.रविवारी (दि.८) रोजी महाविकास आघाडीतील विधानसभा सदस्यांचा शपथविधी पार पडला. यामध्ये बीड विधानसभा मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा निवडून आलेले आ.संदीप क्षीरसागर यांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्णरण करून आ.क्षीरसागर यांनी आमदारकीची शपथ घेतली. बीड विधानसभा मतदारसंघाचे असलेले सर्व प्रश्न या पवित्र सदनात मांडून बीडच्या जनतेने दिलेली जबाबदारी पार पाडणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.

## स्वत:ची बांधिलकी म्हणून ध्वजदिन निधी संकलनासाठी प्रयत्न करावेत-निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० डिसेंबर**



सैनिकाबद्दल आपल्यातील आदराची भावना जपण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून आपले कर्तव्या पार पाडावे तसेच स्वत:ची बांधिलकी म्हणून ध्वजदिन निधी संकलनासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी आज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातर्फे जिल्हा नियोजन सभागृहात ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रमाप्रसंगी केले.

या कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी (सामान्य) शैलेस सुर्यवंशी, पोलीस निरिक्षक हनुमंत वारे, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, जिल्हा सैनिकी कार्यालयाचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विद्यासागर कोरडे, वीरमाता, वीर पत्नी,आजी माजी सैनिक, विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

ध्वजदिन निधी संकलनामध्ये बीड जिल्हा पहिल्या क्रमांकावर येण्यासाठी ध्वजदिन निधी अधिक जमा करण्यासाठी सर्वानी सहभाग नोंदवावा, आजी माजी सैनिक, वीरमाता, वीर पत्नी यांच्या अडचणी सोडवण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येईल, असेही यावेळी श्री स्वामी यांनी सांगितले.

बीड जिल्हयासाठी ३५ लाख रुपये ध्वजदिन निधीचे उदिष्ट देण्यात आले असून ९७ लाख १० हजार रुपये ध्वजदिन निधी प्राप्त झाल्याचे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विद्यासागर कोरडे यांनी प्रस्ताविकात सांगितले.कार्यक्रमाचे उद्घाटन दिप प्रज्लवनाने करण्यात आले. कुमारी स्वराली साळुंके, कुमारी देवकी साळुंके यांनी ‘ए मेरे वतन के लोगो’ हे गाणे गाऊन सभागृहाला स्तब्तध केले.यावेळी वीरमाता, वीर पत्नी, इयत्ता १० वी १२ वी मध्ये अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या सैनिकी पाल्याचां गौरव करण्यात आला. पाटोदा तालुक्यातील शहीद पाडुरंग तावरे यांच्या वीरमाता,वीर पत्नी, वडील यांना १ कोटीचा धनादेश देण्यात आला. ध्वजदिन निधी संकलनासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांचाही सत्कार करण्यात आला.सुत्र संचालन व आभार प्रदर्शन श्री जोशी यांनी केले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते ध्वजदिन निधी संकलनाला सुरुवात करण्यात आली व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी प्रस्ताव सादर करावेत

### कुठल्याही स्तरावर पैशांची मागणी झाल्यास तक्रार करण्याचेही आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० डिसेंबर**

रमाई आवास घरकुल योजनेसाठी समाजकल्याण विभागाकडून नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून निकषांची पुर्तता करणार्या लाभार्थ्यांनी आपल्या ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आवश्यक कागदपत्रांसह आपले प्रस्ताव दाखल करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

रमाई आवास योजना (ग्रामीण) या अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकातील लोकांसाठी असलेल्या घरकुल योजनेसाठी समाजकल्याण विभागाकडून बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड तालुक्यासाठी ७२० व शिरूर-कासार तालुक्यासाठी २४० इतके





उद्दीष्टांना मंजुरी दिली आहे. याअनुषंगाने समाजकल्याण विभागाकडून पंचायत समितीमार्फत निकष पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज, प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्यामुळे निकषांची पुरवण्या करणार्या अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकातील पात्र लाभार्थी यांनी आपले अर्ज ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सदरील योजनेसाठी दाखल करावेत असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

पैशांची मागणी झाल्यास संपर्क करा

दरम्यान आ.संदीप क्षीरसागर यांनी रमाई आवास योजनेच्या प्रक्रियेत कुठल्याही स्तरावर पैशांची मागणी किंवा आर्थिक गैरव्यवहार झाल्यास मो.नं.९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बांगलादेश हिंदू अत्याचार प्रकरणी आज धाराशिवात धरणे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि. १० डिसेंबर -**

बांगलादेश मध्ये मागील काही दिवसांपासून हिंदू बंधू-भगिनींवर प्रचंड अन्याय अत्याचार सुरू आहेत. या अन्याय अत्याचाराला प्रतिबंध घालून या हिंदू बांधवांना तत्काळ न्याय द्यावा, भारत सरकारने त्यांच्या न्याय हक्कासाठी पुढाकार घेऊन तातडीने पावले उचलावीत या प्रमुख मागणीसाठी धाराशिव शहरात उद्या १० डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की भारता शेजारील बांगलादेशात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अराजक परिस्थितीत तेथील हिंदू बांधवांवर प्रचंड अन्याय अत्याचार सुरू आहेत. तेथील हिंदू बांधवांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे. त्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी आणि या अन्याय अत्याचाराला वाचा फोडून ते बंद व्हावे यासाठी भारत सरकारने पुढाकार घ्यावा या विषयात तात्काळ पावले उचलावीत.

या प्रमुख मागणीसाठी उद्या १० डिसेंबर रोजी जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त धाराशिव येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी दहा वाजता सकल हिंदू समाजाच्या वतीने निदर्शने केली जाणार आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दत्ता सोनटक्के यांच्या हस्ते सत्कार

**धाराशिव, दि. १० डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्यानंतर भारतीय जनता पार्टी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष दत्ताभाऊ सोनटक्के यांनी नूतन मुख्यमंत्र्यांचा सत्कार केला. मुंबई येथे सागर बंगल्यात हा सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य मकरंद पाटील, सोशल मीडिया सहसंयोजक किशोर तिवारी, गोविंद हूळवणकर, हनुमंत पाटील, विनोद जाधवर, सिद्धेश्वर माने, विठ्ठल चिकुंद्रे यांच्यासह धाराशिव जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीचे इतर पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.



### सॉफ्ट टेनिस राष्ट्रीय स्पर्धेसाठी यशराज हुंडेकरीची निवड

**जळकोट, दि. १० डिसेंबर -**

बारामती येथे पार पडलेल्या अंडर १९ राज्यस्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद (जळकोट) येथील राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा खेळाडू यशराज हुंडेकरी याने घवघवीत यश संपादन केले आहे. यशराज हुंडेकरी याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. यशराजच हुंडेकरी या खेळाडूची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल खेळाडू विद्यार्थी व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ, जळकोट तथा राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष चव्हाण, अलियाबादचे सरपंच सुर्यकांत चव्हाण, प्रकाश चव्हाण, मुख्याध्यापिका आशा पवार यांनी सत्कार करून अभिनंदन केले आहे. पुढील राष्ट्रीयस्तरावर होणाऱ्या सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. क्रीडा शिक्षक कोकाटे, राठोड, साबळे, दुधभाते, गुरव, कारले, हक्के, कुचंगे, लबडे यांचे खेळाडूंना मार्गदर्शन लाभले.



### नागनाथ जळकोटे आदर्श सेवानिवृत्त शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**इटकळ, दि. १० डिसेंबर -**

अणदूर येथील कै. दत्तात्रय अणदूरकर सामाजिक संस्थेच्या वतीने तुळजापुर तालुक्यातील केशेगाव येथील सेवानिवृत्त शिक्षक नागनाथ जळकोटे यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आदर्श सेवानिवृत्त शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शाल, फेटा, पुष्पहार, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष केशेगावचे सरपंच मल्लीनाथ गावडे तर प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक सिद्रामाप्पा खजुरे, केशेगावचे उपसरपंच लक्ष्मण क्षिरसागर, शिवसेनेचे नेते बाळकृष्ण घोडके, साने गुरुजी विद्यालयाचे मुख्याध्यापक जयंत जाधव, संस्थेचे अध्यक्ष, अजय अणदूरकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी केशेगावचे उपसरपंच लक्ष्मण क्षिरसागर, डॉ. नागनाथ कुंभार, डॉ. सिद्रामाप्पा खजुरे, केशेगावचे सरपंच मल्लीनाथ गावडे, सत्कार मूर्ती नागनाथ जळकोटे गुरुजी यांची भाषणे झाली.



### शिवसेना नेते जयदेव गोफणे यांचा वाढदिवस साजरा

**परंडा, दि. १० डिसेंबर -**

परंडा तालुक्याचे सुपुत्र शिवसेना नेते तथा संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष समाज सेवक जयदेव गोफणे यांचा वाढदिवस परंडा येथे साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधुन ढगपिंपरीचे सरपंच बप्पाजी काळे यांनी जयदेव गोफणे यांचा शाल, श्रीफळ, पुष्प बुके, देऊन केक कापून साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा केला. यावेळी संजय गांधी निराधार समितीचे पात्र लाभार्थी नागरीकांनीही जयदेव .गोफणे यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छाचा वर्षाव केला. यावेळी विजय काळे, सुरेश हावळे, भागवत डाकवले, रामचंद्र वाटाडे, बाबासाहेब शिरतोडे, गुलाब शिंदे, भाडवंकर, इत्यादी तसेच विविध पक्ष संघटनेच्या कार्यकर्त्यांनी व पत्रकार बांधवानी सुद्धा शुभेच्छा दिल्या.

# पोद्दार स्कूल अत्याचार प्रकरण : सहाय्यक पोलिस निरीक्षक निलंबित

## सखोल चौकशीसाठी चौकशी समिती नेमली...
## प्राचार्याचा प्रकरणाशी संबंध नसल्याचा दावा खोटा...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि. १० डिसेंबर -**

शहरातील नामांकित असणाऱ्या पोद्दार इंग्लिश स्कूलमधील शिक्षकाने एका ३१ वर्षीय शिक्षिकेला विविध स्वरूपाचे अमिष दाखवून तिच्या इच्छेविरुद्ध सोलापूर व धाराशिव येथील लॉजवर नेऊन तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याची घटना घडली आहे. सदरील शिक्षिकेच्या तक्रारीवरून धाराशिव शहरातील आनंदनगर पोलिस ठाण्यात त्या शिक्षकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

याप्रकरणी संबंधित शिक्षकावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक करण्यात आली होती. मात्र, यामध्ये प्रकरणाचा तपास करणारे अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक गणेश जांभळे यांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर या प्रकरणाची संपूर्ण प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने हाताळल्यामुळे किंबहुना आरोपीला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या प्रकरणात आता पोलिस अधिक्षकांनी स्वतः लक्ष घातले असून तपास योग्य पध्दतीने तपास न केल्याने पोलीस अधीक्षकांनी सहा. पोलिस निरीक्षकावर निलंबनाची कारवाई केली आहे.

लैंगिक शोषणाच्या गंभीर आरोपात तपास करताना पोलिस कोठडी घेणे आवश्यक असते. मात्र पोद्दार शाळेच्या प्रकरणही अंत्यत गंभीर असतानादेखील तपास अधिकाऱ्याने पीसीआर घेतला नव्हता. तसेच तपास अधिकारी जांभळे यांनी पीसीआर न घेता एम सीआर घेतला. यामुळे अशा गंभीर प्रकरणात अप्रत्यक्षपणे आरोपीला वाचवण्याचाच प्रयत्न त्यांनी केला आहे. पोलीस अधीक्षकांनी या बाबींची गंभीर दखल घेऊन सहायक पोलिस निरीक्षक जांभळे यांना निलंबित करण्याचा आदेश नुकताच दिला.

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी तीन अधिकाऱ्यांची एक टीम तयार केली आहे. यामध्ये आनंदनगरचे पोलीस निरीक्षक आण्णासाहेब मांजरे, महिला सहायक पोलीस निरीक्षक अश्विनी मांजरे, एक उपनिरीक्षक सुरेश कासोळे, कामचंद कांडे यांचा समावेश आहे. या प्रकरणाचा छडा लावण्याचे काम या टीमला दिले आहे.

या प्रकरणी पोलीस तपास करत आहेत. तसेच या प्रकरणी या समितीने सखोल चौकशी करावी असेही या आदेशात नमुद केले आहे.

### पालक विद्यार्थ्यांचा प्रवेश काढण्याच्या तयारीत?

पोद्दार स्कुलमधील झालेल्या या प्रकारामुळे या स्कुलमधील विद्यार्थ्यांच्या पालकांत असुरक्षितेचे वातावरण तयार झाले आहे. त्यांनी दै. 'तरुण भारत'कडे याप्रकरणीची चौकशी केली. दै. तरुण भारतकडे या प्रकरणची सर्व कागदपत्रे उपलब्ध असल्याने पालकांचा या प्रकरणावरील विश्वास दृढ झाला. यामुळे पालक त्यांचा पाल्याचा या स्कुलमधील प्रवेश काढून घेण्याच्या तयारीत आहेत.

### लेखी मागणी करा; माहिती देतो...

दैनिक 'तरुण भारत'ने सोमवारी श्री. कुलकर्णी यांना प्रकरणाशी संबंधित काही गोष्टींची मागणी केली असता त्यांनी आम्हाला लेखी द्या आम्ही माहिती देतो असे तरुण भारतला सांगितले. मात्र ही माहिती न देण्यामागे नेमके काय दडलय हे मात्र उघड होवू शकले नाही.

### दै. 'तरुण भारत'च्या वृत्ताने प्रकरणाला गती...

### प्राचार्यांचा दावा खोटा...

दै. 'तरुण भारत'ने प्रकरणाला वाचा फोडल्यानंतर प्राचार्यांचे मत विचारण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांच्याशी संपर्क होवू शकला नाही. स्कुलचे कर्मचारी यांच्याशी संपर्क साधला असता आमच्याकडे कोणतीही तक्रार आले नसल्याचे त्यांनी सांगितले होते. मात्र, एका स्थानिक दैनिकास दिलेल्या प्रतिक्रियेमध्ये हे प्रकरण त्यांचे खाजगी बाब असल्याचे म्हटले आहे. मात्र या दोघाचं सुतक याच स्कुलमध्ये जमले होते. यातून ही घटना घडली आहे. यावरुन प्राचार्यांचा हा दावा खोटा असल्याचे स्पष्ट होत आहे.

### दै. तरुण भारतने प्रकरणाला फोडली वाचा

दि.३० नोव्हेंबर रोजी आनंदनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र पोलिस विभागाकडून देण्यात येणाऱ्या प्रेस नोटमध्ये यातील काही भागाचाच उल्लेख होता. मात्र दैनिक 'तरुण भारत'ने या प्रकरणच्या मुळाशी जाण्याचे ठरवले व या प्रकरणातील कागदपत्रे जमवून घटनेचा पाठपुरावा केला व या प्रकरणाला वाचा फोडली.

## खून प्रकरणात आरोपीस जन्मठेप; पाच हजार रूपयांचा दंड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि. १० डिसेंबर -**

पोटात चाकू मारुन खुन करणाऱ्या आरोपीस जन्मठेपीची शिक्षेसह पाच हजार रुपयाचा दंड कळंब येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश आर.के. राजेभोसले यांनी सुनावला आहे. ही घटना ४ ऑक्टोबर २०१९ रोजी घडली होती.

प्रकरणाची थोडक्यात हकीगत अशी की, आरोपी नामे शहाजी रामा कांबळे त्यांची पत्नी पद्मीनीबाई शहाजी कांबळे, मुलगा सुनिल शहाजी कांबळे, सून रेश्मा सुनिल कांबळे हे एकत्र राहत होते.

परंतु आरोपी शहाजी यास यातील मयत सुनिल शहाजी कांबळे व त्यांची आई पद्मीनीबाई शहाजी कांबळे यांच्यामध्ये अनैतिक संबंध असल्याची शंका घेत असल्यामुळे तुला व तुझ्या आईला मारून टाकतो म्हणून नेहमी शहाजी कांबळे भांड व तंटा करायचा. दि.४ ऑक्टोबर २०१९ रोजी रात्री अंदाजे १९.३० वाजण्याच्या दरम्यान साहेबराव बंडू कांबळे यांच्या घरासमोर त्यांची पत्नी सुशिला व आरोपीची पत्नी पद्मीनीबाई व मयताची पत्नी रेश्मा ही हजर असताना मयत सुनिल शहाजी कांबळे हा वडिलांना तंटामुक्त अध्यक्षांकडे चला प्रकरण मिटवू असे म्हणत असताना त्यांच्यामध्ये भांडणे लागले.

त्यावेळी आरोपी शहाजी हा मयत सुनिल यास तुला ठार करतो. म्हणून आरोपी शहाजी रामा कांबळे हातात चाकू घेवून धावत आला.

व मयत सुनिल कांबळे यांच्या पोट्यात चाकू मारून गंभीर जखमी केले. त्यामुळे मयत सुनिल कांबळे यास उपचारासाठी घेवून रूग्णालयात जात असताना सुनिल मयत झाला. त्यानंतर रेश्मा सुनिल कांबळे यांनी शिराढोण पोलिस स्टेशनमध्ये फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा रजिस्टर नंबर १४२/१९ कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

९ साक्षीदारांची साक्ष तपासण्यात आल्यानंतर मुख्य फिर्यादी रेश्मा कांबळे ही फितूर झाली. तरीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अहवाल, न्याय वैज्ञानिक अहवाल व सरकारी अभियोक्ता ॲड. अशिष कुलकर्णी यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपीस भा.दं.क ३०२ प्रमाणे आरोपीस अजन्म कारावास व पाच हजार रूपयांचा दंड कळंब येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश आर.के. राजेभोसले यांनी दि.९ डिसेंबर २०२४ रोजी शिक्षा ठोठावली.

## केसरजवळगा येथील शाळेतील विद्यार्थ्यांना गोळ्याचे 'रिॲक्शन'



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि. १० डिसेंबर -**

उमरगा तालुक्यातील केसरजवळगा येथील महात्मा गांधी विद्यालयातील ३५ हून अधिक शालेय विद्यार्थ्यांना आयर्न फॉलिक ॲसिड नावाची गोळी दिल्याने दि.९ रोजी रिॲक्शन झाल्याची अशी प्राथमिक माहिती मिळाल्यानंतर उलट्याचा त्रास झाल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली.

त्रास झालेल्या विद्यार्थ्यांना उपचारासाठी मुरूम येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. यातील १९ विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजत आहे. या प्रकारामुळे पालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून, या प्रकरणामुळे आरोग्य विभागाने तातडीने तपास सुरू केले आहे. विद्यार्थ्यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी आरोग्य विभागाकडून तातडीने उपचारास सुरुवात करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारच्या सत्रात आणखी १६ जणांना उपचारासाठी मुरूम येथे प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये शाळेच्या वतीने पाठवण्यात आले आहे.

याबाबत माहिती मिळाल्यानंतर मा.आ. ज्ञानराज चौगुले, शरण पाटील यांनी मुरूम रुग्णालयास भेट देऊन विद्यार्थ्यांच्या आरोग्याची आस्थेवाईकपणे विचारपूस केली.

> किशोरवयीन मुला-मुलींना आरोग्य विभागाकडून रक्तवाढीसाठी गोळ्या दिल्या जातात. सदरील गोळ्या घेतल्यानंतर अशक्त मुलांना किंवा जेवण न केलेल्या मुलांना मळमळ होवू शकते. तसेच उलट्याही होवू शकतात. यातील कांही मुलांना उलट्यांचा त्रास झाला होता. त्यांची प्रकृती स्थिर असून विद्यार्थ्यांनी अथवा पालकांनी घाबरून जावू नये.
>
> **- डॉ. कुलदिप मिटकरी,**
> माता व बालसंगोपन अधिकारी

## डॉ. बाबासाहेबांचे विचार व कार्य तरुणांसाठी प्रेरणादायी : प्रशांत जाधवर



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१० डिसेंबर -**

पुस्तक वाचल्याने मस्तक सुधारते, सुधारलेले मस्तक कोणापुढेही, कधीही नतमस्तक होत नाही म्हणून कोणाचेही हस्तक व्हायचे नसेल तर शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ह्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या शिकवणीच्या मार्गाने जा, असे प्रतिपादन प्रशांत जाधवर यांनी केले. ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दसमेगांव शाळेतील इयत्ता सहावी वर्गाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित केलेल्या बालसभेत बोलत होते.

पुढे बोलताना जाधवर म्हणाले की, बाबासाहेबांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपले शिक्षण पूर्ण केले. समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा, प्रथा बंद करण्यासाठी, समाजातील वंचित, शोषित घटकांना न्याय देण्यासाठी आयुष्यभर लढा दिला. बाबासाहेबांच्या जीवनावरील पुस्तके वाचा, बाबासाहेबांना समजून घ्या आणि आपल्या प्रतिकूल परिस्थितीतवर मात करा व जिवनात यशस्वी व्हा असाही संदेश त्यांनी मुलांना दिला. व्यासपिठावर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकांत मोरे, माजी सरपंच रामभाऊ खंडागळे, मुख्याध्यापक हरिभाऊ रणदिवे, दादासाहेब लगाडे आदींची उपस्थिती होती.

तत्पूर्वी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून, पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेतील प्रज्वल लगाडे, सई उघडे, रोहिणी शिंदे, प्रिया सुरवसे, रिया काळे, प्राची उघडे, संकेत मोरे, प्रतिक्षा हिंगमिरे, यश हिंगमिरे, प्रांजल मांजरे यांनी आपले विचार व्यक्त केले. याप्रसंगी शिक्षक भागवत बगाडे व रामभाऊ खंडागळे यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक सुहास ननावरे, बालाजी कोरे, मंजुषा कवडे व सहावी विदयार्थ्यांनी प्रयत्न केले. श्रीकांत मोरे व दादासाहेब लगाडे यांच्या वतीने मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी तावरे हिने केले. तर आभारप्रदर्शन ओमकार मांजरे यांनी केले.

## राज्य मंत्रीमंडळामध्ये जिल्ह्यातुन कुणाची वर्णी?; जिल्हावासियांची उत्सुकता शिगेला

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१० डिसेंबर -**

राज्य मंत्रीमंडळामध्ये धाराशिव जिल्ह्यातुन कुणाची वर्णी लागणार याकडे संपुर्ण जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे. भाजपचे राणाजगजितसिंह पाटील यांच्या की शिवसेनेचे डॉ. तानाजी सावंत यांच्या गळ्यात पडणार मंत्रीपदाची माळ? महाराष्ट्रात पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. येत्या कांही दिवसात मंत्रीमंडळाचा विस्तार होणार असुन यामध्ये धाराशिव जिल्ह्यातुन मंत्रीपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

धाराशिव जिल्ह्यात महायुतीचे भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि शिवसेना शिंदे गटाचे डॉ. तानाजी सावंत हे दोन आमदार आहेत.

मागच्या वेळी धाराशिव जिल्ह्यातुन शिवसेना शिंदे गटाचे परंडा मतदार संघातुन निवडुन आलेले डॉ. तानाजी सावंत यांची मंत्रीमंडळात वर्णी लागली होती. अडीच वर्षे डॉ. तानाजी सावंत हे धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री होते. मात्र पालकमंत्री म्हणुन डॉ. तानाजी सावंत हे जिल्ह्याचा विकास करण्यात कमी पडले होते. तरीही आज शिवसेना शिंदे गटाकडुन त्यांचे नाव मंत्रीपदाच्या यादीत आहे.

भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचीही यावेळी मंत्रीमंडळात वर्णी लागणार असल्याची सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. मंत्री नसताना तुळजापुर विधानसभा मतदार संघात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी जी विकासाची कामे केली आहेत त्याला तोड नाही. मोठयाप्रमाणात विकास करुन त्यांनी मतदार संघाचा कायापालट करुन दाखविला आहे.



अनेक वर्षांपासुन प्रलंबित असलेली कामे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी करुन दाखविले आहे. त्यामुळे या मतदार संघातील मतदारांनी सलग दुसऱ्यांदा त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडुन दिले आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यात विकास कामे करण्याची धमक आहे. त्यामुळे येणाऱ्या पाच वर्षांसाठी त्यांना मंत्रीमंडळात संधी मिळाली तर तुळजापुर विधानसभा मतदार संघामध्ये विकासाला आणखी मोठ्या प्रमाणात चालना मिळु शकते.

या मतदार संघातील अनेक महत्वाची कामे मार्गी लागणे बाकी आहेत. त्यामुळे कांही दिवसात होणाऱ्या मंत्रीमंडळ विस्तारात भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची वर्णी लागणार की शिवसेनेचे आमदार डॉ. तानाजी सावंत यांची वर्णी लागणार हे पाहणे गरजेचे आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासु मानले जातात तर आमदार डॉ. तानाजी सावंत हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जवळचे म्हणुन ओळखले जातात. त्यामुळे या दोघांपैकी कुणाची मंत्रीमंडळात वर्णी लागणार याकडे संपुर्ण जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे.

# हिंदूवरील अत्याच्याराविरोधात नांदेडात आक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० डिसेंबर**

बांगलादेश येथे होत असलेल्या हिंदूंच्या अनन्वित आणि अमानुष अत्याचारांविरोधात आज दिनांक १० डिसेंबर रोजी भव्य हिंदू न्याय यात्रा व आक्रोश मोर्चा काढण्यात आला.



१० डिसेंबर हा जागतिक मानवाधिकार दिवस जागतिक मानवाधिकार परिषदेने हिंदूंवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची कधीच दखल घेतली नाही. बांगलादेशात हिंदूंवर व अन्य अल्पसंख्य समुदायावर अनन्वित अत्याचार होत आहेत. संयुक्त राष्ट्र व मानवाधिकार परिषद यावर सोयीस्कररित्या दुर्लक्ष करीत आहे .बांगलादेशात हिंदू संत, मंदिर, हिंदू संस्था असुरक्षित असून दररोज हल्ले होत आहेत .भारत सरकार जागतिक पातळीवर बांगलादेशी हिंदूंच्या रक्षणासाठी प्रयत्न करत आहे. हिंदू बांधवांवर जगात कुठेही अन्याय होत असेल तर त्याचा हिंदू समाजाकडून तीव्र निषेध आणि विरोध होणे व हा संदेश संपूर्ण जगात जाणे आवश्यक आहे. हिंदू समाज हा भारतात बहुसंख्य असला तरी जागतिक पातळीवर अल्पसंख्य आहे यासाठी संयुक्त राष्ट्राने याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर बांगलादेशातील हिंदू बांधवांवर होत असलेल्या अत्याचारा विरोधात आज शहरातील जुना मोंढा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा सकल हिंदू समाजातर्फे भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात असंख्य हिंदू बांधव सहभागी झाले होते.

# बांगलादेशातील अल्पसंख्यांक हिंदूवरील अत्याचार, मंदिरावरील हल्ले थांबऊन चिन्मयकृष्ण महाराजाची सुटका करा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. १० डिसेंबर**

बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदू समाजावर होत असलेल्या अन्याय अत्याचार, हिंदू मंदिरावरील हले व तोडफोड, साधुसंतावरील हल्ल्याच्या निषेधार्थ किनवट येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना किनवटच्या सहा जिल्हाधिकाऱ्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले असून हिंदूंचे धार्मिक स्थळ आणि मंदिराचे संरक्षण करावे, चिन्मय कृष्ण महाराज यांची सुटका करावी, हिंदू महिलावर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध घालून समाज माध्यमे आणि समाजात होत असलेले हिंदूचे धार्मिक उत्पीडन थांबविण्यासाठी



ठोस उपाय योजना कराव्यात अशा मागण्या निवेदनातून केल्या आहेत. निवेदनात नमूद केले आहे की गेल्या काही महिन्यापासून बांगलादेशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदूं समाजाच्या मानवधिकार, मालमत्ता आणि जीवाचे हनन केले जात आहे. हिंदू मंदिरावर हल्ले करून तोडफोड केली जात असून हिंदू महिलावर माननीय अत्याचार सुरू आहेत. दि २६ नोव्हेंबर २०२४ रोजी इस्कॉनच्या संबंधित चिन्मय कृष्ण महाराज यांना खोट्या गुन्ह्यात अडकवून जबरदस्तीने व हिंसात्मक पद्धतीने अटक करण्यात आली आहे विशेष म्हणजे चिन्मय कृष्ण महाराजांना कट्टर मुस्लिम दहशतवादी संघटनाशी संबंधित असलेल्या आरोपींच्या कारागृहात ठेवण्यात आले आहे. बांगलादेशातील अल्पसंख्यांक हिंदू वरील अमानवीय अत्याचार, हिंदू धार्मिक स्थळावरील हल्ले, हिंदू महिलावर होणारे अन्याय अत्याचार ही अत्यंत गंभीर बाब असून हिंदूंचे धार्मिक स्थळ आणि मंदिराचे संरक्षण करावे, इस्कॉनसी संबंधित चिन्मय कृष्ण महाराज आणि त्यांचे सहकारी यांची अटक ही बेकायदेशीर असल्यामुळे त्यांची त्वरित सुटका करावी बांगलादेशातील हिंदू महिलावर होणाऱ्या अन्याय अत्याचारांना आंतरराष्ट्रीय स्तरावर उजागर करून प्रतिबंध घालावा तसेच समाज माध्यम आणि समाजात होत असलेले हिंदूंचे धार्मिक उत्तपिडण थांबविण्यासाठी कठोर उपाय योजना कराव्यात अशा मागण्या किनवट येथील सकल हिंदू समाजाने केल्या असून मागण्याचे निवेदन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सहा जिल्हाधिकारी किनवट यांच्या मार्फत देण्यात आले आहे. या प्रसंगी विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत उपाध्यक्ष परमपूज्य सुरेशजी महाराज, नरसिंग महाराज पेंदेकर, सुनील महाराज आंदबोरीकर, दिनकर चाडावार, अशोक नेम्मानीवार, अनिरुद्ध केंद्रे, स्वागत आयनेनीवार, करपुडे पाटील, सुनील आयनेणीवार, अशोक नेमानीवार, सागरताई शिंदे, गंगुबाई परेकर, वंदना संतोष तिरमनवार, विद्या पाटील संतोष रायेवार, उपासणे सर, सुरेंद्र जन्नवार, किरण किनवटकर, रोहित चाडावार, संतोष नेम्मानीवार, प्रशांत सातुरवार कपिल कांबळे सुशील जन्नवार, जयंत मच्छरलावार यांच्यासह विविध हिंदू संघटनाचे पदाधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त



### शेतकरी कृषीपंपास २४ तास विद्यूत पुरठा चालू करा अन्यथा जलसमाधी घेणार

**उमरी**-उमरी तालुक्यातील गोरठा ते वाघाळा मेन कॅनल बोगद्यावरील ओपन वहिरी पाणी पाळीच्या कालावधीत २४ तास विद्यूत प्रवाह चालू करा अन्यथा या परिसरातील शेतकऱ्यासह १९ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री जलयुक्त शिवार पाटबंधारा मौजे गणीपूर येथे जलसमाधी घेणार असल्याचा गर्भित इशारा माजी शिवसेना तालुका प्रमुख तथा माजी समन्वय समिती तालुकाध्यक्ष साहेबराव पाटील शिंदे गणीपूरकर यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. उमरी तालुक्यात ईस्सापूर धरणातील गोरठा ते वाघाळा मेन कॅनॉल बोगद्यावरील ओपन विहीरी मौजे हिरडगाव क्षेत्रात ऊसाचे पिक व रब्बी हंगामी पिक असल्याने विधूत पुरवठा सतत खंडीत होत असल्याने पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान होणार आहे यापुर्वी सततच्या पाऊसानाने मृगनक्षत्रातील पिके गारपिटमुळे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहे उर्वरित हाताला आलेल्या पिक मालाना कवडीमोल भावाने विक्री करावी लागत आहे , बि - बियाने खताचे उत्पादन खर्च निघत नाही त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी डोईजड झाला आहे कसाबसा सावकाराकडून कर्ज काढून मुलामुलीचे शिक्षण , लग्नसराई उरकून रब्बी हंगामी पिकाकडे मोठया धैर्याने समोर आला आहे. त्यात नकटीच्या लग्नाला सतराशे इग्न या म्हणणी प्रमाणे रब्बी पिके पाण्याविना सुकुन जात आहेत या त्यांचे कारण महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी यांना अनेक वेळा लेखी , तोंडी , भ्रहमनध्वनी व्दारे संपर्क करून कुटल्याच प्रकारे प्रतिसाद देत नसल्याने शेतकरी यांचे पिके वाया जाण्याची तिव्र शक्यता आहे अगोदर कर्जडोई झालेला शेतकरी आत्महत्या करण्याची शक्यता नाकारता येत नाही असे शेतकरी बोलवून दाखवित आहेत त्याला विद्यूत महावितरण कंपनीच जबाबदार राहणार आहे. त्या अनुषंगाने शेतकरी यांच्यावर होत असलेल्या अन्यावर पर्याय म्हणून दि १९ डिसेंबर २०२४ अगोदर २४ तास विद्यूत प्रवाह सुरू ठेवावा अन्यथा माझ्या सह ७० शेतकरी जलसमाधी घेणाचा निर्धार केला असून शेतकरी यांचावर होत असलेल्या अन्यायावर अंतिम पर्याय म्हणून जल समाधी घेणार असल्याचा इशारा शिवसेना माजी तालुका प्रमुख तथा समन्वय समिती अध्यक्ष साहेबराव शिंदे गणीपूरकर यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांना निवेदन देवून जिल्हा स्तरावरू योग्य ती कार्यवाही करून शेतकरी यांना तातडीने न्याय देण्याचे काम करावे अशा विनंती वजा इशारा दिला आहे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेहनात साहेबराव शिंदे पाटील याच्या सोबत शेतकरी मारोती मुक्कावार, बालाजी भुजबळे , माधव भुजबळे , मारोती भुजबळे , जोगंदड, ढगे , डावखोरे गंडरस, कदम, मल्हारे, कुऱ्हाडे, जाधव, चाबुकस्वार, मल्हारे, गणपोलवाड, पडलवाड, मिरदोडे वाघमारे आदी सह सतर शेतकरी यांच्या निवेदनावर सहया आहेत. उमरी तालुक्यात शेतकरी यांनी जल समाधीचा मोठा निर्णय घेतल्याने जिल्हाधिकारी, विद्यूत महावितरण कंपनी कोणता निर्णय घेतील याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष वेधून आहे .

# बांगलादेशातील हिंदूवरील हल्ल्याचा निषेध

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १० डिसेंबर**

बांगलादेशातील हिंदूवर मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार होत आहेत हिंदूंची घरे मंदिर तोडण्यात येत आहेत याला बांगलादेश येथील राज्यकर्ते हे जबाबदार असून मागील काही काळात अशा अनेक घटना समोर आले आहेत या विरोधात मुदखेड येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने तहसीलदार यांच्यामार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन पाठवण्यात आले असून या घटनेचा तीव्र शब्दात निषेध यावेळी व्यक्त करण्यात आला.



बांगलादेशात घडत असलेला प्रकार हा घृणास्पद आहे. हिंदूंच्या मानवाधिकार मालमत्ता आणि जिवांचे हनन झाल्याचे विविध प्रसार माध्यमातून निदर्शनास येत आहे, हिंदू यांच्यावर कट्टरपंथीयांचा उन्मात सुरुच आहे.धार्मिक स्थळांवर हल्लयांचे प्रमाण वाढले आहे. जिहादींनी लोकशाहीवर वर्चस्व गाजवले असून मानव अधिकार संघटनाही यासंदर्भात काही बोलत नाहीत. बांगलादेशात हिंदुच्या संपत्ती व धार्मिक चारित्र्याची हत्या होत आहे. बांगलादेशात झालेल्या सत्तांतरावेळी आणि त्यानंतर बांगलादेशातील हिंदू मुली व महिलांवर झालेले अत्याचार आणि मानव अधिकारांचे हनन समोर आले आहे. इस्कॉनचे चिन्मय कृष्ण महाराज आणि इतर हिंदू धर्मियांचे केलेले यांना बेकायदेशीर अटक करण्यात आली.

त्यामुळे भारतीय जनता विविध माध्यमातून संताप व्यक्त करत आहे. सरकारने योग्य ती पावले उचलून बांगलादेशातील हिंदू जनतेला सुरक्षा मिळवून दिली पाहिजे. हिंदूच्या धार्मिक स्थळाचे आणि मंदिराचे संरक्षण करावे,इस्कॉनचे चिन्मय कृष्ण महाराज आणि इतर हिंदू धर्मियांची सुटका करावी, महिला व मुलींवरील अत्याचार आणि मानवअधिकारांचे उल्लंघन तत्काळ थांबण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायास याबाबत अवगत करावे, असे निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी निवेदनकर्ते डॉ.अनिरुद्ध लासोनकर, संजय सोनटक्के अमोल आबादार, अमोल कुलकर्णी, राजू बारतोंडे, संतोष बोडके,शिवाजी एडके, दत्ता पुयड, कालिदास जंगिलवाड,अनिल अंबरखाने, अजय बादलवाड, शैलेश बोडके, शुभम बोडके, जनार्दन मेंढेवाड, मनोज कमटे, शिवा तोटेवाड, सुरेश सोनटक्के, लखन ठाकूर, गजानन कमळे, राम नादरे, प्रसाद गुंठे रवींद्र चव्हाण, माधव सावंत, विनोद वाघमारे, आकाश बेनवाड राज चिंतेवाड, यांच्यासह हिंदु संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध देशी व विदेशी दारू विक्रीला लगाम बसणार का?

**तभा वृत्तसेवा**
**निवघा(बा),दि. १० डिसेंबर**



परिसरातील अनेक ठिकाणी अवैधरित्या देशी दारू राजरोसपणे विक्री सुरू आहे. परंतु उत्पादन शुल्क विभागाचे याकडे दूर्लक्ष होतांना दिसत आहे.

शिरड गावांमध्ये मोठ्या प्रमाणात अवैधरित्यास देशी दारू विक्री जोमात सुरू आहे. एखादी कारवाई केल्यानंतर ही धंदे पुन्हा सुरू कसे होतात, असा प्रश्न उपस्थित होत आहे. देशी दारू विक्रीचा सर्वात जास्त परिणाम गरीब हातावर कमावणारे आणि युवा पिढीवर होत आहे. यामुळे कौटुंबिक हिंसाचार वाढले असून गोरगरीब महिलांचे संसार उघड्यावर पडले असून गावात सहज आणि केंव्हही दारु उपलब्ध होत असल्यामुळे होणाऱ्या अवैध देशी दारूमुळे हिंसाचाराला निमंत्रण मिळत आहे. पोलीस प्रशासन तथा राज्य उत्पादन शुल्क विभाग याकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देईल का, हा सामान्य नागरिकांना पडलेला प्रश्न आहे. त्याचबरोबर आरोग्यावर याचा परिणाम होताना दिसत आहे.

# सकल हिंदू समाजाच्या वतीने कंधार तहसीलवर आक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. १० डिसेंबर**

गत वर्षभरापासून बांगलादेशमध्ये हिंदूंवर आण्विक अत्याचार केले जात आहेत परंतु जागतिक स्तरावरील मानव अधिकार संघटना या संदर्भात कुठलेही ठोस पाऊल उचलत नाही त्याच अनुषंगाने दि १० डिसेंबर रोजी सकाळी हिंदू समाज कंधारच्या वतीने तहसील कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला यावेळी उमर संस्थांचे मठाधिपती श्री संत महंत एकनाथ नामदेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये माननीय तहसीलदार कंधार यांना निषेदाचे निवेदन देण्यात आले.



बांगलादेशमध्ये ग्रहयुद्धाच्या काळात तेथील अल्पसंख्यांक असणारा हिंदू आणि बौद्ध व इतर अल्पसंख्यांक समुदायावर तेथील स्थानिक नागरिकांकडून वारंवार हल्ले केले जात आहेत, धार्मिक स्थळांना नुकसान पोहोचले जात आहे व महिलांची मोठ्या प्रमाणामध्ये विटंबना केली जात आहे या प्रकरणांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवाधिकार संघटनेने कुठलीच कार्यवाही न केल्यामुळे व जागतिक स्तरावर बांगलादेशमध्ये अल्पसंख्यांक हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराकडे लक्ष वेधण्यासाठी सकल हिंदू समाज कंधारच्या वतीने तहसील कार्यालय कंधार वर दि १० डिसेंबर रोजी सर्व नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले यावेळी व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठान बंद ठेवून बांगलादेश हिंदू न्याय यात्रेत नागरिक सहभागी झाले .कंधार शहरातील मुख्य रस्त्याने ही बांगलादेश हिंदू न्याय यात्रा काढण्यात आली या यात्रेत नामदेव महाराज संस्थान उमरज संस्थांचे मठाधिपती श्री गुरू महंत एकनाथ नामदेव महाराज ,गजानन महाराज पाठक, शंकर महाराज स्वामी, संदीप गुरु आलेगावकर, मल्लिकार्जुन स्वामी महाराज यांच्यासह साधुसंत उपस्थित होते यावेळी सकल हिंदू समाजाच्या वतीने नायब तहसीलदार उत्तम मुदीराज यांना निवेदन देण्यात आले यावेळी दिलेल्या निवेदनात हिंदूंच्या धार्मिक स्थळांचे आणि मंदिरांचे संरक्षण करणे, हिंदू धर्म धर्माचाऱ्यांची सुटका करणे, हिंदू महिलांवर होणाऱ्या अत्याचारावर प्रतिबंध लावणे ,समाज माध्यमे आणि समाजात होत असलेल्या हिंदू धर्मियांचे उतपीडन थांबवणे असे अशा आशयाचे निवेदन देण्यात आले यावेळी सकल हिंदू समाज उपस्थित होता.

# हदगाव तालुक्यात गौणखनिज बेकायदेशीर दिवसं-रात्र उपसा





**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. १० डिसेंबर**

हदगाव तालुक्यातील मनाठा येथून दिवसं - रात्र बेकायदेशीररित्या गौण खनिज ( मुरूम) याची वाहतूक सुरू असून यामुळे मनाठातील वयोवृद्ध नागरिक, शालेय विद्यार्थी- विद्यार्थिनी यांना आपला जीव मुठीत घेऊन रस्त्याने प्रवास करावा लागत असून याबाबतीचे मनाठा ग्रामपंचायत ने ठराव देखील पारित केला असून आज रोजी गावकऱ्यांच्या वतीने हदगावचे तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले असून यांना पर्यायी रस्त्यावरून कायदेशीर रित्या मुरूम वाहतूक करण्यासंबंधी तसेच रात्रीची वाहतूक बंद करण्याचे आदेश देण्यात यावे अन्यथा आम्ही गावकरी मंडळी रस्त्यावर उतरून निषेध व्यक्त करू. सदरील निवेदनावर शैलेश बोईनवाड यांच्यासह गावकऱ्यांचे स्वाक्षरी आहेत. वर्धा - यवतमाळ - नांदेड या रेल्वे मार्गाचे काम चालू असून रेल्वे रुळासाठी लागणारे मुरूम चे काम पी. एम. पी. एल .(PMPL ) कंपनी करत असून या मुजोर कंपनीच्या हायवा, डंपर चालक हे मुरूम क्षमतेपेक्षा जास्त भरून दिवस-रात्र वाहतूक करत असल्याकारणाने मनाठा वासियांना नेहमीच आपला जीव मुठीत धरून रस्त्याने प्रवास करावा लागत आहे. गाडीमधून रस्त्यावरच मुरूम सांडत असल्यामुळे त्या कारणाने रस्त्यावर दररोज छोटे-मोठे अपघात घडत आहेत. उडणाऱ्या धुळीमुळे रस्त्या शेजारील घर व व्यावसायिकांना याचा प्रचंड त्रास होत असून यावर त्वरित उचित कारवाई कधी होते याकडे मनाठा वासियांचे लक्ष लागून आहे.

# शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांनी शास्त्रज्ञ बनण्याची जिद्द बाळगावी : शिक्षणाधिकारी सलगर

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १० डिसेंबर**

महात्मा गांधी विद्यालय येथे ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन दि.९ डिसेंबर रोजी उत्साहात संपन्न झाले. शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांच्या अंगी शास्त्रज्ञ बनण्याची जिज्ञासा निर्माण होण्यासाठी म्हणून दरवर्षी तालुकास्तरीय पासून ते राज्यस्तरापर्यंत व पुढे देशपातळीपर्यंत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले जाते, त्याचाच एक भाग म्हणून नांदेड जिल्हा शिक्षण विभाग व पंचायत समिती मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने येथील महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भव्य इमारतीमध्ये ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते, तालुक्यातील एकूण ७६ प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले, त्यात ६४ प्राथमिक तर १२



माध्यमिक विभागातील प्रयोग होते या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राम चौधरी हे होते तर अध्यक्ष बाबुराव नाईक आणि प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणाधिकारी माधव सलगर, शिक्षणाधिकारी नियोजन दिलीप बनसोडे, पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, गटशिक्षणाधिकारी रुस्तुम आडे, विस्तार अधिकारी सुरेश पाटील तसेच महात्मा गांधी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी त्यात उपाध्यक्ष रामप्रसाद सोनी, कोषाध्यक्ष शंकरराव पचलींग, किरण देशपांडे, संजय शिपपरकर, शिक्षण मंडळाचे मा.सचिव अशोक मोरे, मुख्याध्यापक विजय बेंबडे व तालुक्यातील अनेक शाळेचे मुख्याध्यापक, बालवैज्ञानिकासह विज्ञान शिक्षक यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात लाभली. यावेळी शिक्षणाधिकारी माधव सलगर यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान विषयावर सखोल असे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी शास्त्रज्ञ बनण्याची जिद्द बाळगावी असे आवाहन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील विज्ञान शिक्षक माधव कुलकर्णी, प्रा.दिनेश शेटे, संजय राजे, जितेंद्र गायकवाड, राम हेंबाडे, प्रभाकर नागरगोजे, प्रा. दत्तात्रय मंगनाळे, सूर्यकांत गोंड, पर्यवेक्षक प्रदीप बाविस्कर, ज्येष्ठ शिक्षक तथा माजी मंडळ सदस्य यशवंत कांबळे, हौसाजी गाढे, गणेश गोडसे, लाभशेटवार, जोरगुलवार, सोनटक्के इत्यादींनी सहकार्य केले. या कार्यक्रमास तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सिद्धार्थ चौदंते तर एस. के. न्यूज मीडियाचे प्रमुख धम्मा कांबळे यांनी सर्व प्रयोगाचे चित्रीकरण व मुलाखती घेऊन प्रदर्शनाची शोभा वाढवली. या विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षक म्हणून प्रा. डी जी गरुडकर, रुद्रकंठवार, पवळे सर यांनी काम पाहिले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक राजीव हामंद यांनी केले तर आभार उपप्राचार्या अभया लोहगांवकर यांनी मानले.

**माध्यमिक विभागातून**

**प्रथम-** कै.यादवरावजी देशमुख हायस्कूल चिकाळा.
प्रयोगाचे नाव-त्रिकोणमिती.
**द्वितीय-** राजर्षी शाहू माध्यमिक विद्यालय, मुदखेड.
प्र.नाव-लाकूड जाळून मिळालेल्या कोळशापासून बायोचार मिळवणे.
**तृतीय-** जि.प.हा. रोही पिंपळगाव.
प्र.नाव-स्वयंपूर्ण गाव.

**प्राथमिक विभागातून**

**प्रथम-**जि.प.प्रा. शाळा पारडी वैजापूर.
प्र.नाव-पाईपस्कोप.
**द्वितीय-**जि.प.हा.बारड.
प्र.नाव-अन्न, आरोग्य व स्वच्छता.
**तृतीय-**जि.प. प्राथमिक शाळा निवघा.
प्र.नाव-हवा प्रदूषणातील उपाय

**Change In Name**
My old name is SAIDA BI which now I am changing as New name **SAYEEDA FATEMA** Henceforth my all correspondence will be done as per my new name. please consider the same.
SING BY- SAYEEDA FATEMA SHAIKH RABBANI
ADD- BAGWAN GALLI HIMAYATNAGAR NANDED 431802
MO.9921162129

**Change In Name**
My old name is RABBANI SHAIKH hich now I am changing as New name **SHAIKH RABBANI** Henceforth my all correspondence will be done as per my new name. please consider the same.
SING BY- SHAIKH RABBANI
ADD- BAGWAN GALLI HIMAYATNAGAR NANDED 431802
MO.9921162129

**Change In Name**
My old name is ABUTALIB SHAIKH hich now I am changing as New name **SHAIKH ABUTALIB SHAIKH RABBANI** Henceforth my all correspondence will be done as per my new name. please consider the same.
SING BY - SHAIKH ABUTALIB SHAIKH RABBANI ADD- BAGWAN GALLI HIMAYATNAGAR NANDED 431802 MO.9921162129

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांच्यासह सर्व हिंदुत्ववादी संघटना आणि केवळ भारतीय जनता पक्ष या राजकीय पक्षाचा मोर्चात सहभाग; मतांच्या लांगुलचालनासाठी हिंदू असणारे अनेक नेते आणि राजकीय पक्ष मोर्चात सहभागी झाले नाहीत

# धर्म आणि संस्कृती टिकवायची असेल तर प्रत्येकाने जागृत राहण्याची गरज - आमदार बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांपासून बांगलादेशात प्रचंड मोठा हिंसाचार उफाळला असून बांगलादेशी हिंदूंवर झालेल्या हल्ल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या नाहीत असा दिवस जात नाही. बांगलादेशात १ कोटी ३१ लाख हिंदूंच्या जीवाला आज धोका आहे. त्या ठिकाणी कधी मंदिरे पाडली जात आहेत, तर कधी पुतळे तोडले जातात, हिंदू प्रतीकांची विटंबना केली जात आहे, या सर्व अन्यायाविरोधात आवाज उठवणारा किंवा निषेध करणाऱ्या हिंदूंच्या हत्या केल्या जातात. अनेक व्हिडिओ असे आहेत जे आपल्यासारख्या सहिष्णू हिंदू बांधवांना बघता येणे अशक्य आहे. आपण बघितलेल्या प्रत्येक व्हिडिओमध्ये हिंदूंवर अत्यंत क्रूरपणे त्रास दिलेला दिसून येत आहे. या ठिकाणी हिंदूंवर होणारे हल्ले आणि धमक्यांची तीव्रता वाढत आहे. याची दखल घेत बांगलादेशातील कट्टरवाद्यांना धडा शिकवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज केले.

परतुर येथे बांग्लादेशमधील हिंदू धर्मीयांवर होणाऱ्या अत्याचारांच्या विरोधात जाहीर निषेध व्यक्त करण्यासाठी हिंदू न्याय मोर्चा काढण्यात आला यामध्ये सर्वच हिंदुत्ववादी संघटना सहभागी झाल्या होत्या याप्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, बांग्लादेशामध्ये हिंदू समाजावर मुस्लिम कट्टरपंथीयांद्वारे अत्याचार होत आहे याचे तीव्र पडसाद देशभरासह राज्यातील विविध ठिकाणी दिसून येत आहे. यावेळी आयोजित



हिंदू न्याय मोर्चामध्ये निषेधाचे फलक झळकावत बांग्लादेश सरकार विरोधी घोषणा देण्यात आल्या. बांग्लादेशामध्ये हिंदू समाजावर मुस्लिम कट्टरपंथीयांद्वारे अत्याचार होत आहेत. तेथील मंदिरे, घरे, दुकाने जाळली जात आहेत. हिंदू महिलांवर देखील अमानविय पद्धतीने अत्याचार होत आहेत. ही बाब अत्यंत दुःखदायक असून सकल हिंदू समाजाच्या वतीने या घटनेचा यावेळी निषेध आला. तसेच हिंदूंच्या सन्मानासाठी केंद्र सरकार व आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने यावर कठोर भूमिका घ्यावी अशी मागणी देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह सर्वच हिंदुत्ववादी संघटनांनी निवेदनाद्वारे केली.बांग्लादेशी हिंदूंवर होणारा



अत्याचार हा मुद्दा आंतरराष्ट्रीय स्तरावर पेटलेला असून याबाबत देशभरातील हिंदूंच्या मनामध्ये कट्टरपंथीयांबाबत आक्रमक भूमिका घेण्याची भावना निर्माण झाली आहे. बांग्लादेश मध्ये राहत असलेल्या हिंदूंवर अनेक अन्याय अत्याचार केले जात आहे, याचा आक्रोश संपूर्ण जगात होत आहे. त्यामुळेच सकल हिंदू समाजाच्या वतीने हिंदू न्याय मोर्चाचे आयोजन करण्यात आले. यावेळी हजारोंच्या संख्येने तमाम हिंदू बांधवांनी सहभाग घेतला आहे. मतांच्या लांगुलचालना पोटी अनेक हिंदू असणारे अनेक राजकीय पक्षाचे नेते आणि पदाधिकारी या हिंदू न्याय मोर्चामध्ये सहभागी झाले नाहीत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांच्यासह केवळ भारतीय जनता पक्षाने एकत्र येऊन या मोर्चात सहभाग नोंदवला आहे. असेही यावेळी लोणीकर म्हणाले हिंदू धर्मातील प्रत्येक व्यक्ती सहिष्णुवृत्तीचा असून त्यासहिष्णुवृत्तीचा गैरफायदा घेत बांगलादेशात हिंदूंवर अनन्वित अत्याचार केले जात आहेत ही बाब बांगलादेशापूर्ती मर्यादित न राहता संपूर्ण जगासाठी एक उदाहरण आहे की आपण आपल्या धर्माची रक्षा स्वतः करायची आहे. आता तरी जागा व्हा नाही तर आपले पण असेच हाल होतील, आपला धर्म टिकला तर आपली संस्कृती टिकेल आपली संस्कृती टिकली तर आपण टिकू त्यासाठी प्रत्येकाने जागृत राहण्याची गरज असून कट्टर वाद्यांचा आपली धर्म आणि संस्कृती संपविण्याचा डाव आपण ओळखला पाहिजे असेही यावेळी लोणीकरांनी स्पष्ट केले.

## संक्षिप्त

### मंठा शहर कडकडीत बंद

## विशाल हिंदु न्याय मोर्चाने वेधले लक्ष



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

आज दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी मंठा शहर सकल हिंदु समाजाच्या वतीने बांगलादेशीय अल्पसंख्यांक हिंदूच्या मानवाधिकार, मालमत्ता आणि जीवांचे संरक्षण करण्याबाबत प्रशासनास निवेदन देण्यात आले यावेळी सदर निवेदनात आम्ही भारताचे प्रबुद्ध नागरीक प्रस्तुत निवेदनाद्वारे आपल्या समोर असे विषद करतो की, गेल्या काही महिन्यांपासून बांगलादेश या देशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदूच्या मानवाधिकार, मालमत्ता आणि जीवांचे हवन झाल्याचे विविध प्रसार माध्यमांमधून निदर्शनास येते चांगलादेशात गेल्या काही महिन्यांमध्ये हिंदू मंदिरांवर झालेले हल्ले, तोडफोड त्याचबरोबर हिंदू आबालवृद्ध आणि महिलांवर झालेले अमानवीय अत्याचार आणि त्यात सातत्याने होत असलेली वाढ ही गंभीर बाब असून अशाप्रकारच्या सर्व मानवाधिकारांचे हनन करणा–या वृत्तींना रोखण्यासाठी आपल्या स्तरावरून कार्यवाही व्हावी व अशा कार्यवाहीस आम्ही भारताचे हिंदु आपल्या सोबत ठामपणाने आहोत.

प्रस्तुत निवेदनाद्वारे आम्ही आपल्या हे नजरेस आणत आहोत की, अशाप्रकारे केलेल्या असहिष्णू आणि अमानवीय अत्याचारांमुळे बांगलादेशातील हिंदू समूदाय हा त्रस्त आणि व्यचित असून जगभरातील हिंदू समूदाय याची दखल घेत आहे. बांगलाद–शात झालेल्या हया धार्मिक अत्याचारांमुळे बांगलादेशातील हिंदूचे धार्मिक स्वातंत्र्य धोक्यात आले आहे आणि ह्या घटनांमूळे विभिन्न धर्मियाचे सहजीवन धोक्यात आल्याचे आणि बांगलादेश शासनाने त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट दिसते.

पुढे बोलताना सदर निवेदनात म्हंटले आहे की, दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी इस्कॉन खड्घउजछ (खपींशीपरींळेपरश्र डेलळशींू षीी घीळीहपर उेपीलळेीपर्शीी) च्या संबंधीत चिन्मय कृष्ण महाराज यांना खोटया गुन्ह्यात अडकवून जबदरस्तीने आणि हिंसात्मक पध्दतीने केलेली अटक ही निंदनीय आणि कुठल्याही शासनास अशोभनीय आहे. सदरील अटकेनंतर बांगलादेशातील हिंदू समाजाने लोकशाही पध्दतीने केलेल्या आंदोलनास हिंसात्मक पध्दतीने आणि अत्याचाराने चिरडण्यात आले. याचबरोबर असेही लक्षात आले आहे की, चिन्मय कृष्ण महाराजाना चित्तागोंग मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे, जिथे त्याना योग्य तो औषधोपचार आणि शाकाहारी भोजन गिळण्यास जाणीवपूर्वक अडचणी निर्माण करण्यात येत आहेत. ह्या बाबी जागतिक स्तरावर मान्य अशा मानवाधिकारांचे उल्लघन करणा–या आहेत चिन्मय कृष्ण महाराजांना ज्या कारागृहात ठेवण्यात आलेले आहे त्याच कारागृहात विविध कट्टर मुस्लिम दहशतवादी संघटना जसे की, हिज्य उन तहरिर, जमातूल मुजाहिदिन बांगलादेश, हरकत उल जिहाद, अन्सार अल इस्लाम आणि इतर अशाच कट्टरपंथीय आणि अन्य दहशतवादी संघटनाशी संबधित अतिरेक्यांना ठेवल्याचे समजते ही बाब अतिशय गंभीर असून चिन्मय कृष्ण महाराजाच्या जिवीतास बोका निर्माण करणारी आहे आणि अशाप्रकारचे कृत्य शासनाने करणे निषेधार्ह आहे, यातून बांगलादेश शासनाच्या हेतूवर शंका निर्माण होते हया अटक नंतर चित्सय कृष्ण महाराजांच्या इतर दोन सहका–यांनाही अटक केल्याने आणि शेकड़ी हिंदू धर्माचार्यांना भारतात येण्यापासून मज्ञाव केल्याने लक्षात येते अशाप्रकारे शासन स्तरावरून आणि बांगल–ादेशान असलेल्या बहुसंख्य मुस्लिम कट्टरपंथीयांकडून होत असलेले हिंदूचे भार्मिक उत्पीडन जगासमोर आले आहे.

## अलबेल कारभारा बाबत वंचित आघाडीने गटविकास अधिकाऱ्यांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**



पंचायत समिती अंतर्गत असलेल्या विभागांचा कारभार निरंकुश पद्धतीने चालू आहे जवळपास सर्वच विभाग प्रभारी अधिकाऱ्याकडे पदभार आहेत तालुक्यातील नागरिकांना या सर्व गोष्टींचा त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे आपण स्वतः लक्ष घालून कारभार सुरळीत करावा अन्यथा वंचित बहुजन आघाडी या विरोधात तीव्र आंदोलन करेल जसे कि आरोग्य विभाग रामभरोसे चालू आहे प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्मचाऱ्यांची सततची अनुपस्थिती मुळे रुग्णांचे बेहाल होत आहेत आष्टी प्राथमिक आरोग्य केंद्रात चार दिवसापूर्वी एका प्रेताच्या उत्तरीय तपासणीसाठी सहा तास डॉक्टरांची वाट पाहावी लागली ही बाब अत्यंत दुःख दायक आहे, शिक्षण विभागात सुद्धा हीचअवस्था आहे कार्यालय नेहमी रिकामे असून अनेक शाळातही शिक्षक अनधिकृत पणे गैर हजर आहेत केंद्र प्रमुख पदभाराच्या नावाखाली अध्यपणाचे काम करत नाहीत अशी स्थिती आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचे अत–ोनात नुकसन होत आहे याला जबाबदार कोण, घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना घरकुलचे देयके काढण्यासाठी आर्थिक व्यवहार केल्या शिवाय किंवा कोणच्या शिफारीसी शिवाय देयके अदा होत नाहीत, या अन्य सर्व गोष्टीकडे आपण काळजी पूर्वक लक्ष देऊन परिस्थिती सुधारावी अन्यथा वंचित बहुजन आघाडी या विरोधात तीव्र आंदोलन करेल, त्या नंतर परिणामाची जबाबदारी आपणावर राहील असा इशारा शेवटी दिला आहे. निवेदनावर रामप्रसाद किसनराव थोरात, रविंद्र भदर्गे तालुकाध्यक्ष, सचिन सोनपसारे, दिपक वक्ते, मनोज वंजारे, विशाल भदर्गे, कैलास देसमाने, प्रशांत वाकळे, गौनम मुंढे, दिपक भदर्गे, विकास प्रधान्, बाजीराव सोनपसारे, राजु गायकवाड आदिच्या सह्या आहेत.

## बांगलादेशातील हिंदू अत्याचारा विरोधात जाफराबाद तहसीलवर प्रचंड मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**



आज दहा डिसेंबर मानवाधिकार दिनाच्या औचित्य साधून जाफराबाद तालुक्यातील सकल हिंदू समाजाने हिंदू जागरण समितीच्या बॅनरखाली जाफराबाद तह–सीलवर न्याय मोर्चा काढला होता हा मोर्चा जाफराबाद छत्रपती शिवाजी महाराज चौकातून तहसील कार्यालयावर जाऊन तेथे तहसीलदार सारिका भगत यांना एक निवेदन दिले या निवेदनात लिहिले की बांगलादेशात हिंदूंना अत्यंत नीच वागणूक देणे सुरू असून त्यांच्यावर महिलावर हिंसात्मक अत्याचार सुरू आहे बांगलादेशातील इस्कॉन मंदिरातून कोरोना काळात मुस्लिम समाजाला अण्णदान देण्यात आले होते त्याच समाजाने इस्कॉन मंदिरावर हल्ला करून मंदिराची तोडफोड केली व मंदिराचे विश्वस्त परमपूजनीय कृष्ण महाराजांना अटक करून त्यांना जेलमध्ये टाकले येथील हिंसाचारानंतर हिंदूंनी काढलेल्या मोर्चाला चिरडून तेथील एका समाजाने मोर्चेकर्यावर हल्ला चढवला याचबरोबर या निवेदनात जाफराबाद स्थानिक च्या काही घटनांचा उल्लेख केला त्यात कोरोना काळाच्या अगोदर पासून २०० ते ३०० रोहिंगे येथे आले होते या रोहिंग्यांना आता पुढील मताच्या लाल–सेपोटी त्यांना जागा देऊन घरे बांधून देण्याचा येथे मानस धरून त्यांच्या घुसखोरीला पाठिंबा देण्यात येत आहे शहरातील बस स्थानक आठवडी बाजार यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थिनींना अश्लील कॉमेंट करून हिणवण्यात येत आहे अशा तक्रारी या निवेदनात नमूद केले आहे निघालेल्या मोर्चामध्ये हिंदू समाजाचे प्रचंड खदखद दिसून आली या मोर्चामध्ये शहरासहित ग्रामीण हिंदू समाज बांधवांनी भाग घेतला होता त्यात हरिभक्त परायण संजय महाराज भालके हरिभक्त परायण गणेश महाराज चव्हाण हरिभक्त परायण राघोगिरी महाराज हरिभक्त परायण ज्ञानेश्वर माऊली हरिभक्त परायण दिनांक महाराज यांच्यासह शेकडो हिंदु समाज बांधव उपस्थित सामील होते

## सर्व भारतीयांनी बंधुता संकल्पना मनात रुजवावी –सरकारी अभियोक्ता वर्षा मुकीम

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



१० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येत असतो. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय हे तत्व नमुद केले आहेत. या चार तत्वांचे पालन म्हणजेच मानवी अधिकार होय. नागरिकांनी आपल्यासह दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याचा प्रथमत: विचार करणे गरजेचे असून सर्व भारतीयांनी बंधुता संकल्पना मनात रुजवावी, असे प्रतिपादन सरकारी अभियोक्ता वर्षा मुकीम यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात मंगळवार दि.१० डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ४ वाजता मानवी हक्क दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे ड. महेश धन्नावत, तहसीलदार प्रणाली तायडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सरकारी अभियोक्ता श्रीमती मुकीम म्हणाल्या की, १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने ३० मानव अधिकाराचे घोषणापत्र स्विकारले. तर १९९३ पासून भारतात मानव अधिकार कायदा लागू करण्यात आला. आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोग स्थापन झाला. भारतीय संविधानाने दिलेले हक्क हिरावल्यास ते मिळवून देण्याचे काम मानवाधिकार आयोग करतो. जीवनात मानवाला उत्कर्ष साधायचा असेल तर सर्वांना माणसाप्रमाणे जगू देणे महत्वाचे आहे. प्रत्येक मानवाला नेहमी आपल्या कर्तव्याची जाण हवी. मानवाची उत्क्रांती सांगुन समाजात जीवन जगत असतांना झालेल्या स्थितीबदलाचा आलेखही त्यांनी यावेळी मांडला. निवासी उपजिल्हाधिकारी श्री.महाडिक म्हणाले की, भारतामध्ये जन्मताच जे हक्क प्राप्त होतात ते मुलभूत हक्क भारतीय संविधानात सर्वांना समान देण्यात आले आहेत. भारतीय संविधानाने बहाल केलेले अधिकार हे जबाबदारीशिवाय पुर्ण होत नाहीत याची जाणीव ठेवणे महत्वाचे आहे. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना सुखी व आनंदाने जीवन जगण्याचा अधिकार दिलेला आहे. आपले कर्तव्य सचोटीने पार पाडले तर मानवी हक्क अबाधित राहतील. भारतातील सर्व नागरिकांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात समान हक्क दिलेले आहेत. समाजातील गरीब व्यक्तीला न्यायालयात जाण्यासाठी विनामुल्य वकीलांची सहाय्यता मिळण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे ड. धन्नावत यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार प्रणाली तायडे यांनी केले. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीमधील विविध विभागाचे अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.



## तहसीलदार चव्हाणांनी धाड टाकून अंदाजे १०० ब्रास वाळू साठा केला जप्त

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड दि१० डिसेंबर मौजे गोरी गंधारी येथे महसूल प्रशासनामार्फत छापा टाकून मौजे गोरी येथील वाळूसाठा जप्त करण्यात आला वाळू माफिया महसूल प्रशासनाचे चाहूल लागताच प्रसार केणी व वाहन पसार झाले रेती साठ्यावर धाड सदर प्रकरणी अंबड तहसीलदार विजय चव्हाण, नायब तहसीलदार विवेक उडाण नायब तह–सीलदार पुरवठा खांदेभराड मंडळ अधिकारी कृष्णा एडके मंडळ अधिकारी नरोटे तलाठी सानप व इतर सर्व तलाठी त्यांच्या मदतीने गोपनीय रित्या खाजगी गाडीने मौजे गौरी येथे छापा टाकून रेतीसाठा जप्त करण्यात आला. वाहने उपलब्ध करून जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## .. तर लाडक्या बहिणींना सोबत घेऊन आंदोलन छेडणार –मा.आ.कैलास गोरंटयाल

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

लाडकी बहिण योजनेचे निकष बदलण्याच्या हालचाली शासनस्तरावर होत आहेत. मात्र, सदर योजनेच्या निकषात बदल केल्यास लाडक्या बहिणींना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा स्पष्ट इशारा मा.आ.कैलास गोरंटयाल यांनी दिला आहे.

राज्यात विधानसभेच्या निवडणुकीत पराभव अटळ असल्याच्या भीतीमुळे महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेचे निकष निश्चित करतांना सत्ताधारी पार गोंधळलेल्या अवस्थेत असल्याचे प्रामुख्याने दिसून आले. या गोंधळाच्या स्थितीमुळेच योजना सुरू केल्यानंतरही निकषात अनेकवेळा बदल करण्याची



नामुष्की राज्यकर्त्यांवर ओढवली

अशी टीका गोरंटयाल यांनी केली. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजने अंतर्गत पात्र असलेल्या लाडक्या बहिणींना राज्यात सरकार आल्यास प्रतिमहा १५०९ रूपया ऐवजी २१०० रुपये देण्याची घोषणा राज्यातील महायुतीच्या प्रमुख नेत्यांनी निवडणूक प्रचारा दरम्यान केली आणि आपल्या पदरात राज्यातील लाखो महीला भगिनिंचे मतदान पाडून घेतले. या लाडक्या बहिणींच्या बळावरच राज्यात महायुतीने पुन्हा एकदा सत्ता हस्तगत केली असतांना सत्तेवर येण्यापूर्वीच लाडकी बहीण योजनेच्या निकषात बदल करण्याच्या हालचाली शासनस्–तरावर सुरू असल्याचे दिसून येत आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी ज्या निकषानुसार लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यात आला त्याच निकषानुसार पात्र महीला भगिनींना योजनेचा लाभ देवून महायुतीच्या नेत्यांनी निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी अशी मागणी करून जर राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेच्या निकषात बदल करण्याचा प्रयत्न केला तर याच लाडक्या बहिणींना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा मा.आ.कैलास गोरंटयाल यांनी दिला आहे.

## चिंचेच्या ‘शिवाई’ वाणाला राष्ट्रीय मान्यता; परभणी कृषी विद्यापीठाचा गौरव

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

हिमायतबाग फळबाग संशोधन केंद्राने विकसित केलेल्या 'शिवाई' या चिंचेच्या वाणाला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. पीक मानक, अधिसूचना व वाण प्रसारण केंद्रीय उपसमितीने राज्यासाठी या वाणाची शिफारस केली आहे. त्यामुळे व्यावसायिकदृष्ट्या चिंच लागवड करण्याचा शेतकऱ्यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हिमायतबाग फळबाग संशोधन केंद्राने २०१८ मध्ये चिंचेचे 'शिवाई' वाण विकसित केले होते. पीक मानक, अधिसूचना व वाण प्रसारण केंद्रीय उपसमितीच्या बैठकीत भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे उद्यान विद्या उपमहानिदेशक संजयकुमार सिंग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत 'शिवाई' वाणाची भारतीय राजपत्रात नोंद करण्यात आली आहे. विकसित वाणाच्या तांत्रिक संशोधन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ही मान्यता दिली जाते. कुलगुरू डॉ. इंद्र मणी, संशोधन संचालक के. एस. बेग यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रज्ञ डॉ. संजय पाटील आणि सहकाऱ्यांनी 'शिवाई' वाणाचे चार हजार चिंचोके, शंभर रोपे, फळाचे नमुने आणि जनुकीय नकाशा सादर केला होता. त्यानंतर उपसमितीने राज्यासाठी चिंचेची शिफारस केली आहे. या मान्यतेमुळे शेतकरी व्यावसायिकदृष्ट्या 'शिवाई'ची लागवड करू शकणार आहेत. कृषी विभागाने चिंच महोत्सवासाठी शेतकऱ्यांकडून चिंचेचे उत्कृष्ट नमुने मागवले होते. या महोत्सवात शिवूर (ता. वैजापूर) येथील शेतकरी बाळासाहेब जाधव यांच्या चिंचेला पारितोषिक मिळाले होते. या चिंचेवर डॉ. संजय पाटील यांनी दहा वर्षे संशोधन केले. झाडाची रचना, फांद्या, फुलांचा आकार, फळाचा आकार यांच्या नोंदी घेण्यात आल्या. तसेच चिंचेतील साखर व टार्टारिक सिडचा विशेष अभ्यास करण्यात आला. इतर चिंचेच्या तुलनेत या चिंचेचा आकार मोठा आणि विद्राव्य घटक सरस असल्याचे संशोधनात आढळले. झाडाच्या वाढीचा पूर्ण अभ्यास करून निवड पद्धतीने वाण विकसित करण्यात आले.

### कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी वरदान

**शिवाई वाणाच्या चिंचेतील चिंचोक्याचा आकार मोठा आणि संख्या कमी असल्यामुळे गर जास्त मिळाते. चिंचेची कलमे देशातील विविध संशोधन केंद्रांना पाठविण्यात आली आहेत. देशभरात चिंचेला मोठी मागणी असून, पुरेसे उत्पादन नसल्याची स्थिती आहे. अशा परिस्थितीत शिवाई चिंच वरदार ठरली आहे. सध्या चिंचेचा दर ८० रुपये आणि चिंचोके ३५ रुपये किलो आहेत. कीडरोधक शिवाई वाण कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे.**



### एका झाडापासून ९ क्विंटल उत्पादन



**शिवाई वाणाच्या एका झाडापासून ८ ते ९ क्विंटल चिंचा निघतात. प्रक्रिया उद्योगात चिंचांना चाढती मागणी आहे. चॉकलेट, जेलीसह विविध खाद्य पदार्थांत चिंच वापरतात. फटाके उद्योगात चिंचोका पावडरला मागणी असते. कोरडवाहू भागासाठी चिंच वरदान ठरलेले पीक आहे.**

**- डॉ. संजय पाटील सोयगावकर, वरिष्ठ शास्त्रज्ञ**

### शिवाई ग्रामदैवत

**शिवूर येथील ग्रामदैवत शिवाई देवीच्या नावावरून चिंचेच्या वाणाला 'शिवाई' नाव देण्यात आले. या फळाची लांबी २०.४३ आणि रुंदी ३.१३ सेंटीमीटर आहे. तसेच चिंचेचे वजन ३६ ग्रॅम असून, प्रतिकिलो ४९७.७ ग्रॅम गर निघतो. इतर चिंचेत गराचे प्रमाण ४० टक्के, तर 'शिवाई'त हेच प्रमाण ४९ टक्के आहे, असे पाटील यांनी सांगितले. दापोली येथे बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठातील संयुक्त कृषी संशोधन व विकास समितीच्या बैठकीत 'शिवाई' वाणाला अधिकृत मान्यता मिळाली होती. आता राष्ट्रीय स्तरावर वाणावर मोहोर उमटली आहे.**

## आर्चिड टेक्नो स्कूलमध्ये गुरनाळे दाम्पत्याचा सत्कार



छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : मराठवाडा-कन्नडा सांस्कृतिक संघातर्फे छत्रपती संभाजीनगरमध्ये सिडको वाळूज महानगरमधील ऑर्चिड टेक्नो स्कूलमध्ये नुकत्याच पार पडलेल्या कन्नडा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. परिसरातील रसिकांह विद्यार्थी आणि पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी अशोक गुरनाळे आणि श्रीमती प्रतिभा गुरनाळे यांच्या संघातर्फे सपत्निक सत्कार करण्यात आला. यावेळी डावीकडून संघाचे गिरीशकुमार एम, धर्मेंद्र पुजारी, एम नदाफ, श्रीनिवास तेलंग, श्रीमती भाग्यश्री तेलंग, प्रतिभा गुरनाळे, अशोक गुरनाळे, केशप्पा होन्नाळी, गुरुशांतप्पा सी, साई रेड्डी वाय इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## डॉ.बी जी गायकवाड यांना महाराष्ट्ररत्न राष्ट्रीय पुरस्कार प्रदान



वाळूज महानगर (प्रतिनिधी) : वाळूज महानगर सह मराठवाडयात सामाजिक, संस्कृतीक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे डॉ. बी. जी. गायकवाड यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न राष्ट्रीय गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार अनुश्री महिला बहुउद्देशीय सामाजिक तथा शैक्षणिक संस्था भुसावळ यांच्या वतीने देण्यात आला. डॉ. गायकवाड यांना मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्काराबद्दल हनुमान भोंडवे,कैलास भोकरे, दशरथ मुळे, राजन सोमासे, सुनील काळे, उषा हांडे, राजेश कसुरे, मुप्टाचे सुनील मगरे, राजेंद्र जाधव, पद्माकर कांबळे , शेख मुनीर, सुनील पांडे, शिवराम म्हस्के, कास्ट्राईबचे देवानंद वानखडे,अनिल पांडे, डॉ ऋषिकेश कांबळे, डी. एन जाधव, गेनू शिंदे, गणेश घुले, कुमार बिरदवडे, श्रीराम पोतदार, अविनाश सोनटक्के, ईश्वर उमाळे, दिपक नागरे, आय. जी जाधव, भारती साळुंके, संदीप काजळे, लक्ष्मण हिवाळे, राधाकृष्ण बिघोट , उमेश डावखर, राजेंद्र घटकर, समाधान हराळ, प्रदीप माळी, पोपट रसाळ, डॉ. शंकर सुरासे, आदीसह अनेकांनी अभिनंदन केले.

## क्षुल्लक कारणावरून कपाळ फोडले

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : जोगेश्वरी येथील शरद रामदास साबळे हे मुलाची कटिंग करून दि. ७ डिसेंबर रोजी सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास घरी जात असताना अण्णाभाऊ साठे चौक परिसरात अजय शेलार रा. जोगेश्वरी याने मोटारसायकल पाडण्याच्या कारणावरून शरद साबळे व त्यांची आई दोघांना लाकडी दांड्याने मारहाण करत दगडाने साबळे यांचे कपाळ फोडले. याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जिवे मारण्याची धमकी

वाळूज महानगर (प्रतिनिधी) बांधकाम व्यावसायिक गोविंद सोलपुरे व त्यांच्या साथीदारांनी साळवे मामास शिवीगाळ करू नका असे म्हणताच दिनेश शेषराव दुधाट रा.वडगाव को. यास शिवीगाळ करून लोखंडी रॉड व दगडाने मारहाण करून जखमी केले. याप्रकरणी दिनेश दुधाट यांच्या तक्रारीवरून बांधकाम व्यावसायिक गोविंद सोलपुरे, सतीश हिंगणकर, मंगेश खोत, शरद चपटे यांच्यावर मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एमआयडीसी वाळूज पोलिस करीत आहेत.

## प.पू. सुधांशू महाराज यांचा एक दिवसीय सत्संग आणि गुरू दर्शन कार्यक्रमाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर : विश्व जागृती मिशन चे संस्थापक प.पू श्री सुधांशू महाराज हे छत्रपती संभाजी नगर मार्गे खामगाव येथे सत्संगासाठी जाणार असून दिनांक ११ डिसेंबर रोजी ते छत्रपती संभाजी नगर येथे मुक्कामी असून ते छत्रपती संभाजी नगर येथील समिती ने साधकांसाठी त्यांचा सत्संग आणि दर्शनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. हा कार्यक्रम दिनांक ११ डिसेंबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता जालना रोडवरील हॉटेल सिल्व्हर इन येथे होणार आहे. तरी सर्व साधकांनी हया कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक डॉ राजन महिंद्रा, अनंत मोताळे, अजित राणा आणि सौ. सुधा दरबस्तवार यांनी केले आहे.

## डॉ. पंजाबराव देशमुख हे समग्र समाजक्रांतीचे प्रणेते : डॉ. राजेश मिरगे

### डॉ. पंजाबराव देशमुख रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त व्याख्यान

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

अठरापगड घटकातील कृषक, कष्टकरी बहुजन समजाला शिक्षण-कृषी व सामाजिक क्षेत्रातील समग्र समाजक्रांतीची प्रेरणा देणारे प्रणेते म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य मोलाचे आहे, असे प्रतिपादन इतिहास संशोधक व अभ्यासक डॉ. राजेश मिरगे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात माजी केंद्रीय कृषी मंत्री, ज्येष्ठ समाजसुधारक डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विशेष व्याख्यानाचे सोमवारी, ९ रोजी आयोजन करण्यात आले होते. शिवाजी शिक्षण संस्था संचलित महात्मा फुले कला व सीतारामजी चौधरी वाणिज्य महाविद्यालय यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी 'क्रांतीदर्शी डॉ. पंजाबराव देशमुख : समग्र समाजक्रांती व संविधानविषयक कार्य' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी प्राचार्य डॉ. दिलीप हांडे, प्रा. मधुकरराव रोडे, डॉ. राजेश मिरगे, डॉ. सचिन देशमुख, संयोजक डॉ. कैलास अंभुरे, डॉ. छत्रभूज कदम, डॉ. कैलास पाथ्रीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मानव्य विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय साळुंके अध्यक्षस्थानी होते. महात्मा फुले सभागृहात हा कार्यक्रम झाला.

यावेळी डॉ. राजेश मिरगे म्हणाले, महापुरुषांचा अभ्यास करताना त्यांचे प्रेरणास्त्रोत समजून घेतले पाहिजेत. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनात छत्रपती शिवराय व राष्ट्रसंत तुकोबाराय या महापुषांचे महत्वाचे स्थान आहे. १९१७ मध्ये खामगावात भरलेल्या शिक्षण परिषदेत राजर्षी शाहु महाराजांची झालेली भेट आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. एक कर्तेसुधारक म्हणून पंजाबरावांनी धर्माची चिकित्सा व मानवी कल्याणाचा विचार मांडला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देखील घटना समितीत 'मोरल सपोर्ट' तर दिलाच, सोबतच सामाजिक परिवर्तनाच्या लढाईत सहभाग घेतला. केंद्रीय कृषी मंत्री, शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक, घटना समिती सदस्य अशा अनेक भूमिकांमधून डॉ. पंजाबराव देशमुख यांचे योगदान कायम स्मरणात राहील, असेही डॉ. मिरगे म्हणाले.

कृषकांचे पंचप्राण

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा 'कृषकांचे पंचप्राण' या शब्दात पंडित नेहरूंनी गौरव केला होता. त्यांचा वसा आणि वारसा संपूर्ण शेतकरी व मराठी माणसांनी समर्थपणे पुढे नेला पाहिजे, असे अध्यक्षीय समारोपात डॉ. संजय साळुंके म्हणाले. शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे वर्षभरात १५० व्याख्याने होणार आहेत, असे प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. दिलीप हाडे म्हणाले. डॉ. छत्रभूज कदम यांनी सूत्रसंचालन, तर डॉ. कैलास अंभुरे यांनी आभार मानले.

पंजाबरावांमुळेचे कुणबी 'ओबीसी'त

शेतकरी, कष्टकरी असलेला संपूर्ण कुणबी व अठरापगड समाज 'ओबीसी' असला पाहिजे, ही भूमिका डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अनेकवेळा मांडली. विदर्भातील शेतकरी कुणबी नोंदी करू लागले. मात्र, 'मराठा' ही प्रदेशात्मक संज्ञा मराठवाड्यातील कुणब्यांनी लावली आणि ते आरक्षणापासून वंचित राहिले. डॉ. पंजाबराव यांचे म्हणणे तेव्हाच समजून घेतले असते, तर राज्यातील सर्व शेतकरी घटकांना हा लाभ झाला असता, असे डॉ. मिरगे म्हणाले.

## जगी ज्यास कोणी नाही...

### मोकाट कुत्र्यांना दररोज खाऊ देणारा अवलिया



वाळूज महानगर, संजय निकम : मोकाट कुत्रे म्हटले की त्याची हेळसांड सुरूच असते, रस्त्याच्या बाजूला गुपचूप तरी पहुडले असले तरी त्याची खोड काढण्यात माणूस खूपच पटाईत, त्याला '' म्हणूनच हाकलणार. आणि त्याची हेटाळणी करणार...परंतु याला अपवाद पंढरपूर येथील ग्रामपंचायतचे कर्मचारी एकनाथ किर्तीकर हे आहेत, त्यानी गेल्या कित्येक वर्षांपासून दररोज सायंकाळी न चुकता मोकाट कुत्र्यांना पाहुणचार करण्याचा नियमच करून घेतल्याने परिसरात त्यांच्या या कृतीबद्दल वाहवा व कौतूक होत आहे.

ग्रामपंचायतमध्ये कर्मचारी असणारे एकनाथ किर्तीकर हे ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष आहेत, आजपर्यंत त्यांनी ग्रामपंचायत कर्मचार्यांच्या हितासाठी अनेक प्रकारचे आंदोलने केले आहे. इतक्या मोठ्या व्यस्त कामकाजातून एकनाथ किर्तीकर हे न चुकता दररोज सायंकाळी मोकाट कुत्र्यांना बिस्कीटे, चपाती, चिकन आदी पदार्थ खाऊ घालतात. पंढरपूर परिसरातील मोकाट,कुत्रे, मांजर रस्त्यावर पाहताच त्यांच्या भोवती गराडा घालतात, आणि किर्तीकर यांनी भरवलेल्या घासाबद्दल भरभरून प्रेम देतात. किर्तीकर हे मोकाट जनावरांना फक्त घासच भरवत नाहीत तर त्यांना जेवण दिल्यावर दोन्ही हात जोडून त्यांना नमस्कार करतात, त्यांच्या या कार्याचे अनेक व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत.


**माणसाच्या जातीवर भरवसा नाही पण मुक्या प्राण्यांवर आहे, सर्वात विषारी जात जी असेल ती माणसाची जात आहे. ही मोकाट जनावरे बिचारी मुकी आहेत, एका घासासाठी ती आपल्या आसपास येतात, आणि लोक त्यांना हाकलून देतात, याची मला जाणिव असल्याने मी गेल्या कित्येक वर्षांपासून स्वखर्चातून दररोज मोकाट कुत्र्यांना खाऊ घालतो, त्या बदल्यात मला मिळणारे प्रेम मी शब्दात व्यक्त करू शकत नाही.**

**-एकनाथ किर्तीकर, ग्रामपंचायत कर्मचारी**

**एकनाथ भाऊ हे आमच्या सर्वांचे भाऊ आहे, त्यांनी आतापर्यंत कोणालाही त्रास दिला नाही, कोणत्याच कामाला नकार दिला नाही, उलट गरीब नागरिकांना त्यांनी स्वखर्चातून मदत केल्याची मी पाहिले आहे. मी कित्येक वेळा त्यांना मोकाट कुत्र्यांच्या खाऊसाठी मदत करण्याचा प्रयत्न केला परंतु स्वाभिमानी एकनाथ भाऊंनी नेहमी नाकारले. मी ग्रामपंचायतमध्ये सदस्य, सरपंच आदी पद भोगले आहेत . परंतु या इतक्या वर्षात त्यांनी कोणाला दुखावले असल्याचे मला आठवत नाही.**

**- शेख अख्तर मा. सरपंच**

## श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसीच्या दोन स्टार्टअप प्रकल्पांचा नवांकुर प्री-इन्क्युबेशनसाठी निवड



वाळूज महानगर (प्रतिनिधी): बजाजनगर येथील श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी उद्द-ढण विद्यापीठाच्या नवांकुर कोहोर्ट ३.० मध्ये प्री-इन्क्युबेशनसाठी दोन स्टार्टअप प्रकल्पांची यशस्वी निवड झाली आहे. तुषार डांगरे आणि. पवन सौदागर यांनी ‘क्विक स्टे’ हा प्रकल्प सादर केला असून त्यांना प्रा. पल्लवी भोसलेंचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच, कु. साक्षी वटाणे यांनी ‘न्युट्री सीड्स’ हा प्रकल्प सादर केला असून डॉ. प्रभाकर पानझडे यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. या यशाबद्दल भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्थेचे अध्यक्ष एकनाथ जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष शेळके, प्रशासकीय अधिकारी श्री. बी.बी. जाधव आणि सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## क्यूट डकलिंगस् पब्लिक स्कूलच्या स्नेहसंमेलनात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगत

छत्रपती संभाजीनग/प्रतिनिधी

श्रेयनगरमधील क्यूट डकलिंगस् पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन संत एकनाथ रंगमंदिरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरे करण्यात आले.

स्नेह संमेलनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संगीता मुंजग जिजाऊ बिग्रेडच्या अध्यक्षा संगीता मुंजग तसेच श्रेयनगर महिला मंडळाच्या उपाध्यक्षा अर्चना जोशी यांची उपस्थिती होती. अतिथींसह शाळेचे अध्यक्ष प्रा. किरण चंबल, शाळेच्या सचिव डॉ. अमिता जैन, शाळेच्या मुख्याध्यापिका विजया विप्र व उपमुख्याध्यापिका अनुराधा कुलकर्णी यांनी दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन केले. विद्यार्थ्यांनी स्वागतनृत्य केले.

सूत्रसंचालन इयत्ता १० वीची विद्यार्थिनी सानी देशपांडे व यशीता मुंदडा यांनी केले. शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित विद्यार्थ्याने उकृष्ट नाटिका सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. सुनियोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी 'हरे राम हरे राम, छलका रे, धडक धडक, मौजा ही मौजा, आई मला खेळायला जायचंय आणि विठ्ठल गाणे यावर भरदार नृत्य सादर केले. सानी देशपांडे हिने एकपात्री नाटक तसेच मधु कौसडीकर आणि साक्षी शिरोडकर हिने भरतनट्यम सादर केले. तसेच विहम शिरूरकर यांनी बासरी वादन सादर केले व यशीता मुंदडा हिने उकृष्ट गिटार वादन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनुराधा कुलकर्णी, मनिषा पवार आणि ममता मसाळकर या शिक्षिकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## सिडकोच्या अधिकाऱ्यांना शिकवला शेतकऱ्याने धडा

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) :गोलवाडी येथील एका शेतकर् यावर सरकारी ‘बाबू’ आपल्या पदाचा धाक जमविण्याच्या प्रयत्नात नियमाबाह्य काम करून गट मोजणीचा कसलाही आदेश नसताना, या शेतकर्याची जमीन आपल्या हक्कात येते असे भासवून उभ्या पिकात मशीन लावून मोजणी करत होते परंतु हे काम नियमबाह्य होत असल्याचे आढळून येताच शेतकर्याच्या मुलाने त्या अधिकार्यांना नियम दाखवत चांगलीच जिरवल्याचा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल होत आहे.

गोलवाडी येथील शेतकरी देविलाल सलामपुरे यांची गट नं. ६८ मध्ये २ हे. ११ आर. इतकी शेत जमीन असून, या जमिनीत यावर्षी ऊस, तूर व मिरचीचे पिक आहे. या जमिनीच्या आसपास मोठ्मोठ्या बिल्डरांनी जमिनी विकत घेऊन त्याठिकाणी प्लॉटिंग सुरू केलेली आहे. सलामपुरे ताब्यातील जमिनीचा वाद सुरु आहे. तरीही सिडकोचे अधिकारी गट मोजणी आले होते.

या जमिनीचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असतानाही पैशाच्या जोरावर दुय्यम निबंधकांना हाताशी धरून नियमबाह्य रजिस्ट्री करून घेतली व सिडकोच्या अधिकार्यांकडून ‘त्या’ बिल्डरांनी बाजूच्या जमिनीचा ले-आऊट मंजूर करून घेत ओपन स्पेस सलामपुरे यांच्या शेतात दाखवला. यावेळी सलामपुरे यांच्या मुलांनी पुन्हा सिडको, दुय्यम निबंधक कार्यालयाला पत्र व्यवहार करत सर्व पुरावे अर्जासोबत जोडून या शेतीचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे अनेकवेळा लक्षात आणून दिले,तरीही हे अधिकारी कोणाचेच एकूण घेण्याच्या परिस्थितीत नव्हते. या ना त्या कारणावरून या शेतकर्याला त्रास देणे सुरुच ठेवले होते.

गट मोजणी वळदगावची पण केली गोलवाडीची

कोणत्या ना कोणत्या कारणाने सिडकोचे अधिकारी या शेतकर्याला त्रास देतच होते, त्यातच मागील आठवड्यात गट मोजणीसाठी सिडकोच्यावतीने के.पी. असोसिएट या सर्वे एजन्सीला वळदगाव येथील गट नं. ५८ चे मोजणी करण्यास दिले असताना, या एजन्सीचे लोक गोलवाडी येथील गट नं. ६८ मध्ये अधिकार्यांसह दाखल झाले. पीडित शेतकर्याच्या शेतामध्ये सेंटर पॉइंट टाकून मोजणी करण्यासाठी धडकले. मोजणीही सुरू झाली.

शेत तुमच्या बापाचे... की माझ्या

यावेळी शेतकर्याचा मुलगा कमलेश याने सदर मोजणी ही बेकायदा असून, तुम्ही मोजणी करू नका, असे सांगत कागदपत्रे दाखवा, अशी मागणी केली. यावेळी ही मोजणी नियमबाह्य होत असल्याचे लक्षात येताच कमलेश यांचा पारा चढला व त्यांनी हे शेत मोजण्याचा अधिकार कोणाला आहे असा प्रश्न करत ‘हे शेत माझ्या बापाचे आहे की, तुमच्या बापाचे असा थेट सवाल करत अधिकार्यांना चांगलेच पैलावर घेतले. एरवी सामान्य जनतेचा कायद्याचा धाक दाखवून कायद्याच्या कचाट्यात अडकविण्याची धमक ठेवणारे अधिकारी मात्र ‘बाप’ काढूनही हतबल होते.

कमलेश सलामपुरे यांना हा गट सिडकोमधून वगळण्यात आल्याचे लेखी त्या अधिकाऱ्यांनी लिहून दिले. कित्येक वर्षांपासून चकरा मारूनही काम झाले नाही ते खाबूगिरीच्या नांदात सरकारी बाबू फसल्याने त्यांना लिहून द्यावे लागले . परंतु या अधिकार्यांना नियम दाखवत ऑन दी स्पॉट चांगलीच कान उघाडणी केल्याचा व्हिडिओ सध्या समाज माध्यमावर चांगलाच व्हायरल होत आहे.

## राजा शिवाजी विद्यालयावर प्रशासक नेमणार?

### सहाय्यक संचालकांचे उपोषणकर्त्यांना पत्र

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : बजाजनगरातील भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्था संचलित राजा शिवाजी उच्च माध्यमिक या महाविद्यालयावर प्रशासक नेमण्यात यावा या व इतर अनेक मागण्यांसह येथील चार सहशिक्षकांनी आंदोलन करत उपोषण सुरू केले होते. त्यांच्या मागण्या मान्य करत कारवाई करण्याचे आश्वासन देत डिसेंबर अखेरपर्यंत या शाळेवर प्रशासक नेमण्यात येणार असल्याचे कळविले आहे.

बजाजनगरातील राजा शिवाजी उच्च माध्यमिक शाळेंमध्ये आतापर्यंत अनेकप्रकारची बोगस नियुक्त्या व शिक्षकांच्या वेतनसंदर्भात होत असलेल्या पिळवणुकीमुळे शाळेतील पद्माकर पगार, सविता हिंगे, अरुणा चौधरी व संतोष सुरडकर या चार सहशिक्षकांनी शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर दि. ३ डिसेंबरपासून उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाची प्रशासनाने दखल घेत सहाय्यक संचालक यांनी लेखी पत्राद्वारे या शाळेवर कारवाई करण्याचे आश्वासन देत डिसेंबर २०२४ अखेर शाळेवर प्रशासक नेमणार असल्याचे उपोषणकर्त्यांना प्रशासनाच्यावतीने दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

**या संदर्भात आम्हाला शिक्षण उपसंचालक यांनी लेखी स्वरुपात काहीही कळविले नाही, ज्यावेळी पत्र येईल, त्यावेळेस कळवेल. कारवाई होणार असेल तर जी होईल त्याला मी समर्थ आहे, मी कोणतेही चुकीचे काम केलेले नाही. पेपर मध्ये कितीही बातम्या आल्या तरी काही फरक पडत नाही. दोन तीन दिवसात लोकं विसरून जातात.**

**-विमल जाधव**

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# बांगलादेशातील अल्पसंख्यांक हिंदूंवर होणाऱ्या अत्याचार विरोधात कारवाईची मागणी

## अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेच्या वतीने तहसीलदारांना निवेदन

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१० डिसेंबर: बांगलादेशातील अल्पसंख्यांक हिंदू वरील अत्याचारा विरोधात कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदनअखिल भारतीय अधिवक्ता परिषद देवगिरी प्रांत गंगापूरच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात केली आहे. अखिल भारतीय अधिवक्ता परिषद ही देशातील वकिलांची सर्वात मोठी संघटना असून जी राष्ट्र आणि समाजाला समोर ठेवून काम करते समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत न्याय पोहोचला पाहिजे या तत्त्वावर संघटना देशभरात कार्यरत आहे सर्वांना मानवी हक्क प्रदान करणे हे संघटनेच्या मूळ उद्दिष्टांपैकी एक आहे बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारामुळे अधिवक्ता परिषद अत्यंत व्यतिथ आहे. बांगलादेशात हिंदूंच्या मंदिरावर आणि घरांवर हिंसाचार आणि छळवणूकीच्या अनेक घटना घडल्या आहेत शेजारील देशातील अल्पसंख्याकांना अशा प्रकारच्या छळाचा सामना करावा लागतो हे अत्यंत खेदजनक आणि चिंताजनक आहे.

बांगलादेशातील हिंदू समाजाविरुद्ध हिंसक आणि त्यांच्या मूलभूत हक्कांचे होणारे उल्लंघन अत्यंत चिंताजनक आहे बांगलादेशात संविधानाचा गळा घोटला जात आहे आणि हिंदू समाजाला लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आलेल्या काही घटना मंदिरांवर हल्ले घरांची तोडफोड व लूट हिंसाचार



आणि हत्या धर्मांतरासाठी दबाव सरकारी संरक्षणाचा अभाव आहे करिता अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेकडून भारत सरकारला विनंती करण्यात येत आहे की हिंदूंच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी आणि त्यांना त्यांचा धर्म आणि संस्कृती पाळण्याचे स्वातंत्र्य देण्यासाठी बांगलादेश सरकारवर दबाव आणावा तसेच बांगलादेश सरकारने हिंदूंवरील अत्याचार त्वरित थांबवावेआणि दोषींवर कठोर कारवाई करावी व आंतरराष्ट्रीय समुदायाने या समस्येकडे लक्ष द्यावे आणि बांगलादेशातील मानवाधिकार परिस्थिती सुधारण्यासाठी पावले उचलावी केंद्र सरकार, बांगलादेश सरकार आणि आंतरराष्ट्रीय समुदाय यांनी गांभीर्याने विचार करावा आणि बांगलादेशातील हिंदूंच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कडक पावले उचलावी अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी अधिवक्ता परिषद गंगापूर अध्यक्ष ड. किशोर कऱ्हाळे महामंत्रीड. एम.पी. दारून्टे अधिवक्ता परिषद सदस्य ड.विठ्ठल काळे.बी.आर.राजपूत, पि.बी. जोशी,व्ही. एस. मनोरकर, ए.बी. कुलकर्णी, डि.व्ही.साबणे,जी.बी. चव्हाण, रविराज दारुंटे,बी. एस.शिंदे, एस. एस. कसाने,ए. डी.सिरसाठ, जी एल कुलकर्णी , अमोल रासकर, ,ए.एस. इंगळे, टि. व्ही.कोल्हे,एम.डी.तांबे, पि.आर. बरडे, ए. आर.बरडे एम.एम.पवार, आर. जी. पवार, एस बी पदार, ए आर राजपूत, के. बी. म्हस्के,ई.ए. कानडे, एस. एन. साबणे, एस. एस.बन्सोड आदींच्या स्वाक्षरी आहेत.

बांगलादेशात हिंदू मंदिरांवर हल्ले करून ज्यात तोडफोड मूर्तींची विटंबना आणि जाळपोळ ५९ टक्के हिंसाचार झाला आहे. पूजेदरम्यान ६९ मंदिरांवर हल्ले झाले. हिंदू समाजाच्या घरांची तोडफोड करून त्यांची मालमत्ता लुटण्यात आली, हिंदू समाजातील लोकांवर हल्ले झाले त्यात अनेक लोक मारले गेले आहेत तसेच १५०० हिंदू शिक्षकांना राजीनामा द्यावा लागला, हिंदू समाजातील लोकांवर धर्मांतरासाठी दबाव टाकला जात आहे, बांगलादेश सरकार या घटना रोखण्यात अपयशी ठरत आहे. या गोष्टींकडे केंद्र सरकारने त्वरित लक्ष घालावे.

### जाहिर प्रगटन

दिनांक– १५/१०/२०२४

सर्व जनता मौजे कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद यांना या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येतेकी अर्जदार श्री/ श्रीमंती लक्ष्मण किसनराव डोळस रा. कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद यांनी अर्ज देवून कळविले की, त्यांच्या मालकीचा मौजे कन्नड शिवारातील स.नं. ३९ मध्ये प्लॉट क्र क्षेत्र ०३ क्षेत्र ०–१२५–चौ मी आहे. सदर प्लॉटची आदयापर्यंत ७/१२ अभिलेखावर नोंद घेण्यात आलेली नसल्याचे त्यांनी अर्जात नमुद केले आहे. सदर प्लॉट त्यांनी श्री. शे. उस्मान यासिन शे. मजिद शे. यासीन, रामराव शंकर मालकर व इतर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर यांचे कडून खरेदीने घेतलेला आहे. सदर प्लॉटचे दुय्यम निबंधक कन्नड यांचेकडे खरेदी खत दस्त क्रमांक ७७५/१६७७ दिनाक १/८/१९८६, २०/४/१९८२ असा आहे.

अर्जदार श्री/श्रीमती. लक्ष्मण किसनराव डोळस रा. कन्नड ता. कन्नड यांनी दिलेल्या अर्जावरून सदर प्लॉटची नोंद फेरफार रजीस्टरला नोंद क्र २५०३८ वर घेण्यात आली आहे. या नोंदीबाबत कुणाला काही आक्षेप / तक्रार असल्यास त्यांनी खालील सही करणार याच्याकडे हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत लेखी कळवावे, मुदतीत आक्षेप / तक्रार प्राप्त नसल्यास कोणाचे काहीही आक्षेप तक्रार नाही असे समजून मुदतीनंतर नोंद मंजुर करून घेतली जाईल. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा / तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

ठिकाण–कन्नड

दिनांक– १५/१०/२०२४

तलाठी सजा कन्नड

## विलो ने सादर केली आधुनिक फर्टिगेशन ट्रॉली; शेतीत क्रांती घडवण्याची तयारी

पुणे – जलव्यवस्थापन क्षेत्रातील आघाडीची कंपनी विलो ने फर्टिगेशन ट्रॉली सादर केली आहे. ही प्रणाली सिंचन व खत व्यवस्थापन एकत्रित करते. सौरऊर्जेवर चालणाऱ्या या यंत्रामुळे खतांचा वापर ४०% कमी होतो, पिकांचे उत्पादन ३०% वाढते आणि पाण्याचा वापर नियंत्रित होतो, ज्यामुळे शेतकऱ्यांसाठी प्रभावी व उपयुक्त उपाय मिळतो. भारतीय शेती क्षेत्राला नेहमीच उच्च उत्पादन खर्चाचा सामना करावा लागतो. विलो ची फर्टिगेशन ट्रॉली पिकांना त्यांच्याला आवश्यक त्या टप्प्यावर योग्य प्रमाणात पाणी व पोषकतत्व पुरवते. यामुळे संसाधनांची बचत होते, मजुरीचा खर्च कमी होतो आणि उत्पादन खर्चात घट होते. 'मेक इन इंडिया' उपक्रमाशी सुसंगत असलेल्या या फर्टिगेशन ट्रॉली चे उत्पादन भारतातच केले जाते.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.वि.अर्ज क्र.५५८/२०२४

अर्जदार : १) अनिल बन्सी कोळसे, वय ३८ वर्षे, धंदा मजुरी रा. रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) कल्पना भ्र. किसन गायकवाड, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम रा. क्रांती नगर, गल्ली नं.१, क्रांती चौक, छत्रपती संभाजीनगर ३) बेबी भ्र. कैलाश धीवर, वय ४९ वर्षे, धंदा. घरकाम रा. रांजणगाव शेणपुंजी, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) जयश्री भ्र. संजय भालेराव, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम रा. रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) कविता भ्र. विजु बनसोडे, वय ३७ वर्षे धंदा घरकाम रा. घानेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.ए. पारधे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ५ आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असुन अर्जदार क्र.१ यांची आई नामे कडुबाई बन्सी कोळसे ह्या मौजे रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर येथील रहिवाशी होत्या त्या दिनांक ३०/१२/२०२० रोजी मौजे रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर येथे मयत झालेल्या आहे. तसेच अर्जदारांचे वडील नामे बन्सी राघोजी कोळसे हे यापुर्वीच मयत झालेले आहे. मयत कडुबाई बन्सी कोळसे यांना अर्जदार क्र.१ ते ५ हेच कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन वारसप्रमाणत्र मिळणे कामी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ९/१२/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

### जाहीर प्रगटन

**माननीय दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर**

सिव्हिल एम ए नं. ५२३ /२०२४.

पू तारीख १३/०१/२०२५

अर्जदार. :– १) मंदा भ्र पोपट दुशिंग, वय ४५ वर्ष धंदा शेती रा, बोलठाण ता, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद. २) योगेश पि पोपट दुशिंग, वय ३० वर्ष, धंदा शेती रा, बोलठाण ता, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद. ३) ऋषिकेश पि पोपट दुशिंग, वय २४ वर्ष, धंदा शेती रा. बोलठाण ता, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद. ४) ज्योती भ्र कैलास बागुल, वय ३३ वर्ष, धंदा शेती, रा, खंडाळा ता वैजापूर, जिल्हा औरंगाबाद. ५) स्वाती भ्र सुनील म्हस्के, वय २८ वर्ष, धंदा शेती,रा, गवळीशिवरा, ता गंगापूर, जिल्हा औरंगाबाद. ६) पूजा भ्र कांतीलाल पठारे, वय २६ वर्ष, धंदा रा सायगाव ता येवला जिल्हा नाशिक

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

असे की, ज्या आर्थी वरील अर्जदारांनी ॲड आर जी माघाडे यांच्यामार्फत वारस प्रमाणपत्र मिळणे कामे अर्ज दाखल केला आहे की असे की, अर्जदार क्र १ ही मयत पोपट खंडूजी दुशिंग यांची पत्नी असून, अर्जदार क्र २ ते ३ मुले असून अर्जदार क्र ४ ते ६ ह्या विवाहित मुली आहे. अर्जदार क्र २ ते ६ आपसात सखे भाऊ बहीण आहेत. अर्जदार क्र १ चे पती व अर्जदार क्र २ ते ६ यांचे वडील मयत पोपट खंडूजी दुशिंग हे दिनांक २८/०९/२०१६ रोजी राहत्या घरी मौजे बोलठाण ता गंगापूर जी औरंगाबाद येथे मयत झाले असून त्यांना अर्जदार क्र १ ते ६ हे मयत पोपट खंडूजी दुशिंग यांचे एकमेव कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र १ ते ६ यांच्या व्यतिरिक्त मयत व्यक्तीस इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. असे की, मयत पोपट खंडूजी दुशिंग यांच्या मृत्यूनंतर अर्जदार यांना शासकीय निम शासकीय व इतर कार्यालयीन कामा करता मयत पोपट खंडूजी दुशिंग यांचे कायदेशीर वारसदार असल्याचे प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी प्रस्तुत चा अर्ज माननीय न्यायालयत दाखल केलेला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की सदरील अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचे काही हरकत अथवा आक्षेप उजर् असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्धीपासून ३० दिवसाच्या आत आपले आक्षेप हरकत अथवा उजर माननीय न्यायालयात लेखी स्वरूपात नोंदवावा मुदतीत आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदार यांना त्यांच्या मागणीनुसार वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी,

आज दिनांक १०/१२/२०२४ रोजी माझ्यावर न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले

कनिष्ठ लिपिक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ५७०/२०२४

अर्जदार : १) रमेश कचरु मोरे, वय ७४ वर्षे, धंदा शेती, रा. पुरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) प्रकाश कचरु मोरे, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. पुरी ला. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) हिराबाई पि. कचरु मोरे, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. पुरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. जी.बी. चव्हाण यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ हे नात्याने सख्खे बहिण भाऊ असुन अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील नाने कचरु काशिनाथ मोरे हे मौजे पुरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक १४/११/२०१४ रोजी मौजे पुरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई ही २० वर्षापुर्वीच मयत झालेली आहे. मयत कचरु काशिनाथ मोरे यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे पश्चात कार्यालयीन शासकीय व इतर कामासाठी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दिनांक २८/०१/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १०/१२/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर यांचे न्यायालयात**

सिव्हिल एम.ए. क्र. ५६९/२०२४

अर्जदार : १) निवृत्ती बाजीराव चव्हाण, वय ४२ वर्षे, धंदा शेती रा. दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) मिनाबाई भ्र. अशोक सालपुरे, वय ५४ वर्षे, धंदा घरकाम रा. जवळी बु. ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर ३) जनाबाई भ्र. भाऊसाहेब पवार, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम रा. लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) बाजीराव रामभाऊ चव्हाण, वय ७६ वर्षे, धंदा शेती रा. दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. व्ही.एस. काळे पाटील यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र. २ व ३ ह्या आपसांत नात्याने सख्या बहिणी असुन अर्जदार क्र.१ हा त्यांचा भाऊ आहे व अर्जदार क्र.४ हे अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई व अर्जदार क्र.४ ची पत्नी नामे झेलुबाई बाजीराव चव्हाण या मौजे दायगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होत्या त्या दिनांक २४/०५/२०२३ रोजी मौजे दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेल्या आहे. मयत झेलुबाई बाजीराव चव्हाण यांना अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्दीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १०/१२/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहा अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.
आदेश/प्र.क्र.३९९२/कावी–४७४६
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :– २४.१०.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :– सय्यद इमरान सय्यद कादर अत्तार, वय–२८ वर्ष, व्यवसाय–मजुरी, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगरः

विरूध्द

गैरअर्जदार मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :– जन्म– मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी सय्यद इमरान सय्यद कादर अत्तार, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर, यांचा दिनांक १२.०६.१९९६, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म–मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा–२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सय्यद इमरान सय्यद कादर अत्तार, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक १२.०६.१९९६, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर / आक्षेप हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर /आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मू.
आदेश/प्र.क्र.३९९१/कावी–४७४५
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :–१७.१०.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार नसरीन शाकिर शेख, वय–३८ वर्ष, व्यवसाय–घरकाम,

रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ. संभाजीनगर,

विरूध्द

गैरअर्जदार मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर,

विषय : जन्म – मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज उपरोक्त विषयी नसरीन शाकिर शेख, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि. छ.संभाजीनगर, यांचा दिनांक १०.१२.१९८६, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म–मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा–२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, नसरीन शाकिर शेख, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक १०.१२.१९८६, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म आला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुष्णाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर आक्षेप हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मू.
आदेश/प्र.क्र.३९९६/कावि–४७५०
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक : –२५.१०.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :– सना अंजुम इमरान सय्यद, वय–२४ वर्षे, व्यवसाय–घरकाम, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर,

विरूध्द

गैरअर्जदार :– मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :– जन्म– मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी सना अंजुम इमरान सय्यद, रा. सिल्लोड ता.सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक १४.११.२०००, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म–मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा–२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की सना अंजुम इमरान सय्यद, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ. संभाजीनगर, यांचा दिनांक १४.११.२०००, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर आक्षेप हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर / आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.पू.
आदेश/प्र.क्र.३९९३/काचि–४७४७
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक २९.१०.२०२४

### जाहीर प्रगटन

अर्जदार :– सय्यद सहाम सय्यद कादर अतार, वय–३४ वर्षे, व्यवसाय– मजुरी रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर,

विरूध्द

गैरअर्जदार मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर,

विषय :– जन्म– मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी सय्यद सद्दाम सय्यद कादर अत्तार, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९९०, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म–मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा–२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सय्यद सद्दाम सय्यद कादर अत्तार, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९९०, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर / आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर /आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी,

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.म्र.
आदेश/प्र.क्र.३९९८/कावि–४७५२
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :– २५.१०.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :– रईसाबी शेख पाशू अतार, वय–५६ वर्षे, व्यवसाय–घरकाम, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :– मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :– जन्म – मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी रईसाबी शेख पाशू अतार, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि. छ.संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९६८, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म–मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा–२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, रईसाबी शेख

पाशू अतार, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९६८, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द इ गालेपासून ३० दिवसाच्या आत उजर आक्षेप हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मू.
आदेश/प्र.क्र.३९९७/कावि–४७५१
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :– १७.१०.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार : शेख पाशू शेख यासीन, वय–६१ वर्षे, व्यवसाय– मजुरी रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :– जन्म– मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी शेख पाशू शेख यासीन, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९६३, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म–मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा–२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, शेख पाशू

शेख यासीन, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ. संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९६३, रोजी मौजे सिल्लोड बेथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झ गालेपासून ३० दिवसाच्या आत उजर / आक्षेप हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा, मुद्तीनंतर आलेले कोणतेही उजर आक्षेप हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात बेईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मू.
आदेश/प्र.क्र.३९९५/काचि–४७४९
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :–२५.१०.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार सय्यद शाईन सय्यद सद्दाम, वय–२७ वर्षे, व्यवसाय–घरकाम, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :– मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :– जन्म – मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी सय्यद शाईन सय्यद सहाम, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९९७, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म–मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा–२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सय्यद शाईन सय्यद सद्दाम, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९९७, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर/आक्षेप हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर आक्षेप हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मू.
आदेश/प्र.क्र.३९९४/कावि–४७४८
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :– २५.१०.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार : सैय्यद कादर सैय्यद अजीज अतार, वय–७९ वर्षे, व्यवसाय– मजुरी. रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म – मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी सैय्यद कादर सैय्यद अजीज अतार, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९४५, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म–मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा–२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की सैय्यद कादर सैय्यद अजीज अतार, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९४५, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर आक्षेप हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर /आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.
आदेश/प्र.क्र.३९९०/कावी–४७४४
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :–३०.१०.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार : शाकिर नजीर शेख, वय–४३ वर्षे, व्यवसाय–मजुरी, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :– मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :– जन्म – मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज उपरोक्त विषयी शाकिर नजीर शेख, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ. संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०२.१९८१, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म–मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा–२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, शाकिर नजीर शेख, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०२.१९८१, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे अन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.
आदेश/प्र.क्र३९९९/कावी–४७५३
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
सिल्लोड दिनांक :–३०.१०.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार : सैय्यद सोफियाबी सैय्यद कादर अतार वय–७८ वर्षे, व्यवसाय–घरकाम, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार :– मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :– जन्म– मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी सैय्यद सोफियाबी सैय्यद कादर अतार, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९४६, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म–मृत्यू नोंदणी कायदा–१९६९ सुधारणा–२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सैय्यद सोफियाबी सैय्यद कादर अतार, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ. संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९४६, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर / आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

## संक्षिप्त वृत्त...

### काही रेल्वेगाडया अंशतः रद्द

**परभणी,/प्रतिनिधी-** हैद्राबाद विभागातील रोलिंग ब्लॉकमुळे काही रेल्वे गाड्यांवर परिणाम झाला असून त्याामुळे काही रेल्वेगाड्या अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क विभागाने दिली.

गाडी संख्या १७६८७ मनमाड-धर्माबाद मराठवाडा एक्सप्रेस १० ते १५ डिसेंबर दरम्यान नांदेड-धर्माबाद दरम्यान रद्द असणार आहे. तर १७६८८ धर्माबाद-मनमाड मराठवाडा एक्सप्रेस ११ ते १६ डिसेंबर दरम्यान धर्माबाद नांदेड दरम्यान रद्द असणार आहे. ११४०९ दौंड-निजामाबाद डेमू ही गाडी १० ते १५ डिसेंबर दरम्यान मुदखेड-निजामाबाद दरम्यान तर ०१४१३ निजामाबाद-पंढरपूर डेमू ही गाडी ११ ते १६ डिसेंबर दरम्यान निजामाबाद ते मुदखेड दरम्यान रद्द असणार आहे. या व्यतिरिक्त सिकंदराबाद विभागातील रामगुंडम राघवपुरम स्थानका दरम्यान मालगाडी घसरल्यामुळे काही रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत, काही अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत. तर काहींचा मार्ग बदलण्यात आला आहे. त्याा ०७५९८ परळी-पूर्णा, ०७५९९ पूर्णा-परळी, ०७८५३ निजामाबाद-नांदेड, ०७८५४ नांदेड-निजामाबाद रेल्वे १४ डिसेंबर रोजी रद्द करण्यात आली आहे. ११४०९ दौंड निजामाबाद, १३ डिसेंबर रोजी मुदखेड-निजामाबाद दरम्यान तर ०१४१३ निजामाबाद - पंढरपूर, १४ डिसेंबर रोजी निजामाबाद-मुदखेड दरम्यान रद्द करण्यात आली आहे.

### गंगाखेडात ग्राहक जागरण पंधरवाडयाचे आयोजन करा- अ.भा.ग्राहक पंचायत

**परभणी,/प्रतिनिधी :** दरवर्षी २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो, त्याा अनुषंगाने १५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या दरम्यान ग्राहक जागरण पंधरवाडा आयोजित करावा, अशी मागणी येथील अखिल भारतीय ग्राहक पंचायत शाखा गंगाखेड च्या वतीने तहसीलदार उषाकिरण शृंगारे तसेच पुरवठा अधिकारी प्रीतम दोडाल यांना सोमवार ९ डिसेंबर रोजी देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

ग्राहक दिन साजरा करण्याच्या संबंधाने केलेल्या नियोजनात शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजना, ग्राहकांना आवश्यक असलेली सर्व माहिती या गोष्टींचा समावेश असावा. यासाठी कॉलेज, शाळा, व ग्रामीण भागातील खेडी अशा सर्व ठिकाणी ग्राहक जागरणाचे कार्य करण्याच्या अनुषंगाने नियोजन करावे. यासाठी शहर व तालुक्यातील जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य तसेच ग्राहक चळवळीतील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पथनाट्य, निबंध स्पर्धा, शेतकरी मेळावे अशा उपक्रमाद्वारे व्यापक जनसंपर्क करून ग्राहक जागरणाचे कार्य करावे. ग्राहक जागरण पंधरवड्यामध्ये नव्याने आलेला ग्राहक संरक्षण कायदा, अन्नसुरक्षेच्या बाबतीत विविध माहिती ग्राहकांना पुरवने, दिशाभूल करणारी जाहिरात, सायबर फसवणूक गुन्हे आणि डिजिटल अटक याबद्दल ग्राहकांना माहिती देणे, दैनंदिन जीवनात उद्धवणाऱ्या खरेदी संबंधी विविध कायद्याची माहिती, वैद्यमापनशास्त्र, अन्न व औषध प्रशासन संबंधीच्या मूलभूत अधिकाराची माहिती इत्याादी बाबींचा ग्राहक जागरण उपक्रमामध्ये समावेश असावा, असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे तालुकाध्यक्ष गोपाळ मंत्री, सचिव सय्यद ताजुद्दीन, शहराध्यक्ष सुधाकर चव्हाण, कोषाध्यक्ष मेहमूद शेख, जिल्हा उपाध्यक्ष सोपानराव टोले, जिल्हा महिला सदस्य प्रतिमा वाघमारे, मंजुषा जामगे, सदस्य परशुराम पापडू, राजकुमार मुंडे आदींच्या निवेदनावर सह्या आहेत.

### गंगाखेडात घरफोडी; सव्वातीन लाखांचा ऐवज लंपास

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** शहरातील लेक्चरर कॉलनीत रविवारी (दि.०८) अज्ञात चोरट्यांनी एका शिक्षकाच्या घरातून कपाटात ठेवलेले १ लाख रुपये, सोन्याचे गंठण, अंगठी, कानातील झुंबर, चांदीच्या गणपतीची मुर्ती असे सोन्या-चांदीचे दागिने मिळून एकूण ३ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. या घटनेने शहरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित शिक्षक हे बाहेरगावी कामानिमित्ताने गेले होते. त्यांची पती दुपारच्या वेळी एका शाळेत कार्यक्रमासाठी गेली होती. त्याचाच फायदा घेत या चोरट्यांनी त्यांचे घर फोडले. शिक्षकाची पती घरी परतल्यावर कपाटातील रोख रक्कम आणि दागिने चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. यात कपाटात ठेवलेले सोन्याचे एक तोळ्याचे गंठण, एक तोळ्याची सोन्याची अंगठी, एक तोळ्याचे कानातील सोन्याचे झुंबर, चादीची एक तोळ्याची गणपतीची मुर्ती चोरीस गेली. घरातील दोन कपाटाचे लॉकर चोरट्यांनी तोडले. कपाटात असलेले बँकेचे पासबुक, पोस्टाचे पासबुक, एटीएम कार्ड, आधारकार्ड, पॅन कार्ड आदी कागदपत्रे चोरट्यानी पळविली.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुणालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३






# सकल हिंदू समाजाचा जिंतूरात मुक मोर्चा

## बांगलादेशात अत्याचार; तहसीलदार मार्फत राष्ट्रपती व पंतप्रधान यांना निवेदन

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** बांगलादेशामध्ये हिंदू समाजावर आणि अल्पसंख्यांक समाजावर कट्टरपंथीयाद्वारे अत्याचार होत आहे. त्यांची घरे, दुकाने जाळून अत्याचार केला जात आहे. याचे तीव्र पडसाद राज्यातील विविध ठिकाणी दिसून येत आहे. या सर्व अत्याचाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी जिंतूर तालुका सकल हिंदू समाजातर्फे दि. १० डिसेंबर मंगळवार रोजी शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानात सकल हिंदू समाज, हिंदू सम ाजातील हिंदुत्ववादी संघटना, साधुसंत एकत्र येत निर्देशक फलक झळकावत, हिंदूंच्या सन्मानासाठी केंद्र सरकार व आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने यावर कठोर भूमि का घेण्याबाबतचे निवेदन तहसीलदार राजेश सरवदे मार्फत राष्ट्रपती व पंतप्रधान यांना देण्यात आले.

बांगलादेशमध्ये हिंदू समाजावर कट्टरपंथीयाद्वारे अत्याचार होत आहे. तेथील मंदिरे, घरे, दुकाने जाळली जात आहे. पाडली जात आहे. महिलावर देखील अमानवीय पद्धतीने अत्याचार होत आहेत. ही बाब अत्यांत दुः खदायक असून सकल हिंदू समाज जिंतूरच्या वतीने घटनेचा निषेध करीत केंद्र सरकार व आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने याची दखल घेऊन बांगलादेशमध्ये हिंदूच्या मूलभूत मानव अधिकाराचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी कठोर भूमिका घ्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दि.१० डिसेंबर मंगळवार रोजी शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती ते नरसिंह चौक, मार्ग जागृत हनुमान मंदिर - मुख्य चौक- पोलीस ठाणे महाम ार्ग ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते मेन रोड मार्गे तहसील कार्यालयापर्यंत भव्य मूक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये जिंतूर तालुक्यातील सकल हिंदू समाजातील नागरिक हजारोंची संख्येने उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी आपल्या हाताला काळी फीत बांधून मानवी साखळी करून निषेध व्यक्त करण्यात आला. बांगलादेश मध्ये हिंदू, मुडा, चकमा, कुकी व बौद्ध इत्याादी आदिवासी व दलित बांधवांवर अत्याचार केले जात आहे. या सर्व अत्याचारांचा निषेध शांततेने आणि लोकशाही मार्गाने व्यक्त करणाऱ्या इस्कॉनच्या साधूंना देखील बांगलादेश सरकारने देशद्रोहाची अत्यांत जुलमी अशी कलमे लावून तुरुंगात डांबले आहे. स्वातंत्र्याच्या वेळी बांगलादेशमध्ये हिंदूंची संख्या ३८% होती, ती आज केवळ ८ टक्केच राहिली आहे त्याामुळे भारत सरकारने जर वेळीच पावले उचलली नाहीत तर बांगलादेशातील ८ टक्के हिंदू व अन्य अल्पसंख्यांक समाज, जिहादी इस्लामी कट्टर वादाला बळी पडून संपूर्णपणे नामसेस होईल असे सकल हिंदू सम ाजाकडून सांगण्यात येत आहे. त्याामुळे सकल हिंदू समाजाकडून जिंतूर मध्ये अत्याचारांचा निषेध करण्यासाठी भव्य मूक मोर्चा काढण्यात आला होता. भारत सरकारने बांगलादेशातील हिंदू संरक्षणासाठी आवश्यक ते सर्व उपाय तात्काळ अम लात आणावेत आणि अटकेत असलेल्या बांगलादेशातील साधूंची त्वरित सुटका करावी यासाठी बांगलादेश सरकारला निर्देश द्यावे. बांगलादेशातील हिंदू समाजावर होत असलेला अत्याचार कायमसुरी बंद व्हावा. आणि इस्कॉनच्या साधूंची तात्काळ मुक्तता व्हावी या मागणीचे निवेदन तहसीलदार मार्फत राष्ट्रपती व पंतप्रधान यांना देण्यात आले. यावेळी सकल हिंदू समाज, हिंदुत्ववादी संघटना, वारकरी संप्रदाय, महिला हरे राम हरे कृष्णा सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला.

## पत्रकार शेख शकील यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**जिंतूर/प्रतिनिधी-** तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै



पुण्य नगरीचे तालुका प्रतिनिधी शेख शकील अहमद यांना समता साहित्या अकादमी यवतमाळ तर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार जाहीर झाला असून मान्यवरांच्या उपस्थितीत दि २१ डिसेंबर रोजी मुबईत प्रदान करण्यात येणार आहे

समता साहित्या अकादमी तर्फे दरवर्षी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या कार्याची दखल घेत त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येते या वर्षी उत्कृष्ट राज्यस्तरीय पुरस्कार शहरातील दै पुण्य नगरीचे पत्रकार शेख शकील अहमद (बबलू पत्रकार) यांना जाहीर झाला असून या पुरस्कार वितरण सोहळा मुंबईत दि २१ डिसेंबर रोजी संपन्न होणार आहे.पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल तालुका पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी,सदस्य,मार्गदर्शकांनी त्यांचे अभिनंदन केले

### संपूर्ण मानवत शहरासह तालुका बंद

**मानवत,/प्रतिनिधी :** बांग्लादेशात हिंदू विरोधात अन्याय अत्याचार होत असल्याच्या घटनेच्या निषेधार्थ मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी मानवत शहरासह तालुका बंदची हाक संघटनेच्यावतीने देण्यात आली होती. त्यास संपूर्ण मानवतकरांनी चांगला प्रतिसाद दिला. तसेच यावेळी तहसीलदार यांना यावेळी निवेदनही देण्यात आले होते. यावेळी संपूर्ण हिंदू समाजातील माता-भगिनी, नागरिकांची म ोठया संख्येन मोर्चामध्ये सहभाग दिसून आला होता.



**मानवत- बांग्लादेशात हिंदू विरोधात अन्याय अत्याचार होत असल्याच्या घटनेच्या निषेधार्थ मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी मानवत शहरासह तालुका बंदची हाक संघटनेच्यावतीने देण्यात आली होती. त्यास संपूर्ण मानवतकरांनी चांगला प्रतिसाद दिला.**

## 'गंमत असते नात्याची' नाटकास व्दितीय पारितोषिक

**परभणी,/प्रतिनिधी-** ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत नांदेड केंद्रातून तन्मय ग्रुप नांदेड या संस्थेच्या 'वसुधैव कुटुंबकम या नाटकाला प्रथम पारितोषिक तर परभणीतील राजीव गांधी युवा फोरम या संस्थेच्या 'गंमत असते नात्याची' या नाटकास द्वितीय पारितोषिक जाहीर झाले आहे.



सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी सोमवारी (दि.०९) एका प्रसिध्दीपत्राकाद्वारे ही माहिती दिली असून दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे नांदेड केंद्रावरील अन्य निकाल पुढीलप्रमाणे- स्वप्नरंग सांस्कृतिक संस्था, नांदेड या संस्थेच्या व्हाईट पेपर या नाटकासाठी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. दिग्दर्शन : प्रथम पारितोषिक नाथा चितळे (नाटक- वसुधैव कुटुंबकम् ), द्वितीय पारितोषिक विजय करभाजन (नाटक- गंमत असते नात्याची), प्रकाश योजना: प्रथम पारितोषिक चेतन ढवळे (नाटक- वसुधैव कुटुंबकम्), द्वितीय पारितोषिक श्याम चव्हाण (नाटक- व्हाईट पेपर), नेपथ्य: प्रथम पारितोषिक भिमाशंकर कुलकर्णी (नाटक- वसुधैव कुटुंबकम् ), द्वितीय पारितोषिक किरण टाकळे (नाटक- व्हाईट पेपर), रंगभूषा : प्रथम पारितोषिक गजस्विनी देलमाडे (नाटक- वसुधैव कुटुंबकम् ), द्वितीय पारितोषिक शांता देसाई (नाटक- व्हाईट पेपर), उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक नागेश लोकडे (नाटक- वसुधैव कुटुंबकम् ) व क्रांती दैठणकर (नाटक- सेल्फी), अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे मोनिका गंधर्व (नाटक- गंमत असते नात्याची), निलिमा चितळे (नाटक- वसुधैव कुटुंबकम् ), अर्चना चिक्षे (नाटक- गंमत असते नात्याची), सुषमा कुलकर्णी (नाटक- सेल्फी), किशोर पुराणिक (नाटक- गंमत असते नात्याची), गौतम गायकवाड (नाटक- व्हाईट पेपर), आदित्या उदावंत (नाटक- वसुधैव कुटुंबकम्), चंद्रकांत तोरणे (नाटक- गांधी आंबेडकर) यांचा समावेश आहे. २५ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत कुसुम सभागृह, नांदेड येथे अतिशय जल्लोषात झालेल्या या स्पर्धेत एकूण १२ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून देवदत्त पाठक, नंदकुमार सावंत आणि डॉ. माणिक वड्याळकर यांनी काम पाहिले. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी पारितोषिक प्राप्त संघांचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले असून भविष्यातही या संघांनी व कलाकारांनी सर्वोत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

## मुख्यमंत्र्याची भेट घेवून निवेदनाव्दारे साकडे

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा भारतीय जनता पार्टीच्या किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. प्रफुल्ल पाटील यांनी मुंबईत भेट घेवून मुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल



यथोचित सत्कार केला. तसेच मराठवाड्यातील खडलेल्या विकास योजनांसह प्रश्नातील अडथळे दूर व्हावेत, अशी अपेक्षा सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली.

मुंबईतील सागर या शासकीय निवासस्थानी फडणवीस यांची डॉ. पाटील यांनी भेट घेवून मराठवाड्यातील विकास प्रश्नांविषयी तपशीलवार असे निवेदन सादर केले. त्याद्वारे, हे सारे प्रश्न मार्गी लागावेत, या दृष्टीने आपण निर्देश द्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी माजीमंत्री तथा नवनिर्वाचित आमदार बबनराव लोणीकर हे उपस्थित होते.

# ध्वजदिन निधी संकलनाचा जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते शुभारंभ- सैनिक व कुटुंबियांच्या कल्याणासाठी प्रत्येकाने ध्वजदिन निधीत योगदान देणेचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** देशाचे रक्षण करणारे सैनिक व त्याांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी उभारल्या जाणाऱ्या ध्वजदिन निधी संकलन-२०२४ चा शुभारंभ आज जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते झाला. देशाच्या सुरक्षेसाठी प्रसंगी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांप्रती आपण सर्व कृतज्ञ आहोत. त्यामुळे सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी उभारल्या जाणाऱ्या ध्वजदिन निधी संकलनात योगदान देणे हे नागरिकांचे कर्तव्य आहे, तरी प्रत्योकाने ध्वजदिन निधी संकलनात आपले योगदान अवश्य द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक अधिकारी अनुराधा ढालकरी, मनपा आयुक्त धैर्यशिल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप घोंसीकर, शिक्षणाधिकारी आशा गरुड, तहसिलदार संदिप राजपुरे आदींसह माजी सैनिक, सैनिकांचे कुटुंबिय व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे अधिकरी, कर्मचारी उपस्थित होते. प्रारंभी जिल्हाधिकारी यांचे हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. माजी सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी विविध विभागांची लवकरच बैठक घेण्यात येईल. ध्वजदिन निधी संकलनासाठी दिलेले उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्याची सूचना यावेळी जिल्हाधिकारी यांनी विभागप्रमुखांना केली. प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केले. यावेळी परभणी जिल्हयातील शहीद झालेल्या सैनिकांच्या वीर पती व वीर माता-पिता यांचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच माजी सैनिक/ विधवा पती यांच्या पाल्यांसाठी सैनिक कल्याण विभागाच्यावतीने देण्यात येणाऱ्या कल्याणकारी निधीमधून सात विदयार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत व शिष्यवृत्तीचे धनादेश मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. ध्वजदिन निधी संकलन-२०२३ चे उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी यांचे अभिनंदन करण्यात आले. तर उत्कृष्ट संकलन करणाऱ्या कार्यालय प्रमुखांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देण्यात आले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत बांग्लादेशाविरोधात हजारो नागरिकांचा जनआक्रोश मार्चा

## बांग्लादेशाचा ध्वज आणि राष्ट्रपती महमद युनुस यांच्या प्रतिकात्मक प्रतिमेला मारले जोडे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० डिसेंबर.**









बांग्लादेशात हिंदूवर होत असलेल्या अमानुष अत्याचाराविरोधात मंगळवारी हजारो हिंदू नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी बांग्लादेशाचा ध्वज आणि हंगामी अध्यक्ष महमद युनुस यांच्या प्रतिकात्मक प्रतिमेला जोडे मारीत नागरिकांनी प्रचंड संताप व्यक्त केला. बांग्लादेशातील हिंदूवरील होणारे अत्याचार तत्काळ थांबवावेत या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांना शिष्टमंडळाने सादर केले.

शहरातील गांधी चौकात दि १० डिसेंबर रोजी बांग्लादेशात हिंदूवर होणाऱ्या अमानवीय अत्याचाराविरोधात मोर्चा काढण्यासाठी हजारो हिंदू नागरिक उपस्थित होते. या मोर्चात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, आ. संतोश बांगर, माजी आ. गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाध्यक्ष डॉ मुरलीधर तोष्णीवाल, उपाध्यक्ष साबरमल अग्रवाल, राजेंद्र हलवाई, ॲड दिलीप झंवर, धोंडीराज पाठक महाराज, बजरंग दलाचे कैलाश श्रीनाथ यांच्यासह साधु संत, महंत आणि हजारो नागरिक उपस्थित होते. यावेळी बांग्लादेशाविरोधात जोरदार घोषणाबाजी करीत बांग्लादेशाचा ध्वज आणि हंगामी अध्यक्ष महमद युनुस यांच्या प्रतिकात्मक प्रतिमेला जोडे मारण्यात आले. हिंदूवरील अत्याचाराचा जाहीर निषेध करण्यात आला.

बांग्लादेशातील कट्टरपंथीयांकडून तसेच जिहाद्यांकडून मागील काही महिन्यांपासून हिंदूवर अमानुषपणे अत्याचार केले जात आहेत. त्यांची घरे जाळली जात आहेत. हिंदू वस्तीवर प्राणघातक हल्ले केले जात आहेत. हिंदू महिला, तरूणी तसेच अल्पवयीन मुलींवर अत्याचार करून त्यांना ठार मारण्यात येत आहे. हिंदुच्या मंदिरावर हल्ला करून मंदिरांची तोडफोड केली जात आहे. हिंदू समाजाच्या देव देवतांची विटंबना केली जात आहे.

दि २६ नोव्हेंबर रोजी इस्कॉनचे चिन्मय कृष्ण महाराज यांना खोट्या गुन्ह्यात अडकवून जबरदस्तीने हिंसात्मक पध्दतीने अटक केली आहे. या अटकेनंतर बांग्लादेशातील हिंदू समाजाने लोकशाही पध्दतीने आंदोलन केले परंतु या आंदोलनाला हिंसात्मक पध्दतीने चिरडण्यात आले. चिन्मय कृष्ण महाराजांना अजूनही कारागृहात ठेवण्यात आले आहे. त्याठिकाणी त्यांच्या अन्याय होत आहे. याठिकाणी कट्टर मुस्लीम दहशतवादी संघटना हिज्ब उत तहरिर, जमातुल मुजाहीद्दीन , हरकत उल जिहाद, अन्सार अल इस्लाम आणि इतर कट्टरपंथीय दहशतवादी संघटनांशी संबंधीत अतिरेक्यांना ठेवल्याचे समजते. ही बाब अतिशय गंभीर असून चिन्मय कृष्ण महाराज यांच्या जीवीतास धोका निर्माण करणारी आहे. त्यामुळे बांग्लादेशातील शासनाच्या हेतूवर शंका उपस्थित होत आहे. बांग्लादेशात हिंदू अल्पसंख्यांक समाज आहे. त्याठिकाणी मागील काही महिन्यांपासून हिंदूवर अमानुषपणे अत्याचार करून त्यांची हत्या करण्यात येत आहे परंतु मानवाधिकार समिती मुग गिळून गप्प बसली आहे.

त्यामुळे हिंदूंच्या धार्मिक स्थळ आणि मंदिराचे संरक्षण करण्यासाठी भारत सरकारने कठोर शब्दात बांग्लादेश सरकारला आपल्या भावना कळवून बेकायदेशीर अटकेतून तत्काळ सुटका करावी. इस्कॉनचे चिन्मय कृष्ण महाराज आणि त्यांच्या सहकाऱ्यांची सुटका करावी, विविध समाज माध्यमातून हिंदू महिला आणि मुली यांच्यावरील अमानवीय अत्याचार आणि त्यांच्या मानव अधिकाराचे हनन समोर आले आहेत. अमानवीय अत्याचार आणि मानवधिकारांचे उल्लंघन तत्काळ थांबविण्यात यावे. भारत सरकारने तत्काळ जागतिक स्तरावर आपले मत जाहीरपणे प्रदर्शित करावे तसेच आंतरराष्ट्रीय समुदायास याबाबत अवगत करावे. धार्मिक उत्पीडन थांबवून कट्टरवाद्याविरोधात कायदेशीर कारवाई करावी आदी मागण्या निवेदनाद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविण्यात आल्या आहेत. यावेळी हिंगोली नांदेड रस्त्यावरील वाहतुक ठप्प झाली होती. यावेळी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

# माजी सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी कटीबध्द- गोयल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० डिसेंबर**



देशात शांतता व अखंडता टिकवून ठेवण्याचे काम सीमेवरील सैनिकांनी स्वत:च्या शौर्याने, धैर्याने कमीत कमी साधनसामग्रीद्वारे चांगल्या प्रकारे करत आहेत. आपल्या कुटुंबियांची पर्वा न करता अविरतपणे सेवा करत आहेत. त्यांच्या बलिदानामुळेच आपण सुरक्षित आहोत, असे सांगून माजी सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव कटिबध्द असल्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी यावेळी सांगितले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आज सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४ निधी संकलन प्रारंभाच्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी अभिनव गोयल बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) अनिल माचेवाड, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे, माजी सैनिक संघटनेचे सय्यद मीर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले व देशासाठी बलिदान दिलेल्या सैनिकाप्रती दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. तसेच यावेळी मातोश्री गंगादेवी देवडा निवासी अंध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या चमूने स्वागत गीत व देशभक्तीपर गीत सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. यावेळी ध्वजदिन निधी संकलनाचे उत्कृष्ट कार्य केलेल्या कार्यालय प्रमुखांचा प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला. शहीद सैनिक गणपत भिकाजी रणवीर यांच्या माता-पित्याचा साडीचोळी देवून सत्कार केला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर इंगोले यांनी केले. तर आभार प्रदर्शन सुरेश भालेराव यांनी केले.

या कार्यक्रमास जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते, प्राचार्य डॉ. व्ही. एस. कनवटे, प्राचार्य डॉ. जे. एस. भोयर, नायब तहसीलदार सचिन जोशी, संतोष बोथीकर, वीर माता-पिता, माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी काशिनाथ पाईकराव, कडूजी टिपरे, दलित पाईकराव, बाबूराव जामबुतकर, पंडित हाके, केशव भडंगे, चंदू टिपरे, सुबेदार दत्तराव लेकुळे, नामदेव मस्के, कॅप्टन केशव जाधव, कल्याण संघटक तुकाराम मुकाडे आदींनी विशेष सहकार्य केले.



**हिंगोली- येथील जिल्हा परिषदेतील षटकोनी सभागृहाचे नूतनीकरणाचे काम काही महिन्यांपूर्वीच करण्यात आले होते. या सभागृहाचे छताला पीओपीचे काम करण्यात आले. काही ठिकाणी पीओपी गळून पडल्याचे दिसत असल्याने या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. छाया- विजय गुंडेकर**

# व्यावसायिक ज्ञान विद्यार्थ्यांना उद्योजक, रोजगारक्षम बनवते- विशाल रागणे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० डिसेंबर**

येथील आदर्श महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमातील इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी, अकाउंटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंट व मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी या विभागांना हिंगोली जिल्ह्याचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी विशाल रागणे यांनी निरीक्षण हेतू भेट दिली.

या कार्यक्रमाचे प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आघाव, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी विशाल रागणे, समन्वयक डॉ. संजय कयाल, मेजर पंढरीनाथ घुगे, पंडित कुऱ्हाडे, विजयकुमार जट्टे, दिनकर पवार जयवंत मुटकुळे, महले, सावळे व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जिल्हा व्यवसाय शिक्षण अधिकारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी सतत प्रयत्नशील असावे, आपल्या अभ्यासक्रमासोबतच इतर जे अभ्यासक्रमात आहे त्याबद्दल अभ्यासक्रमाची माहिती बाळगावी. आयटीआय ,द्विलक्षी अभ्यासक्रम,व्यवसायिक अभ्यासक्रम, कला, वाणिज्य, विज्ञान हे अभ्यासक्रमाचे उपयुक्तता व त्यानंतर असणाऱ्या संधी याविषयी चौकस असून आपण आपल्या क्षमतेने स्वतःचा विकास करण्यासाठी कठोर परिश्रम करावे. व्यावसायिक ज्ञानातून अपेक्षित यश मिळवण्यासाठी शिक्षक यांचे बहुमोल असे मार्गदर्शन वेळोवेळी घेऊन रोजगारभिमुख अभ्यासक्रमातून रोजगार निर्मित करावे असे मार्गदर्शन केले.

आदर्श चे प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांनी सतत वर्गात उपस्थित राहून प्रात्यक्षिक व सिद्धांतिक ज्ञान त्यासोबतच विविध औद्योगिक भेटी यामधून ज्ञान संपादन करावे व आपल्या आई वडिलांचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी प्रयत्नशील असावे, असे मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेजर पंढरीनाथ घुगे यांनी तर आभार प्रदर्शन पंडित कुऱ्हाडे यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.विजयकुमार जटे, प्रा.दिनकर पवार जयवंत मुटकुळे व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी विद्यार्थिनी वैष्णवी दवणे, भक्ती लुंगे, आरती शेळके, कोमल लोंढे, मनीषा दहातोंडे, अनुष्का लाड, सज्जनलक्षिता शाहू अक्षरा, होडगीर, भरत वर्मा, पवार, पंढरीनाथ मोरे यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त

### कोनाथा येथे साईबाबा वर्धापन दिन साजरा



वसमत- तालुक्यातील कोनाथा येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी साईबाबा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी बाबाची महापूजा ब्राह्मणाच्या हस्ते करून नंतर आरती करण्यात आली ह भ प काशिनाथ महाराज यांच्या रसाळ वाणीतून कीर्तनाचा कार्यक्रम घेण्यात आला. नंतर महाप्रसादाचे आयोजन सुद्धा मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन मुंजाजीराव बेंडे, गणेशराव बेंडे, गोविंदराव बेंडे हे देवाचे परमभक्त व अन्नदानाचे आयोजन व कार्यक्रमाचे आयोजन यांच्याहस्ते करण्यात आले यावेळी पंचक्रोशीतील भक्तमंडळी व गावकरी मंडळी भजनी मंडळी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्ह्यात हत्तीरोग सर्व्हेक्षण मोहीमेस प्रारंभ

हिंगोली- हत्तीरोग बाधित नसलेल्या जिल्ह्यामध्ये समाविष्ठ आहे. जिल्ह्यात सार्वत्रिक औषधोपचार मोहीम सन २०२५ मध्ये समाविष्ट करण्यात आल्यामुळे रिमॅपिंगकरिता रात्र रक्तनमुने संकलन सर्व्हेक्षणाकरिता प्रत्येक तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्रातील ब्लॉक (फिक्स गांव, रॅन्डम गाव) निश्चित करण्यात आले आहे. हिंगोली जिल्ह्यातील फिक्स गावे गाडीबोरी, वसमतचा शहरी भाग, डोंगरकडा येथे तर रॅन्डम गावे हत्ता, सुरेगाव, बाळापूर येथे आजपासून (दि.०९) १४ डिसेंबरपर्यंत रात्री ८ ते १२ या वेळेत रात्र रक्तनमुने संकलन करण्यासाठी मोहीम सुरु करण्यात आली आहे. यामध्ये २० वर्षावरील कोणत्याही व्यक्तीचे एलएफ (लिम्फॅटिक फायलेरीयासिससाठी) रात्र रक्तनमुने घेण्यात येणार आहेत. नमुन्यांची लगेच तपासणी करुन अहवाल सादर करण्यात येणार असून या मोहिमेमध्ये काही गावे निश्चित करण्यात आली आहेत. संबंधित गावांमध्ये नागरिकांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना रात्र रक्तनमुने संकलन करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. गजानन चव्हाण यांनी केले आहे.

### नायलॉन मांजाविरोधात पोलिसांची कार्यवाही

हिंगोली- नायलॉन मांजामुळे जीवीत हानी झाल्याचे अनेक उदाहरणे आहेत. हिंगोली पोलिसांनी नायलॉन मांजा विक्रीवर करणाऱ्यांवर कठोर कार्यवाहीचे आदेश दिल्यानंतरही काहीजण नायलॉन मांजा विक्री करीत असल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांनी नायलॉन मांजाविरोधात मोहीम राबवली असून दोन जणांवर कार्यवाही करीत त्यांना बेड्या ठोकल्या आहेत.

# ईश्वर चिठ्ठीद्वारे मागावर्गीय मुलामुलींना सायकल खरेदीसाठी अर्थसहाय्य

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० डिसेंबर**



समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद हिंगोली च्या वतीने. आज दि १० डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषदेतील षटकोनी सभागृहामध्ये ईश्वर चिठ्ठी द्वारे जीप योजना २०२४-२५ मधून २०% कल्याण निधी अंतर्गत ग्रामीण भागातील इयत्ता पाचवी ते नववी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुला-मुलींना सायकल खरेदीसाठी अर्थसहाय्य पुरवणे यासाठी ईश्वरचरणी आज काढण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील तीनशे मागासवर्गीय मुला-मुलींना सायकल खरेदीसाठी अर्थसाह्य पुरविण्यात येणार आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुम शेंगुलवार, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्या अध्यक्षते खाली ईश्वर चिठ्ठी काढण्यात आल्या यावेळी समाजकल्याण अधिकारी राजू ऐडके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके, लेखा अधिकारी चोरमारे, राऊत आप्पा, शिक्षण विस्तार अधिकारी कराळे, राजू पाटील, आदींची उपस्थिती होती.

# कुरूंदा येथे अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**कुरूंदा, १० डिसेंबर**



तालुक्यातील कुरुंदा येथे अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा ज्ञानेश्वरी पारायण सोहळानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

श्री खंडोबा मंदिर येथे दि. १ रविवार ह भ प दत्ता महाराज भारतीय साडेगावकर, किर्तनकार दि. २ सोमवार ह भ प विठ्ठल महाराज वैद्य वीर सुकळी, दि. ३ मंगळवार ह भ प कांता महाराज झरीकर, दि. ४ बुधवार आनंद महाराज गेटकर, दि. ५ गुरुवार ह भ प भगवान महाराज मरसुळकर, दि. ६ रात्री रामचंद्र वाघे यांचे जागरण झाले. शुक्रवार ह भ प दीनानाथ महाराज इंजनगावकर, दि ७ शनिवार दीपक महाराज जोशी पांगरेकर यांचे कीर्तन संपन्न दि. ८ रविवार सकाळी खंडोबाची महापूजा आरती विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न सर्व गावातील मुख्य मार्गाने महिलांनी स्वच्छता करून घरासमोर रांगोळी काढून व साडी धोतर अंथरूण पालखीचे स्वागत केले. सकाळी १० वाजता गावातून मुख्य रस्त्याने खंडोबाची भव्य पालखी काढण्यात आली. वाघेवारू व गावातील सर्व भजनी मंडळ सहभागी झाले होते. ज्ञानेश्वरी गाथेची गावातून मिरवणूक करण्यात आली. ढोल ताशाच्या गजरात आतिषबाजी व फटाके लावून आनंद साजरा करण्यात आला. तसेच भागवताचार्य हभप सुनील महाराज अष्टीकर यांची सुद्धा गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. विविध ठिकाणी खंडोबाच्या पालखीचे भाविकांनी दर्शन घेतले. सुनील महाराज आष्टीकर यांचे सुद्धा गावकऱ्यांनी दर्शन घेतले खंडोबा पालखीच्या मिरवणूकमध्ये हजारो महिला नागरिक सहभागी झाले होत्या. नागरिकांनी घोषणा येळकोट येळकोट जय मल्हार गर्जनेने परिसर दुमदुमून गेला. मोठ्या प्रमाणात भंडाऱ्याची उधळण करण्यात आली. पालखीचा समारोप खंडोबा मंदिर येथे झाला.

# आरटीओ कार्यालयात इंटरनेट समस्यांमुळे अडचणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० डिसेंबर**

येथील उपप्रादेशिक परिवहन विभागात मागील काही दिवसांपासून इंटरनेट बंद असल्यामुळे नागरिकांना कार्यालयात तासनतास ताटकळत बसावे लागत आहे.

शहरानजीक असलेल्या लिंबाळा मक्ता भागातील उपप्रादेशिक परिवहन विभाग कार्यालयात मागील काही दिवसांपासून इंटरनेट समस्या निर्माण होत असून सर्वर डाऊन असल्यामुळे लायसन्स तसेच नुतनीकरण आणि इतर कामांमध्ये अडचणी निर्माण होत आहेत. बाहेरगावाहून कार्यालयीन कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना याठिकाणी बराच वेळी ताटकळत बसावे लागत आहे. आता संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने झाल्यामुळे कार्यालयातील कामकाज ठप्प पडत आहे.